14-03-2016 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A-1
VVK/ AKN/ ST/ 12:00

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

**पृ.शी./मु.शी.:** तोंडी उत्तरे

**औंढा नागनाथ (जि.हिंगोली) तालुक्यातील इनामी जमिनी**
**मूळ मालकांच्या नावे करण्याबाबत**

**(1) * १६००८ श्री.रामराव वडकुते, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(1) औंढा नागनाथ (जि.हिंगोली) तालुक्यात पूर्वीच्या सर्व्हे नंबर १४६, १४७, २५८ व सध्याचा परिवर्तीत सर्व्हे नंबर ३८० वर इनामी जमिनी मूळ मालकांना देण्याबाबतचे आदेश शासन परिपत्रक क्र.डीईव्ही २०१०/प्र.क्र.९/ल-४, दिनांक ३० जुलै, २०१० रोजी झाले असून सदर जमिनी मूळ मालकांना देण्यात आल्या नाहीत, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(3) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर इनामी जमिनी मूळ मालकांच्या नांवे करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (2), (3) व (४) शासन परिपत्रक क्र.डीईव्ही-२०१०/प्र.क्र.९/ल-४, दिनांक ३०.७.२०१० व शुद्धीपत्रक समक्रमांक दिनांक २९.६.२०११ अन्वये इनाम जमिनी मूळ मालकांना परत करण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या नसून देवस्थानच्या जमिनी बेकायदेशीर रित्या हस्तांतरीत झाल्या असल्यास अशा जमिनी पूर्ववत देवस्थानच्या नावे करणेबाबत क्षेत्रीय महसूली अधिकाऱ्यांना निर्देश देण्यात आले आहेत.

औंढा नागनाथ, जि.हिंगोली येथील जुना स.नं.१४६, १४७, २५८ (सद्याचा गट नं.३८०) या जमिनीच्या बाबतीत नमूद करण्यात येते की, सदर जमीन हैदराबाद इनामे व रोख अनुदाने रद्द करण्याबाबतचा अधिनियम, १९५४ मधील तरतूदी अन्वये संबंधित इनामदारांकडून खालसा होऊन कब्जेदार श्री.गोविंदराव देशमुख यांना १९६० साली पुनर्दानित झाली होती.

तद्नंतर अपील प्रकरणी सदर पुनर्दानित जमीन ही सेवाधारी इनाम जमीन (Community Services Inam) असल्याचे विशेष कार्य अधिकारी, महसूल व वन विभाग यांनी १९६४ साली घोषित केले.

तथापि, सदर जमीन पुढे वक्फ मिळकत म्हणून महाराष्ट्र शासनाचे राजपत्र दिनांक ११.७.१९७४ मध्ये अधिसूचित झाल्याचे दिसून येते. संबंधित इनामदारांनी प्रश्नांकित जमीन वक्फ करुन देताना सदर सेवाधारी इनाम जमीन अनधिकृत ताब्यात असल्याचे शपथेवर कथन केल्याचेही सदर राजपत्रात नमूद केले आहे.

प्रश्नांकित जमीन खालसा झाल्यानंतर संबंधित इनामदारांनी ती वक्फ केल्याचे दिसून येते. या प्रकरणी वक्फ (सुधारणा) अधिनियम, १९९५ मधील कलम ४० नुसार कोणतीही मालमत्ता वक्फ आहे किंवा कसे हे ठरविण्याचा अधिकार महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळास आहे. त्यानुसार प्रश्नांकित जमीन वक्फ आहे किंवा कसे हे याबाबत महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाकडून खातरजमा करण्यात येईल.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.रामराव वडकुते : सभापती महोदय, औंढा नागनाथ तालुक्यातील पूर्वीचा सर्व्हे नंबर 146,147,258 व नंतर ही जमीन परिवर्तीत होऊन सर्व्हे नंबर 380 झाली आहे. पूर्वी ही जमीन निजामाच्या काळातील खिदमत पास म्हणून होती. खिदमत पास जमीन खालसा करता येत नाही.

....2...



ता.प्र.क्र.16008...

श्री.रामराव वडकुते....

परंतु सदर जमीन खालसा झाली असे दाखवून चुकीच्या माणसांच्या हातात ती गेली. याबाबत वारंवार जिल्हाधिकरी यांच्याकडे तक्रारी केल्या, उपोषणे केली. याबाबत कारवाई करतो असे जिल्हाधिकारी यांनी सांगितले होते. यासंदर्भात सन 2010 मध्ये शासनाने जी.आर. काढलेला आहे. चुकीच्या पध्दतीने जमीन अतिक्रमण केली असेल व ती जमीन इमानी किंवा वक्फ बोर्डाची असेल तर त्यांना ती देण्यात येईल. परंतु आजपर्यत तशा प्रकारची कार्यवाही झालेली नाही. जमीन खालसा झाली असे फक्त सांगण्यात येते. माझ्या महिती प्रमाणे सर्व्हीस इनाम जमिनीला खिदमत मास म्हणतात, यामध्ये तीन प्रकार आहेत इनाम, मदत मास व खिदमत मास. मदत मास या जमिनी खालसा होऊ शकतात. परंतु खिदमत मास जमिनी खालसा होऊ शकत नाहीत. ही जमीन खिदमत मास असताना ती खालसा कोणत्या आधारे करण्यात आली. ही जमीन जर चुकीच्या पध्दतीने खालसा झाली असेल तर तिला पुन्हा खिदमत मास म्हणून जाहीर करुन त्या जमिनी इनामदारांना देण्यात येतील काय ?

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, औंढा नागनाथ येथील ही जमीन खिदमत मास नाही, ही जमीन सर्व्हीस इनामची आहे. मधल्या कालखंडात या जमिनीच्या संदर्भात विवाद निर्माण झाला होता. सदर इनाम जमिनी सरदार ऊद्दीन व इतर यांच्याकडून खालासा करुन श्री.गोंविदराव देशमुख यांना विधिवत पुर्नदानित झाल्याचे दिसून येत आहे. सदर जमिनीवर सरदार ऊद्दीन व इतर यांचे अधिकार 1960 मध्ये संपुष्टात आले असताना त्यांनी सदर जमीन 1974 मध्ये शपथेवर वक्फ जमीन म्हणून दिलेली आहे. ही जमीन शपथेवर वक्फ बोर्डाकडे दिल्यावर आता ही जमीन खिदमत मास आहे, मदत मास आहे की, वक्फ ची आहे, यासंदर्भातील निर्णय घेण्यासाठी वक्फ बोर्डाकडे हे प्रकरण गेलेले आहे. या जमिनीच्या संदर्भात वक्फ बोर्ड जो निर्णय देईन तो निर्णय बंधनकारक राहील.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, औंढा नागनाथ येथील इनामी जमिनीच्या संदर्भात सरकारकडून लेखी उत्तर आलेले आहे. सन 1960 मध्ये ही जमीन हैद्राबाद इनामी अधिनियमान्वये खालसा केलेली आहे. 1966 मध्ये सेवाधारी इनाम म्हणून शासनाने ती जाहीर केली. 1974 मध्ये परत ही जमीन वक्फ मालमत्ता म्हणून शासनाने राजपत्रात घोषित केले असे लेखी उत्तरात नमूद

....3...



ता.प्र.क्र.16008...

श्री.धनंजय मुंडे...

करण्यात आलेले आहे. उत्तरात या जमिनीचे तीन वेगवेगळे प्रकार नमूद करण्यात आले आहेत. त्यामुळे या तिन्ही पैकी या जमिनीचा नेमका प्रकार कोणता आहे. या संदर्भातील माहिती मंत्री महोदयांनी द्यावी. दुसरा प्रश्न असा आहे की, या विषयाच्या अनुषंगाने वक्फ जमीन ठरविण्याचे अधिकार वक्फ बोर्डाचे आहेत, असे उत्तरात नमूद केले आहे. तथापि संबंधित इनामदारांनी शपथेवर कथन केल्यानंतर सदर इनाम जमिनीचा प्रकार बदलण्यात आला हे खरे आहे काय ? त्याचप्रमाणे इनाम जमिनीची संदिग्धता दूर करण्यासाठी शासन नव्याने आदेश काढणार आहे काय ?

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, मघाशी मी सांगितल्याप्रमाणे ही जमीन सेवाधारी इनाम जमीन आहे. सरदार ऊद्दीन यांच्याकडे ही जमीन असताना त्यांनी वक्फ म्हणून दिली.

**सभापती** : मंत्री महोदय, सरदार ऊद्दीन यांच्याकडे ही जमीन कोणत्या अधिकाराने गेली होती.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, ही जमीन त्यांच्याकडे कुळवहिवाटाप्रमाणे होती. सरदार ऊद्दीन यांचा अधिकार 1960 मध्ये संपुष्टात आलेला असताना त्यांनी सदर जमीन 1974 मध्ये वक्फ म्हणून घोषित केली. वक्फ म्हणजे अल्लाच्या नावाने दिलेल्या जमिनी. माझ्याकडील जमीन मी वक्फ बोर्डाला वक्फच्या कामासाठी देत आहे असे त्यांनी घोषित केल्यानंतर ती जमीन वक्फ बोर्डाकडे आली. खरे तर ही जमीन सर्व्हीस इनामी आहे. परंतु या जमिनीबाबत विवाद निर्माण झाल्यामुळे आता ही जमीन सर्व्हीस इनामची आहे की वक्फ बोर्डाच्या मालकीची आहे हे ठरविण्यासाठी वक्फ बोर्डाकडे अपील व सुनावणी चालू आहे. या जमिनीबाबत वक्फ बोर्ड जो निर्णय देईन त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल. प्रथम दर्शनी असे वाटते की, ही जमीन सर्व्हीस इनाम होती.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, वक्फ बोर्डाच्या जमिनीचा अगोदरचा सर्व प्रवास पाहिला तर ही सर्व प्रकरणे कायम डिस्पूटमध्ये जाताना दिसतात. ही जमीन कोणाची आहे हे ठरविण्यासाठी त्या काळी तत्कालीन महसूल राज्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली समिती नियुक्त केली होती काय ? नवीन कायदा करण्याबाबत शासनाला त्यांनी अहवाल सादर केला होता काय ?

...4...



ता.प्र.क्र.16008...

श्री.हेमंत टकले.....

यावर शासनाने काही कार्यवाही केली आहे काय ? हा अहवाल शासनाने स्वीकृत केलेला आहे किंवा नाही ? या अहवालानुसार गुजरात राज्यातील देवस्थान जमिनीबाबतच्या कायद्याच्या धर्तीवर महाराष्ट्रता असा कायदा करण्याचा महसूल विभागाचा विचार आहे काय ?

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, मदत मास जमिनीच्या संदर्भात राज्य सरकारने निर्णय घेतलेला आहे. परंतु खिदमत मास जमिनीच्या संदर्भात राज्य शासनाने निर्णय घेतलेला नाही. तत्कालीन राज्यमंत्री यांनी या संदर्भात कोणती शिफारस त्याबाबत मला माहिती नाही. परंतु त्याबाबत मी माहिती घेतो. त्यांच्या शिफारशीनुसार आवश्यकता वाटल्यास राज्य सरकार तसा कायदा करेल. आता मला जी माहिती देण्यात आलेली आहे, त्यानुसार राज्यमंत्री यांनी यासंदर्भातील अहवाल शासनास दिलेला आहे. हा अहवाल राज्य सरकारच्या विचाराधीन आहे.

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, इनाम जमिनीचे वेगवेगळे प्रकार आहेत, देवस्थान जमिनीच्या इनामचा वेगळा विषय आहे. काही जमिनी शाहू महाराजांच्या काळातील व सरदार यांनी दिलेल्या जमिनीचा विषय आहे. मुख्यत्वे कोल्हापूर येथे शाहू महाराजांनी अनेक जमिनी दिलेल्या आहेत, वतने आहेत, ती जमीन नंतर विकली गेली आहे. ही जमीन विकत घेतली गेली तेव्हा स्टॅम्पड्युटी भरुन त्या जमिनीचे रजिस्ट्रेशन करण्यात आले होते. आज त्या जमीनदारांना दोन ते तीन लाख रुपये इनाम भरण्याच्या नोटीसा आलेल्या आहेत. मंत्री महोदयांना मी विनंती करतो की, सरकारने राज्यातील अनधिकृत बांधकामे अधिकृत करण्याचा निर्णय सरसकट घेतलेला आहे. हा निर्णय घेत असताना महसूल विभागाच्या अडचणी वर्षानुवर्षे प्रलंबित ठेवण्यात आल्या असून त्याबाबत कोणताही निर्णय घेण्यात आलेला नाही. त्यामुळे सामान्य माणसांना बँकेचे कर्ज उपलब्ध होत नाही. ज्या जमिनी वादग्रस्त असतील त्या बाजूला ठेऊन ज्या

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

जमिनी वादग्रस्त नाहीत त्या वर्ग-1 करण्याचा निर्णय शासन घेणार आहे काय ? ज्या दिवशी शर्तभंग झाला त्या तारखेचा नजराना भरुन त्या जमिनी नियमित करण्यात येतील काय ?

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी वेगळा प्रश्न विचारलेला आहे. कोल्हापूर येथील जमिनीच्या संदर्भातील प्रश्न विचारण्यात आलेला आहे. छत्रपती शाहू

....5...



ता.प्र.क्र.16008...

श्री.एकनाथराव खडसे....

महाराज यांनी कोल्हापूर येथील अनेक जमिनी वहिवाटीसाठी दिलेल्या आहेत. काही जमिनी वापरासाठी दिलेल्या होत्या. त्या जमिनी वर्षानुवर्षे वहिवाटीखाली आणल्या आहेत. या जमिनी शेतीच्या प्रयोजनासाठी दिलेल्या होत्या. नंतर कोल्हापूर शहराचा विस्तार झाला व या जमिनी शहराच्या व महानगरपालिकेच्या हद्दीत आल्या. त्यानंतर त्या जमिनीचे बेकायदेशीर एन.ए.झाले आहेत. काही ठिकाणी जमिनीचे एन.ए.न करता राहण्यास सुरुवात केली आहे. शासनाची परवानगी नसताना जेथे इमारती उभ्या राहिल्या आहेत त्या इमारती अधिकृत करण्यात आल्या आहेत. शासनाची परवानगी न घेता त्या जागेवर इमारती व इतर बांधकामे करण्यात आली आहेत ती अधिकृत केलेली नाहीत, अशा ठिकाणी एन.ए.रेग्युलाईज करण्यासाठी जमिनीच्या रेडीरेकनरच्या 75 टक्के रक्कम भरुन एन.ए.रेग्युलाईज करण्याच्या सूचना शासनाने दिलेल्या आहेत. वेगवेगळ्या प्रकारच्या जमिनी आहेत, काही जमिनी शेतसाऱ्याच्या 40 पट रक्कम दंड घेऊन नियमित करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे.

सन्माननीय सदस्यांनी राज्यातील देवस्थान इनामी जमिनी, खिदमत मास व वक्फ जमिनी ट्रान्सफर करण्याची सूचना केली आहे. देवस्थान इनामी, खिदमत मास व वक्फ जमिनी सोडून अन्य ज्या जमिनी असतील त्या जमिनी नियमित करण्याच्या संदर्भात राज्य शासन निर्णय घेणार आहे काय तर याबाबत राज्य शासन गंभीरपणे विचार करीत आहे.

या नंतर श्री.सांगळे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.16008.....

श्री.एकनाथराव खडसे....

अशा जमिनी नियमित करण्यासंबंधी एक नवीन कायदा आणण्याचा राज्य शासनाचा विचार आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : मंत्री महोदय असे म्हणाले की, तीन पट, चार पट त्यांना दंड आकारुन त्या जमिनी नियमित करणार आहेत. परंतु मागील अधिवेशनात मंत्री महोदयांनी सदनाला अशी माहिती दिली होती की, जे दलित, आदिवासी व अल्पभूधारक आहेत त्यांच्याकडून या जमिनींसाठी अल्पदराने किंमत घेतली जाईल. सदर आश्वासन मंत्री महोदय पाळणार आहेत का ?

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, राज्यात ज्या जमिनींवर अतिक्रमण केलेले आहे, अशा जमिनींच्या संदर्भात मी यापूर्वी सांगितले होते की, शबरी घरकुल योजना, रमाई आंबेडकर घरकुल योजना किंवा इंदिरा आवास घरकुल योजनेअंतर्गत ज्यांना घरकुले मंजूर झालेली आहेत, अशा व्यक्तींकडे स्वतःची जागा असल्यास त्यांना घरकुल बांधता येते. परंतु त्यांच्याकडे स्वतःची जागा नसल्यास त्यांना घरकुल मंजूर झाले तरी त्यांना घरकुलाचे बांधकाम करण्यास परवानगी नाही. या संदर्भात जे बीपीएल कार्ड धारक आहेत किंवा उक्त योजनांमध्ये ज्यांना घरकुले मंजूर झाली आहेत, अशा घरकुल धारकांना राज्य सरकारच्या सरकारी जमिनी असल्यास त्या त्यांना देण्याचा सरकारने निर्णय घेतला आहे. (अडथळा)...त्या मोफत देऊ, त्यात जी काही किंमत असेल, त्यात सरकारने ठरविलेले असलेली 10 ते 20 टक्के रक्कम घेऊ. परंतु अशा ठिकाणी सरकारची जमीन उपलब्ध नसेल आणि कोणी खाजगी व्यक्तीने सांगितले की, माझ्या जमिनीवर तू घरकुल बांध व मला जमिनीचा मोबदला दे. अशा प्रकारे खाजगी व्यक्ती सदर जमीन घरकुल बांधण्यासाठी देण्यास तयार असल्यास, 50 हजार रुपयांपर्यंत अशा जमिनी खरेदी करण्यास पैसे देण्यासंबंधी राज्य शासनाने निर्णय घेतला आहे. अशा प्रकारे घरकुल बांधण्यासाठी दुसरी जमीन खरेदी कर, त्यावर तु आपले घरकुल बांध. त्यासाठी शासनाकडून 50 हजार रुपये दिले जातील. अशा जमिनींवर त्यांना घरकुल बांधता येईल. दुसरी बाब अशी आहे की, ग्रामीण भागात हजारो ठिकाणी झोपड्या आहेत, त्या गावठाणात बसलेल्या आहेत. परंतु त्या जमिनी नियमित नाहीत, अतिक्रमित आहेत. अशा गायरान जमिनींवरील अतिक्रमण सोडून, ज्या ठिकाणी रहिवासासाठी ज्यांनी घरकुलांचे बांधकाम केलेले असेल किंवा त्या ठिकाणी एखादे पक्के घर बांधलेले असले तरी

...2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.16008.....

श्री.एकनाथराव खडसे....

गायरान जमिनींवरील सोडून महसूल जमिनींवर असलेली घरे नियमानुकूल करण्याचा राज्य शासनाने निर्णय घेतलेला आहे. या निर्णयाच्या अनुषंगाने त्यांचे व्हॅल्यूएशन करणे, किंमत ठरविणे ही प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर अशी अतिक्रमणे नियमित करण्याच्या संदर्भात राज्य शासनाकडून कार्यवाही करण्यात येईल.

श्री.रामराव वडकुते : मंत्री महोदयांनी उत्तरात सांगितले की, 1960 साली ही जमीन खालसा झाली. परंतु 1963 साली सह आयुक्तांनी निर्णय दिला होता की, ही जमीन खिदमत मास आहे, ती खालसा करता येत नाही. 1966 साली ती जमीन सेवाधारी इनाम आहे असे ते म्हणाले. सेवाधारी इनाम म्हणजे खिदमत मास जमीन होते अशी माझी धारणा आहे. एकीकडे खिदमत मास जमिनीवर कूळ लागत नाही, तरी सुध्दा उप जिल्हाधिकाऱ्यांनी ती जमीन बिल्डराला विक्री करण्याची परवानगी केली. उप जिल्हाधिकाऱ्यांनी चुकीच्या पध्दतीने जमीन विक्री करण्याची परवानगी दिली असल्यास याबाबतची चौकशी करुन त्यात ते दोषी आढळून आल्यास त्यांना निलंबित करणार आहात का ?

**सभापती** : सन्माननीय सदस्य, आपल्याकडे काही स्पेसिफिक केसेस असल्यास त्या मंत्री महोदयांकडे द्याव्यात. ते या संबंधी चौकशी करुन तो विषय संपवतील.

श्री.रामराव वडकुते : याच विषयामध्ये चुकीच्या पध्दतीने बिल्डरला जमीन विकण्यात आली आहे. मंत्री महोदयांनी सांगितले की, ही जमीन वक्फ बोर्डची आहे किंवा कसे हे ठरवावे लागेल. परंतु या संदर्भात बेकायदेशीरपणे जमीन विकण्यात आली आहे. अशा पध्दतीने जमीन विकता येत नाही. या प्रकरणी चौकशी करुन, त्यांच्याविरुध्द कारवाई करुन त्यांना निलंबित करणार आहात का ?

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, मी मघाशी उत्तरात सांगितले होते की, ही जमीन सेवाधारी इनाम आहे, ही खिदमत मास जमीन नाही. ही जमीन ज्याची होती त्याने 1974 साली ती जमीन मी अल्लाच्या नावाने वक्फ बोर्डला दान करीत आहे असे सांगितले व ती जमीन त्याने दिली. यामुळे विवाद निर्माण झाला. ती जमीन सर्व्हिस इनाम असताना त्याने वक्फला कशी



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.16008.....

श्री.एकनाथराव खडसे....

दिली ? सर्व्हिस इनामचा कायदा वेगळा आहे. वक्फला जमीन दिल्यानंतर ती परत सुध्दा घेता येत नाही, हस्तांतर करता येत नाही किंवा त्या जमिनीची विक्री करता येत नाही. वक्फ बोर्डकडे या संबंधी अपिल प्रलंबित आहे. त्या माध्यमातून ही जमीन सर्व्हिस इनाम आहे की वक्फची आहे हे निश्चित करायचे आहे. सरकारचे असे म्हणणे आहे की, ही जमीन सर्व्हिस इनाम आहे. परंतु वक्फ बोर्डला जमीन दान दिल्यानंतर त्यासाठी 1995 चा वक्फचा कायदा लागू होतो. यामुळे या संबंधी महसूल विभागाकडून निर्णय होणार नाही. वक्फच्या 1995 च्या कायद्यानुसार वक्फला या संदर्भात निर्णय घ्यावा लागणार आहे. आम्ही त्यांच्या निर्णयाची वाट बघत आहोत.

**सभापती** : सदर तारांकित प्रश्नावर 20 मिनिटांपासून चर्चा सुरु आहे.

श्री.धनंजय मुंडे : माननीय मंत्र्यांनी उत्तरात सांगितले की, ही जमीन सेवाधारी आहे. सदर जमिनीच्या मालकाने वक्फला दान करण्याचा निर्णय घेतला. सदर जमीन वक्फला दान केल्यामुळे हे प्रकरण वक्फ निकाली काढणार असल्यास ती जमीन सेवाधारी इनामाची असल्यासंबंधी वक्फ कसा निकाल देईन ? सेवाधारी इनामाची जमीन वक्फला देण्यात आली आहे. या प्रकरणी वक्फ निकाल देणार आहे व त्या निकालाची राज्य शासन वाट बघत आहे व त्यानंतर राज्य शासन निर्णय घेणार आहे. या संदर्भात वक्फकडून काय अपेक्षित आहे ? सेवाधारी इनाम जमिनीच्या बाबत वक्फ काय निर्णय देणार आहे ?

**सभापती** : मंत्री महोदय, त्यांचे असे म्हणणे आहे की, Transfer from Sevadhari Inam to वक्फ हेच बेकायदेशीर आहे.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, आपले म्हणणे बरोबर आहे. मंत्री महोदयांनी या संदर्भात उत्तरात माहिती दिली आहे.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, दिनांक 11/7/1974 रोजी सदर जमिनीची सर्व्हिस इनाम म्हणून नोंद होती. त्यांनी ही जमीन दिनांक 11/7/1974 रोजी वक्फ बोर्डला रजिस्ट्रर करुन दिली. सदर जमीन वक्फ बोर्डकडे गेल्यामुळे दिनांक 11/7/1974 रोजी सदर जमीन वक्फ मिळकत म्हणून रजिस्ट्रर केल्याचे दिसून येते. सदर दिवशी ती जमीन वक्फची

...4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.16008.....

श्री.एकनाथराव खडसे....

मिळकत असल्याचे नोटीफिकेशन निघाले. त्यापूर्वी ती जमीन सर्व्हिस इनाम होती. म्हणून या संदर्भात वक्फ निकाल देऊ शकते की, सध्या त्या जमिनीची स्थिती काय आहे. ती जमीन सर्व्हिस इनामची आहे की वक्फची आहे ? या संदर्भात सदर जमीन वक्फच्या नावाने असल्याबाबत नोटीफिकेशन निघाले होते. यामुळे सदर जमीन वक्फची झाली. परंतु सदर जमीन सर्व्हिस इनामची आहे की वक्फची आहे, यासंबंधी एका व्यक्तीने त्यांच्याकडे अपिल दाखल केले. अपिल कोणीही करु शकतो. त्या संदर्भात वक्फ बोर्ड जो निर्णय घेईन, त्या निर्णयाची अंमलबजावणी केली जाईल.

**सभापती** : तारांकित प्रश्न क्रमांक 14874....

श्री.रामराव वडकुते : सभापती महोदय, या प्रकरणी जमिनीची बेकायदेशीरपणे विक्री झाली आहे.

**सभापती** : मी आता पुढे गेलो आहे. आपण कृपया खाली बसावे.

---------

...5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**टेंभापुरी, लिंबेजळगांव (ता.गंगापूर, जि.औरंगाबाद) या गावातील प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या पुनर्वसनाबाबत**

**(2) * १४८७४ श्री.सतिश चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(1) टेंभापुरी, लिंबेजळगांव (ता.गंगापूर, जि.औरंगाबाद) या गावासह २३ गावातील प्रकल्पग्रस्त शेतक-यांना शासनाने दिलेली आश्वासने पुर्ण करण्यात आली नसल्याने सदर गावातील प्रकल्पग्रस्त शेतकरी माहे मार्च, २०१५ पासुन ठिय्या आंदोलन करत आहेत, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, सदर आंदोलकांकडे शासनाने साधी चौकशीही केली नसल्याने प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले, हे ही खरे आहे काय,
(3) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(4) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या प्रलंबित मागण्यासह पुनर्वसन करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(5) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप कांबळे, श्री. एकनाथराव खडसे यांच्याकरिता :** (१) हे अंशतः खरे आहे.
(2) व (३) हे खरे नाही.
टेंभापूरी प्रकल्पामुळे बाधित प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन देय नागरी सुविधांनी युक्त गावठाणात करण्यात आले आहे. लिंबेजळगाव येथील नागरी सुविधा जिल्हा परिषदेस हस्तांतरित करण्यात आल्या असून शिवराई येथील सुविधांच्या हस्तांतरणाची कार्यवाही सुरू आहे. उपरोक्त ठिय्या आंदोलनाचे अनुषंगाने प्राप्त निवेदनातील विविध मागण्यांबाबत आंदोलनकर्त्यांसह मा.मंत्री (म.व पु.) विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी यांचे स्तरावर बैठका घेण्यात आलेल्या असून, पुनर्वसनाशी संबंधित तसेच देय मागण्यांबाबत विहीत मुदतीत नियमानुसार कार्यवाही करणेबाबत संबंधित विभाग/अधिकाऱ्यांना निर्देशित करण्यात आले आहे.
(4) प्रश्न उद्‌भवत नाही.
(5) प्रश्न उद्‌भवत नाही.

सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने उत्तरात सुधारणा करु इच्छितो. प्रश्न क्रमांक 2 व 3 च्या लेखी उत्तरात "शिवराई येथील सुविधांच्या हस्तांतरणाची कार्यवाही सुरु आहे." या ऐवजी "शिवराई येथील सुविधांच्या हस्तांतरणाची कार्यवाही झालेली आहे." असे वाचावे.

**सभापती** : ठीक आहे.

श्री.सतीश चव्हाण : सभापती महोदय, हा प्रकल्प 1979 मधील आहे. लेखी उत्तरात असे नमूद केले आहे की, देय नागरी सुविधांनी युक्त गावठाणात करण्यात आले आहे. ही 23 गावे

...6

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.14874.....

श्री.सतीश चव्हाण....

आहेत. परंतु त्या गावांना एकही सुविधा दिलेली नाही, सर्व सुविधा अपूऱ्या आहेत. लेखी उत्तरात पुढे असे नमूद केले आहे की, "जिल्हाधिकारी यांचे स्तरावर बैठका घेण्यात आलेल्या आहेत." सभापती महोदय, 25 वर्षांपासून सदर बैठका सुरु आहेत, त्यातून काही निष्पन्न झाले नाही. आता आम्ही प्रश्न विचारला म्हणून त्यांनी माहिती दिली आहे. सदर लोक 45 दिवसांपासून तेथे बसले होते, त्यावेळी तेथे त्यांना भेटण्यासाठी कोणीही गेले नव्हते. या संदर्भात विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकारी कोणतीही कार्यवाही करीत नाहीत. माझे स्पेसिफिक प्रश्न आहेत. या गावांच्या पुनर्वसनासाठी आपल्या अध्यक्षतेखाली बैठक घेऊन सदर प्रकरण निकाली काढणार आहात का ? या संदर्भात एक सुध्दा चारीचे काम पूर्ण झालेले नाही. खाली असलेल्या कमानच्या जमिनीवर बागाईती शिक्के मारण्यात आले आहेत. यामुळे संबंधितांना मोठा भूर्दंड पडतो, त्यांना शासनाच्या सुविधा मिळत नाही, स्टॅम्प ड्युटी भरावी लागते. यामुळे शेतीपर्यंत जाणाऱ्या चाऱ्यांची कामे जो पर्यंत पूर्ण होत नाहीत, तो पर्यंत सदर जमिनीच्या संदर्भात मारलेले बागाईती शिक्के काढणार आहात का ?

श्री.दिलीप कांबळे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी 2 प्रश्न विचारले आहेत. या संदर्भात अधिवेशनानंतर तातडीने एक बैठक घेण्यात येईल. परंतु सदर जमिनींवरील शिक्के काढण्याच्या संदर्भात शासन विचार करीन.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, प्रकल्पग्रस्तांचा मूळ प्रश्न आहे. या प्रकरणी प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन झालेले नाही. सदर काम जिल्हा परिषदेकडे वर्ग करण्यात आले. परंतु या कामासाठी त्यांच्याकडे पुरेसा निधी उपलब्ध नाही. गंगापूर आणि वैजापूर तालुक्यांमध्ये सातत्याने असे घडत आहे. मी एक ते दीड महिन्यांपासून तेथे आहे. मी स्वतः सदर प्रकल्पाला भेट दिली होती. तेथे पाणी नाही. वैजापूर तालुक्यात बांभुळटे नावाचे गाव आहे. तेथील धरणात, तलावात पाणी नाही. तेथील शेतकऱ्यांना अद्याप मोबदला मिळालेला नाही.

यानंतर C-1....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.14874.....

श्री.जयंत प्र.पाटील......

म्हणून त्या ठिकाणी शेतकरी येतात आणि तलावातील गाळ काढण्याचे काम थांबवितात. ज्या ठिकाणी धरण बांधते त्या ठिकाणच्या विस्थापित लोकांचे पुनर्वसन तातडीने करुन तेथील लोकांना शासन नागरी सुविधा परिपूर्ण करुन देईल काय, जिल्हा परिषदेकडे वर्ग केलेली कामे आहेत त्याकरिता शासनाने जिल्हा परिषदेला किती रक्कम दिली व किती कामे प्रगतीपथावर आहेत?

श्री.दिलीप कांबळे : सभापती महोदय, मी सुरुवातीलाच सांगितले की, ज्या सुविधा या गावांना देण्याची आवश्यकता होती त्या सुविधा दिलेल्या आहेत.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मी प्रत्यक्ष त्या ठिकाणी गेलो होतो, तेथे सुविधा दिलेल्या नाहीत.

**सभापती :** पुनर्वसनाविषयी मला फार आस्था आहे. या प्रकल्पाच्या संदर्भातील पुनर्वसनाबाबत माननीय सदस्यांना आस्था असल्याचे किंवा त्यांच्याकडे त्या संदर्भात काही माहिती उपलब्ध आहे दिसून येते. मंत्री महोदय किंवा राज्यमंत्र्यांनी माननीय सदस्यांकडील माहिती जाणून घेऊन बैठक घ्यावी.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, या गावांना 19 नागरी सुविधा द्यावयाच्या होत्या त्या पुरविण्यत आलेल्या होत्या. या नागरी सुविधा पूर्ण करण्यात आल्या आणि त्या नागरी सुविधांसह सर्व गावठाणे जिल्हा परिषदेकडे वर्ग करण्यात आली आहेत. या संदर्भात मी माझ्या अध्यक्षतेखाली एक बैठक घेतली होती. गावकऱ्यांची मागणी होती की, ज्या सुविधा पूर्ण झाल्या त्या फार पूर्वी केल्यामुळे शिल्लक राहिलेल्या नाहीत. त्यांची देखभाल व दुरुस्ती झालेली नाही. म्हणून नव्याने नागरी सुविधा निर्माण कराव्यात अशा स्वरुपाची त्यांची मागणी होती. मी बैठक घेऊन ग्रामस्थांशी चर्चा केली आहे. माझ्या अध्यक्षतेखाली बैठक घेऊन सर्व माहिती जमा केली आणि सरकारकडून न्याय देण्याचा प्रयत्न झाला आहे.

सभापती महोदय, वरील दोन्ही गावातील 14 नागरी सुविधांची सर्व कामे फार पूर्वी झालेली आहेत. नवीन गावठाणात सर्व प्रकल्पग्रस्तांना भूखंड वाटप केले आहेत. दोन्ही गावांच्या पुनर्वसनासाठी एकूण 242 लाख रुपये त्या काळात खर्च झाला आहे. दिनांक 1.8.1994 रोजी

...2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.14874..... श्री.एकनाथराव खडसे...

लिंबेजळगाव गावाच्या नागरी सुविधा पूर्ण करुन ग्रामपंचायतीकडे हस्तांतरित करण्यात आल्या आहेत. दिनांक 5.5.2015 रोजी माझ्या दालनात बैठक झाल्यानंतर पुनर्वसन समितीला संयुक्त पाहणी करण्याच्या सूचना मंत्रालयातून दिलेल्या आहेत. त्यानुसार जिल्हाधिकारी यांच्याकडील पुनर्वसन समितीने त्या ठिकाणी जाऊन प्रत्यक्ष पाहणी केली. त्या पाहणीमध्ये असे दिसून आले की, ज्या सुविधा पूर्वी केलेल्या होत्या त्यांची मोडतोड झाली असून त्या निरुपयोगी झाल्या आहेत. त्यामुळे नवीन सुविधा त्या गावासाठी तयार केल्या पाहिजेत. 1994 मध्ये तयार केलेल्या सुविधा त्या ठिकाणी शिल्लक नाहीत अशी त्या गावातील अवस्था आहे. म्हणून गावकऱ्यांची मागणी आहे की, शासनाने आम्हाला नवीन सुविधा तयार करुन द्याव्यात.

सभापती महोदय, कायद्यामध्ये नवीन सुविधा करण्याची तरतूद नाही. या संदर्भात काय करता येईल याबाबत जिल्हाधिकाऱ्यांचा अहवाल मागविण्यात आला आहे. या सुविधा पुनर्वसनाखाली होत नसतील तर अन्य कोणत्या योजनेच्या माध्यमातून टप्प्याटप्प्याने करता येईल का यासाठी राज्य सरकार प्रयत्नशील आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : अधिवेशन काळात मंत्री महोदयांनी आपल्या दालनात बैठक घ्यावी.

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, राज्यात अनेक प्रकल्पांच्या अनुषंगाने पुनर्वसनाचे प्रश्न रेंगाळले आहेत. कोल्हापूर जिल्हयातील काळम्मावाडी प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न अद्यापही प्रलंबित आहेत. हे प्रश्न निकाली काढण्यासाठी शासनाने कालमर्यादेत निर्णय घेतला पाहिजे. अन्यथा प्रत्येक अधिवेशनात हे पुनर्वसनाचे प्रश्न चर्चेला येत असतात आणि येत राहतील.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, काळम्मावाडी धरण असेल किंवा टेंभापुरी प्रकल्प असेल, या धरणाच्या अनुषंगाने ज्या नागरी सुविधा आहेत त्या मंजूर करण्यात आलेल्या आहेत. पर्यायी जमीन घेऊन गावठाणाचे पूर्णत: 100 टक्के प्लॉट वाटप करण्यात आलेले आहेत. आवश्यकता असेल तर या संदर्भात पुणे विभागात जी जी धरणे आहेत त्या संदर्भात बैठकीचे आयोजन करण्यात येईल. यापूर्वी जिल्हाधिकारी आणि विभागीय आयुक्त यांना पुनर्वसनाच्या संदर्भातील माहिती गोळा करुन विशेष बैठक पुण्याला घ्यावी अशा स्वरुपाच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

...3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.14874.....

श्री.अमरनाथ राजूरकर : सभापती महोदय, नांदेड जिल्हयातील लेंडी प्रकल्प 40 वर्षापूर्वी अस्तित्वात आलेला आहे. त्या ठिकाणी अद्याप काहीही काम झालेले नाही. त्यासाठी शासन काही प्रयत्न करणार आहे काय?

श्री.एकनाथराव खडसे : माननीय सदस्यांनी विचारलेला प्रश्न वेगळा आहे.

--------

...4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पीक विमा धोरणात नुकसान भरपाईची तरतूद करण्याबाबत**

***(३) १४७०७ श्री.नरेंद्र* पाटील, श्री.सुनील तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.जयवंतराव जाधव, श्री.धनंजय मुंडे, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.संदिप बाजोरिया :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

*(१)* शासनाने शेतकऱ्यांच्या नवीन पीक विमा धोरणाला मंजुरी देऊन विम्याचा हप्ताही कमी करण्यात आला, मात्र अवकाळी पाऊस, गारपीट व वन्य प्राण्यांमुळे होणाऱ्या नुकसान भरपाईची या धोरणात तरतूद नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

*(२)* असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

*(३)* असल्यास, चौकशीत काय आढळून आले. तद्नुसार सदर पीक विमा धोरणात नुकसान भरपाईची तरतूद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

*(४)* नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

***प्रा.राम शिंदे,* श्री. एकनाथराव खडसे *यांच्याकरिता* :** (१), *(२)* व (३) खरीप हंगाम २०१६ पासून प्रधानमंत्री फसल विमा योजना (PMFBY) ही नवीन पीक विमा योजना राज्यात राबविणेबाबत केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना प्राप्त झाल्या असून सदर योजना लागू करण्यासंदर्भातील प्रस्ताव राज्य शासनाच्या विचाराधीन आहे.

सदर योजनेतंर्गत काढणी पश्चात पिकांचे होणारे नुकसान या बाबी अंतर्गत काढणी/कापणी नंतर चक्रीवादळ, अवकाळी पावसामुळे पीकांचे नुकसान झाल्यास सदर नुकसानीस विमा संरक्षण देण्याची तरतूद आहे. त्याचप्रमाणे, शेतात पुराचे पाणी आल्याने होणारे नुकसान, भुस्खलन व गारपीट या स्थानिक नैसर्गिक आपत्तीमुळे होणाऱ्या नुकसानीस देखील विमा संरक्षण देण्याची तरतूद आहे.

*(४)* प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.नरेंद्र पाटील : सभापती महोदय, राज्यातील दुष्काळी परिस्थितीबाबत सभागृहात दोन दिवस विस्तृत चर्चा झालेली आहे, त्या अनुषंगाने आज मंत्री महोदय समाधानकारक उत्तर देतील अशी अपेक्षा आहे. दुष्काळाच्या परिस्थितीची सर्कल अधिकारी, बीडीओ, ग्रामपंचायत सदस्य, सहकारी संस्था व सहकारी सोसायट्यांच्या माध्यमातून प्रत्येक गावात, शेतावर जाऊन पाहणी केली जाते व त्याचा अहवाल तहसीलदार कार्यालयामार्फत जिल्हाधिकाऱ्यांकडे येतो. आमच्या असे निदर्शनास आले आहे की, पश्चिम महाराष्ट्रातील काही तालुक्यामध्ये सर्कल अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष गावांना भेट न देता कार्यालयात बसून अहवाल तयार केला व त्या अहवालानुसार गावात दुष्काळ नाही, शेतीचा प्रश्न नाही, पाण्याचा प्रश्न नाही असे नमूद केले आहे. अशा अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल काय?

**सभापती** : माननीय सदस्यांनी स्पेसिफिक केस सांगावी.



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.14707.....

श्री.नरेंद्र पाटील : सभापती महोदय, सातारा जिल्हयातील पाटण तालुक्याच्या संदर्भात मी दुष्काळाच्या संदर्भातील चर्चेमध्ये भाग घेत असताना मुद्दा मांडला होता. पाटण तालुक्यात प्रत्यक्ष जाऊन दुष्काळाची पाहणी केली नाही, अशा अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल काय?

प्रा.राम शिंदे : सभापती महोदय, होय.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, उत्तरामध्ये म्हटले आहे की, केंद्र सरकारकडून नव्याने प्रधानमंत्री फसल बिमा योजनेची घोषणा करण्यात आली असून ही घोषणा राज्यात ही योजना लागू करण्याची बाब राज्य सरकारच्या विचाराधीन आहे. केंद्रात ज्या पक्षाचे सरकार आहे त्याच पक्षाचे सरकार राज्यात असताना सरकार केंद्राची योजना लागू करण्याची बाब विचाराधीन ठेवणार असेल तर सभागृहाला खुलासा झाला पाहिजे. ही योजना राज्यात किती दिवसात लागू केली जाईल? नवीन पीक विमा योजनेत प्रिमियम आणि जोखीम भरपाईबाबत जून्या योजनेऐवजी नेमके कोणते बदल करण्यात येणार आहेत?

प्रा.राम शिंदे : सभापती महोदय, प्रधानमंत्री फसल बिमा योजना ही केंद्र सरकारने सुरु केलेली नवीन योजना आहे. पूर्वीच्या योजनेऐवजी ही नवीन योजना आली आहे. त्या संदर्भातील सर्व अहवाल राज्य सरकारकला प्राप्त झाले आहेत. त्या अनुषंगाने कॅबिनेटपुढे जाऊन मान्यता घेणे ही प्रोसीजर आहे. दर वेळेला ज्या योजना केंद्र सरकारच्या माध्यमातून राज्य सरकारसाठी मंजूर केल्या जातात त्या योजना राज्यात लागू करीत असताना कॅबिनेटपुढे जाऊन त्यावर साधकबाधक विचार होतो आणि त्यानंतर ती योजना राज्यात लागू केली जाते म्हणून असे उत्तर दिले आहे. केंद्रात आणि राज्यात एकाच पक्षाचे सरकार आहे. लवकरच येणाऱ्या कॅबिनेटपुढे ही नवीन योजना सादर करुन खरीप हंगामात लाभ देण्याच्या संदर्भात सरकार विचार करेल. गेल्या वर्षीच्या तुलनेत जोखीम आणि हिस्सा खरीप हंगामामध्ये 2 टक्के, रब्बी हंगामात 1.5 टक्के आणि नगदी पिकाबाबत 5 टक्के शेतकऱ्याचा सहभाग आहे.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी दिलेल्या उत्तरामुळे मी हा प्रश्न उपस्थित करीत आहे. उत्तरामध्ये स्पष्ट म्हटले आहे की, "सदर योजनेंतर्गत काढणी पश्चात पिकाचे होणारे नुकसान या बाबी अंतर्गत काढणी/कापणीनंतर चक्रीवादळ, अवकाळी पावसामुळे पिकाचे नुकसान झाल्यास सदर नुकसानीस विमा संरक्षण देण्याची तरतूद आहे."

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

नंतर डी.1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.14707....

श्री.धनंजय मुंडे .....

सभापती महोदय, काढणी, कापणी झाल्यानंतर वादळ आले, गारपीट झाली तर त्याबाबतीत हे लागू आहे. पण पीक उभे असेल आणि अतिवृष्टी झाली, गारपीट झाली, वादळ झाले आणि त्यामुळे पिकांचे नुकसान झाले तर ते नुकसान या पीक विमा योजनेमध्ये लागू करणार आहात काय ?

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, देशभरामध्ये अत्यंत महत्त्वाकांक्षी अशा स्वरूपाची योजना केंद्र सरकारने जाहीर केली आहे. गेल्या कित्येक वर्षामध्ये देशातील शेतकऱ्यांची मागणी होती की, वेगवेगळ्या कारणांमुळे शेती पिकांचे नुकसान होते, परंतु, त्याला विम्याचे संरक्षण मिळत नाही. राज्य शासनाकडून जी मदत दिली जाते तो तोकडी असते. पूर्वीपासून विमा योजनेचा लाभ हा फक्त फळपिकांना मिळत होता. गेल्या सहा सात वर्षापासून फळपीक विमा योजना सुरू झाली. यामध्ये विमा कंपन्या पुढे येत नव्हत्या, पुढाकार घेत नव्हत्या, प्रतिसाद देत नव्हत्या. त्यासाठी विमा कंपनीचे प्रीमियम वाढवून द्यावे लागत होते. शेकडी 24 टक्के, 28 टक्के रक्कम शेतकऱ्याला द्यावी लागत होती. त्यामुळे शेतकऱ्यांचा प्रतिसाद कमी मिळत होता. मागच्या कालखंडामध्ये आपण वेगवेगळ्या विमा कंपन्यांकडून स्पर्धात्मक निविदा मागविल्या. तेव्हा केळी सारख्या पिकाला शेकडी 22 टक्के दर द्यावा लागला. एवढ्या मोठ्या प्रमाणावर प्रत्येक शेतकऱ्याला पैसा भरणे शक्य होत नव्हते. विम्याचा हप्ता हा कमी असला पाहिजे आणि लाभ जास्त असला पाहिजे अशा स्वरूपाची मागणी देशभरातील सर्वच ठिकाणांहून होत होती. पीक विम्याचा लाभ निव्वळ फळबाग पिकांना लागू न करता सर्वंकष पिकांना लागू करण्याची मागणी सातत्याने करण्यात येत होती. तशी मागणी राज्य सरकारकडे देखील आली. पण सर्व पिकांसाठी पैसा देऊ एवढी राज्य शासनाकडे क्षमता नाही. त्यामुळे केंद्र शासनाने पंतप्रधान फसल विमा योजना सुरू केली. या योजने अंतर्गत जिरायती पिकांसाठी एक टक्का रक्कम भरणे, सहा महिन्यांसाठी येणारी निम बागायती पिकांसाठी दोन रूपये शेकडी आणि बारा महिने केळी सारखी किंवा अन्य पीक आहे यांच्यासाठी रूपये 100 मागे पाच रूपये भरण्याचे मान्य केलेले आहे. यामध्ये वादळ, गारपीट यांच्यामुळे नुकसान झाले तर

..2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.14707....

श्री.एकनाथराव खडसे....

त्यालाही संरक्षण दिले पाहिजे अशी मागणी होती. ते देण्यात येत नव्हते ते ही यामध्ये समाविष्ट करण्यात आलेले आहे. टंचाईसदृश्य परिस्थिती, कमी पावसामुळे, नैसर्गिक आपत्तीमुळे जेथे जेथे अशा स्वरूपाचे नुकसान होईल त्याला विम्याचे संरक्षण देण्याचा निर्णय या विमा योजनेच्या माध्यमातून घेण्यात आला आहे. यामध्ये सर्वंकष म्हणजे सर्वच पिकांचा समावेश केला असल्यामुळे बाकीच्यांना लाभ होईल. जुन्या विमा योजनेमध्ये केंद्र व राज्य शासनाचे विम्याचे अनुदान प्रत्येकी 5 टक्के होते. त्यात 10 टक्के शेतकऱ्याला भरावे लागत होते. आता नवीन योजनेमध्ये शासनाचे 45 टक्के, केंद्र शासनाचे अनुदान 45 टक्के आणि उर्वरित 5 टक्के अनुदान शेतकऱ्याने भरावयाचे आहे. त्यामुळे 200 कोटी रूपये राज्य शासनाला जास्तीचे भरावे लागणार आहेत असा एक अंदाज आहे. ही योजना या आर्थिक वर्षापासून म्हणजे येत्या 15 दिवसांमध्ये लागू करण्यासंबंधीच्या सूचना केंद्र शासनाने दिलेल्या आहेत. यासंबंधीचा प्रस्ताव मंत्रिमंडळापुढे आलेला आहे. साधारणतः राज्य सरकारला या संदर्भामध्ये दोन हजार कोटी रूपयांपर्यंत खर्च येणार आहे. शेतकऱ्यांचा अधिकचा 45 टक्के पैसा राज्य शासनाने भरावयाचा आहे. बाकी एक टक्का शेतकऱ्यांनी भरावयाचा आहे. 45 अधिक 45 अधिक उरलेले पैसे अशा स्वरूपाचे हे सूत्र आहे. त्यामुळे केंद्र व राज्य सरकार काही प्रमाणात त्या विमा कंपनीला पैसे देईल. शेतकऱ्यांवर पडणारा बोजा कमी केला जाईल. पूर्वीच्या विम्यामध्ये 60 टक्के जोखीम स्तर होता. आता जोखीम स्तर 70 टक्क्यांपर्यंत वाढविण्यात आलेला आहे. त्यामुळे अधिकाधिक लाभ शेतकऱ्यांना होईल अशा स्वरूपाची व्यवस्था या पंतप्रधान फसल पीक विमा योजनेमध्ये करण्यात आलेली आहे.

......

..3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**ता.प्र.क्र.15966 च्या कार्यरितीबद्दल**

**सभापती :** आजच्या तारांकित प्रश्न क्रमांक 15966 संबंधी माननीय मंत्री महोदय आज सकाळी माझ्याशी फोनवरून बोलले आहेत. त्यासंबंधी आपल्याला काही बोलावयाचे असेल तर माझी आपणास बोलण्यास अनुमती आहे.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, मला आपल्याला विनंती करावयाची आहे. मी गेली अनेक वर्ष या विधिमंडळामध्ये काम करीत आहे. पण मला या तारांकित प्रश्नासंबंधी अनुभव नवीन आहे. एका तारांकित प्रश्नावर 11 लेखी प्रश्न विचारण्यात आले आहे. प्रश्नाचे स्वरूप काय असले पाहिजे, तातडी काय असली पाहिजे, प्रश्न किती महत्वाचा आहे हे नेहमी पाहिले जाते. नव्हे सर्वच प्रश्न महत्त्वाचे असतात. पहिला प्रश्न विचारल्यानंतर त्याला दुसरा, तिसरा उप प्रश्न विचारला तर ते मी समजू शकतो. मला 50 प्रश्न विचारले तरी त्यास उत्तर देण्यास मी समर्थ आहे. मला त्याची चिंता नाही. सभागृहात आज पर्यंत 11 लिखित प्रश्न विचारल्याचे हे पहिले उदाहरण आहे. मी आपल्याला विनंती करतो की, गेल्या 50-60 वर्षातील अशा स्वरूपाचा एखादा तारांकित प्रश्न असेल व तो आपण निदर्शनास आणला तर मलाही त्यासंबंधी माझे समाधान करून घेता येईल. सभागृहात प्रश्न विचारण्यासंबंधात नियम आहेत. प्रश्न कसा असावा, त्याची तातडी कशी असावी, उप प्रश्न किती विचारावेत यासंबंधात नियम आहेत. हे सर्व नियम बाजूला सारून अशा स्वरूपाचे प्रश्न येतात याबद्दल मी आपल्याकडे हरकत नोंदविली. मी सभागृहात हरकत नोंदविली नाही. आपण सभागृहात प्रश्न पुकारल्यानंतर त्यावर उत्तर द्यावे लागणार आहे. या प्रश्नाच्या अनुषंगाने सभागृहात चर्चा देखील आहे. आपल्या सभागृहामध्ये अलीकडे जी पद्धत सुरू आहे त्या पद्धतीचा पुनर्विचार करावा. गेल्या 60-70 वर्षापासून हे सभागृह सुरू आहे. त्याच्या कामकाजामध्ये बदल करावयाचा असेल तर त्यासंबंधात कामकाज सल्लागार समितीमध्ये चर्चा करता आली असती. नियम समितीमध्ये चर्चा करता आली असती. आपण आम्हाला सांगितले असते तर आम्ही होकार दिला असता. आम्ही आपल्या शब्दा बाहेर नाही. पण अशारितीने करणे हे योग्य नाही असे माझे मत आहे. शेवटी आपण अंतिम आहात.

..4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.गिरीश बापट : सभापती महोदय, दुष्काळ आणि आत्महत्या हा राज्यातील महत्वाचा प्रश्न आहे. सरकार हा प्रश्न टाळत नाही. किंबहुना सरकारला या प्रश्नाला उत्तर द्यायचे आहे. विधान परिषदेमध्ये वेगवेगळ्या आयुधातून, माध्यमातून दुष्काळावर आपण चार-चार तास चर्चा केली आहे. तेव्हा या विषयाचे गांभीर्य हे ठेवलेच पाहिजे. परंतु, एका लिखित प्रश्नामध्ये 11 प्रश्न विचारले आहेत. माझे म्हणणे आहे की, आपण वेगवेगळ्या माध्यमातून हे प्रश्न विचारावेत. त्यावर सरकार उत्तर देखील देईल. आताही माननीय मंत्री महोदय या सगळ्या प्रश्नांना उत्तरे देतील. पण अशी प्रथा सुरू झाली तर प्रॉब्लेम होईल.

**सभापती :** विषय असा आहे की, हा प्रश्न थोडा वेगळा झाला आहे या विषयी माझ्या मनात काहीही शंका नाही. 45 सन्माननीय सदस्यांनी अशा स्वरूपाचा प्रश्न विचारलेला आहे म्हणून आपल्याला एकत्रितपणे दहा उत्तरे द्यावी लागली आहेत. नियम बदलून काही केले आहे असे मला तरी वाटत नाही. पण माझ्या पुढची शंका अशी आहे की, या तारांकित प्रश्नाच्या माध्यमातून 10 प्रश्नांना 10 उत्तरे दिल्यानंतर सदस्यांना अपेक्षित असलेला न्याय हा मिळणार आहे की नाही ? हा प्रश्न सभापती म्हणून माझ्यासमोर आहे. ठीक आहे. आता जे झाले आहे ते झाले.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, ही प्रथा आता पुढेही सुरू राहणार आहे असे गृहीत धरायचे काय ?

**सभापती :** नाही. गृहीत धरायचा प्रश्न येणार नाही.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, मला आपल्याला एकच विनंती करावयाची आहे की, गेल्या 60-70 वर्षातील आपण असे एक उदाहरण माझ्या निदर्शनास आणून द्यावे. मग माझी देखील या संदर्भातील तक्रार राहणार नाही. मी आपल्या समोर एक उदाहरण मागतो आहे. मी आपल्या सर्व अधिकाऱ्यांना सांगतो की, त्यांनी एक तरी उदाहरण माझ्या लक्षात आणून द्यावे.

यानंतर श्री.अजित....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथराव खडसे...

तारांकित प्रश्न आणि लक्षवेधी सूचनेसंदर्भात नियम आणि निकष ठरलेले आहेत. आपण त्या निषकाच्या अधीन राहून तारांकित प्रश्न आणि लक्षवेधी सूचना स्वीकारत असतो. माझी उत्तर देण्यास हरकत नाही. परंतु अशा रितीने 11-15 प्रश्न कधीही विचारण्यात आले नव्हते.

**सभापती** : मी मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, तारांकित प्रश्नाच्या संदर्भातील नियमाच्या बाहेर जाऊन काही केलेले नाही. मंत्री महोदयांनी प्रश्न उपस्थित केला होता की, एका प्रश्नाला 11 प्रश्न कसे विचारण्यात आले आणि मी त्याचे उत्तर दिलेले आहे. या प्रश्नावर जवळपास 45 सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारलेले असल्यामुळे असे घडलेले आहे. तेव्हा प्रश्नाच्या संदर्भात तसे काही गृहीत धरण्याचे कारण नाही.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, हा प्रश्न सदनाच्या देखील लक्षात आला पाहिजे. पत्रकार कक्षात पत्रकार बसलेले आहेत. सन्माननीय सदस्यांनी हा जाणीवपूर्वक प्रश्न दिलेला आहे काय ? या सदनातील 78 सन्माननीय सदस्यांपैकी 45 सदस्यांनी प्रश्न दिलेला आहे आणि आपण प्रश्नांचे बॅलेट काढतो त्याप्रमाणे प्रश्न चर्चेला येतात. आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या संदर्भात 10-15 प्रश्न विचारण्यात आले असतील तर त्याचे उत्तर देण्यास सरकारला कोणती अडचण आहे ?

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, माझी उत्तर देण्यास हरकत नाही. हे सभागृह 1935 साली सुरु झाले तेव्हापासून 2016 पर्यंत एका प्रश्नावर 11 प्रश्न विचारण्यात आल्याचे एक तरी उदाहरण मला दाखवून दिल्यास, मी माझे शब्द मागे घेईन. प्रश्नाच्या संदर्भात काही नियम आणि निकष आहेत त्यानुसारच आपण काम करणार आहात की मनाप्रमाणे काम करणार आहात ?

**सभापती** : माननीय मंत्र्यांचे असे म्हणणे आहे की, मागील 60 वर्षात असे झाले नाही. त्यासंदर्भात मी त्यांना सांगू इच्छितो की, अशाप्रकारे 45 सन्माननीय सदस्यांच्या प्रश्नांचे एकत्रिकरण झाले किंवा कसे या संदर्भातील माहिती मी त्यांना नंतर देईन.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, या प्रश्नाच्या संदर्भात सभागृहाचे नेते माननीय श्री.एकनाथराव खडसे बोलले. त्यानंतर माननीय संसदीय कार्य मंत्री बोलले. या प्रश्नाचे गांभीर्य त्यांनी लक्षात घेतले पाहिजे.आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या संदर्भातील प्रश्न 45 सन्माननीय सदस्यांना 11 वेगवेगळ्या प्रश्नाच्या माध्यमातून का विचारावा लागतो आणि मंत्री महोदयांनी त्यावर आक्षेप घेऊन त्यामध्ये इतका वेळ घालविण्याची आवश्यकता नाही. आपण या संदर्भात उत्तर दिलेले आहे.

--------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**राज्यातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत देण्याबाबत**

**(4) * १५९६६ श्री.अमरसिंह पंडित, श्री.रामराव वडकुते, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, श्री.धनंजय मुंडे, डॉ.अपूर्व हिरे, श्री.माणिकराव ठाकरे, श्री.अमरिशभाई पटेल, श्री.संजय दत्त, श्री.हरिसिंग राठोड, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.जर्नादन चांदूरकर, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, डॉ.सुधीर तांबे, डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, श्री.अनिल भोसले, श्री.राहुल नार्वेकर, श्री.आनंद ठाकूर, श्री.जयंत पाटील, श्री.प्रकाश गजभिये, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.राजेंद्र जैन, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.शरद रणपिसे, श्री.सुभाष झांबड, श्रीमती दिप्ती चवधरी, श्री.सुनिल तटकरे, श्री.संदिप बाजोरिया, श्री.प्रकाश बिनसाळे, श्रीमती शोभाताई फडणवीस, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.जयवंतराव जाधव, ॲड.निरंजन डावखरे, प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यातील मराठवाडा, विदर्भ आणि उत्तर महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनी तसेच लातूर, नांदेड, नाशिक, जळगाव, धुळे, यवतमाळ, जालना, चंद्रपूर व सांगली जिल्ह्यात नापिकी, दुष्काळ परिस्थिती, अवर्षण, गारपीट, अवकाळी पाऊस, निसर्गाच्या लहरीपणा, कर्जबाजारीपणा आणि बेरोजगारीला कंटाळून मागील वर्षभरात राज्यात ३२२८ शेतकरी आत्महत्या झाल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, सांजोर (ता.जि.धुळे) येथील शालीग्राम पाटील आणि वाळकी, ता.चोपडा येथील अशोक गिरधर धनगर या शेतकऱ्यांनी माहे डिसेंबर, २०१५ मध्ये तर खरपुडी (ता.जि.जालना) येथील शेषराव सखाराम शेजूळ या ४० वर्षीय शेतकऱ्याने कर्जबाजारीपणा व सततच्या नापिकीमुळे स्वतः अंत्यविधीचे निमंत्रण देऊन दिनांक १४ जानेवारी, २०१६ रोजी गळफास घेऊन आत्महत्या केली असल्याचे माहे डिसेंबर, २०१५ व जानेवारी, २०१६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, मौजे मारवाडी (ता.नेर, जि.यवतमाळ) येथील शेतकऱ्यांनी माहे डिसेंबर, २०१५ मध्ये व मौजे आमनी (ता.आर्णी, जि.यवतमाळ) येथील शेतकरी श्री.मिथून शिवदास राठोड यांनी शेती नापिकी व कर्जामुळे दिनांक ०६ ऑगस्ट, २००९ रोजी आत्महत्या केली, हे ही खरे आहे काय,

(4) असल्यास, अमरावती विभागात ११७९, औरंगाबाद विभागात ११३० शेतकऱ्यांनी तर नाशिक जिल्ह्यात ४२६,६ जळगांव जिल्ह्यात १३६, सांगली जिल्ह्यात १९८८, चंद्रपूर जिल्ह्यात १२३ वव मराठवाड्यात ११०९



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.15966...

शेतकऱ्यांनी गतवर्षात आत्महत्या केल्याचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले असून राज्यात दि.१ ऑक्टोबर,२०१४ ते जानेवारी, २०१६ पर्यंत किती शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत, त्यापैकी किती महिला शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत,

(5) असल्यास, दुष्काळाने संपूर्ण राज्य होरपळून गेले असतांना यवतमाळ जिल्हयात होत असलेल्या आत्महत्या यामुळे हिवाळी अधिवेशनात शासनाने ३,५८७ कोटी चे निधी (पॅकेज) जाहीर केले असून मदतीच्या पहिल्या टप्यात शासनाने २ हजार कोटी रुपये दिले यातील केवळ ५ लाख रुपये यवतमाळ जिल्ह्याच्या वाट्याला आले असून इतर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना वितरीत केलेल्या अनुदानाची जिल्हानिहाय संख्या व रक्कम किती आहे,`

(6) असल्यास, आत्महत्याग्रस्त ३२२८ पैकी ९०३ शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना मदत देण्याचे प्रस्ताव अपात्र ठरवण्यात आले तर ४८४ प्रस्ताव प्रलंबित आहेत, हे ही खरे` आहे काय, u

(7) असल्यास, शासनाकडून आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना एक लाख रुपयांची मदत सन २००५ सालापासून देण्यात येते, परंतु, एक लाख मदतीमधून फक्त रोख ३० हजार रुपयांचा चेक दिला जातो व राहिलेल्या ७० हजार रुपयांचे बचत प्रमाणपत्र देण्यात येते, त्यांचे पैसे ५ वर्षांनी दिले जाते, हे ही खरे आहे काय,

(8) असल्यास, आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबियांच्या वारसांना १ लक्ष रुपये सानुग्रह अनुदानामध्ये वाढ करून ही रक्कम २ लक्ष रुपये करावी अशी मागणी लोकप्रतिनिधी व सामाजिक कार्यकर्त्यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(9) असल्यास, आत्महत्याग्रस्तत शेतकऱ्यांच्या वारसांना इतर राज्यांमध्ये रुपये चार लाख नुकसान भरपाई मिळते त्याप्रमाणे महाराष्ट्रर शासनाने सुद्धा राज्यातील आत्महत्याग्रस्त कुंटुंबाच्या मदतीमध्ये वाढ करावी असे मा. उच्च न्यायालयाने शासनास दिनांक २२ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निर्देश दिले, हे ही खरे आहे काय,

(10) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून राज्यातील शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना वाढीव आर्थिक मदत व निधी देणेबाबत, सानुग्रहात वाढ करण्याबाबत, कर्जमाफी तसेच राज्यातील वाढत्या शेतकरी आत्महत्या रोखण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(11) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

..4..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.15966...

**श्री.दिलीप कांबळे, श्री. एकनाथराव खडसे यांच्यकरिता :** (१) अंशतः खरे आहे.

राज्यात जानेवारी, २०१५ ते डिसेंबर, २०१५ या कालावधीत ३२२८ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या त्यापैकी १८४१ प्रकरणे शेती संकटामुळे झाल्याने त्यांना पात्र ठरवून मदत करण्यात आली आहे.

(2) धुळे जिल्ह्यात श्री.शालीग्राम संतोष पाटील, राहणार सांजोरी, तालुका, जिल्हा धुळे या शेतकऱ्याने दिनांक २८.१२.२०१५ रोजी आत्महत्या केलेली आहे. तर जळगाव जिल्ह्यातील वाळकी, तालुका चोपडा येथील अशोक गिरीधर धनगर या शेतकऱ्याने दिनांक २९.१२.२०१५ रोजी नापिकी व कर्जबाजारीपणाला कंटाळून आत्महत्या केलेली आहे.

तथापि या नाशिक विभागातील शेतकऱ्यांनी स्वतः अंत्यविधीचे निमंत्रण देऊन आत्महत्या केली असल्याची बाब खरी नाही.

(3) मौजे मारवाडी, ता.नेर येथील विशाल नामदेव पवार यांनी दिनांक १७.१२.२०१५ रोजी विहीरीत उडी घेऊन आत्महत्या केली आहे. सदर मृतकाचे वारसास मदत देण्यात आली आहे.

मौजे आमनी, तालुका आर्णी येथील मिथुन शिवदास राठोड, यांनी दिनांक ६.८.२००९ रोजी विष प्राशन करुन आत्महत्या केली आहे. सदर प्रकरण जिल्हा समितीने चालू कर्ज असल्यामुळे अपात्र घोषित केले आहे.

(4) होय.

दिनांक १ ऑक्टोबर, २०१५ ते जानेवारी, २०१६ पर्यंत विभाग निहाय शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

नाशिक विभाग-६६१, त्यापैकी १२ शेतकरी महिलांनी आत्महत्या केली आहे. अमरावती विभाग-अमरावती विभागामध्ये एकूण १५३६ शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत त्यापैकी १२४ महिला शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत.पुणे विभाग- पुणे विभागात एकूण ५ शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. कोकण विभाग- कोकण विभागातील ३ शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. औरंगाबाद विभाग- औरंगाबाद विभागात १४५४ शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. त्यापैकी ६७ महिला शेतकरी आहेत.

(5) होय.

शासनाच्या दिनांक २.१.२०१६ च्या आदेशान्वये एकूण २१ जिल्ह्यामध्ये ५० पैशांपेक्षा कमी पैसेवारी आलेल्या बाधित गावातील शेतकऱ्यांच्या प्राप्त माहितीनुसार रुपये ३५७८.४३ कोटी एवढ्या मंजूर निधी पैकी रुपये २००० कोटी एवढा निधी वितरीत करण्यात आला आहे.

(6) होय.

.5..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.15966...

श्री.दिलीप कांबळे......

(7) होय.

(8) व (९) अशाप्रकारची मागणी लोकप्रतिनिधी व सामाजिक कार्यकर्त्यांनी केली असल्याचे दिसून येत नाही. परंतु मा.उच्च न्यायालयाने आत्महत्या झालेल्या शेतकऱ्याला योग्य ती मदत देण्यात यावी अशी सुचना केली आहे.

(10) कै.वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशन अंतर्गत सर्व गरजु शेतकऱ्यांना अन्न सुरक्षा योजना, आरोग्य सुविधा, राजीव गांधी जीवनदायी योजनेचा लाभ देण्यात येत आहे. आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबियांच्या मुलांना मोफत शिक्षणाची ये ाजना, जलयुक्त शिवार योजनेअंतर्गत कामे, म.न.रे.गा. अंतर्गत कामे तसेच शेती विकासासंदर्भात शासनाच्या विविध विभागामार्फत उपाययोजना करण्यात येत आहेत.

(11) प्रश्न उद्‌भ्‍ावत नाही.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, पहिल्या प्रश्नाच्या लेखी उत्तरामध्ये असे म्हटलेले आहे की, राज्यात जानेवारी, 2015 ते डिसेंबर, 2015 या कालावधीत 3 हजार 228 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या, त्यापैकी 1 हजार 841 शेतकऱ्यांना मदत केलेली आहे. याचा अर्थ 3 हजार 228 शेतकऱ्यांच्या आत्महत्या झाल्या हे सरकारने मान्य केलेले आहे. उर्वरित शेतकऱ्यांच्या आत्महत्येची कारणे काय आहेत ? प्रश्न क्रमांक 8 व 9 चे लेखी उत्तर दिलेले आहे की, अशाप्रकारची मागणी लोकप्रतिनिधींनी केली असल्याचे दिसून येत नाही. या लेखी उत्तराला माझा आक्षेप आहे. कारण आम्ही मागील तीन अधिवेशनापासून सतत मागणी करीत आहोत की, राज्य सरकारकडून आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांना मदत मिळाली पाहिजे. सरकार दिशाभूल करणारे उत्तर देऊन या प्रश्नाचे गांभीर्य घालवीत आहे, अशाप्रकारचा आरोप मी करु इच्छितो. या विषयासंदर्भात सरकारने जी संवेदना दाखविणे आवश्यक होती ती न दाखविल्यामुळे इतक्या मोठ्या प्रमाणात प्रश्नावली तयार झालेली आहे हे सभागृहाच्या नेत्यांनी समजून घेणे आवश्यक आहे. उर्वरित 1400 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची नेमकी कारणे काय आहेत ? मदत करण्याच्या दृष्टीकोनातून कोणाचेच निवेदन आलेले नाही असे जे धादांत असत्य सांगण्यात आलेले आहे त्याचे नेमके कारण काय ?

..6...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.15966...

श्री.दिलीप कांबळे : सभापती महोदय, उत्तरामध्ये अतिशय स्पष्टपणे सांगितलेले आहे की, एकूण 3 हजार 228 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या हे खरे आहे. त्यापैकी 1 हजार 841 शेतकऱ्यांनी शेती संकटामुळे आत्महत्या केलेली आहे आणि त्यांच्या कुटुंबीयांना पत्र पाठवून मदत करण्यात आलेली आहे.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, लेखी उत्तरामध्ये सांगण्यात आले आहे की, एकूण 3 हजार 228 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या, हे अंशतः खरे आहे. परंतु सरकारने माननीय उच्च न्यायालयात एक हजार शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या अशाप्रकारचे शपथपत्र दिलेले आहे, हे खरे आहे काय ? 3 हजार 228 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या त्यापैकी किती शेतकऱ्यांना सरकारने मदत केली ? आत्महत्याग्रस्त केलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना वाढीव मदत देण्याबाबत अशी काहीही वाच्यता झालेली नाही असे लेखी उत्तर दिलेले आहे. त्याबाबत सांगू इच्छितो की, या सदनात आम्ही सर्वांनी आत्महत्याग्रस्त झालेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना एक लाख रुपयांऐवजी दोन लाख रुपये आर्थिक मदत देण्याबाबत आग्रह धरला होता. आपण त्या संदर्भातील रेकॉर्ड काढून पहावा. आम्ही या सदनात केलेल्या मागणीबाबत लेखी उत्तरात असत्य माहिती देण्यात येत असेल तर शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या बाबतीत सरकार किती गंभीर आहे याबाबत आम्हालासुद्धा विचार करावा लागेल. 45 सन्माननीय सदस्यांनी वेगवेगळे 11 प्रश्न विचारले असता मंत्री महोदयांनी इतके प्रश्न विचारण्यात येतात काय अशी विचारणा केली. परंतु आम्ही आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना वाढीव मदतीची मागणी केलेली असताना तशी कोणीही मागणी केलेली नाही असे लेखी उत्तर येत असेल तर तो सदनातील सर्व सन्माननीय सदस्यांचा अपमान आहे. एकीकडे आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांचा अपमान होत आहे तर दुसरीकडे आम्ही मागणी केलेली असताना त्याबाबतीत जे असत्य उत्तर देण्यात आलेले आहे, त्याबाबतीत कोणती कारवाई करणार आहात ?

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, या प्रश्नाच्या अनुषंगाने एकूण 11प्रश्न विचारण्यात आलेले आहेत त्याबाबत सविस्तर उत्तर दिल्यास त्यांचे समाधान होईल. सन्माननीय सदस्यांनी राज्यातील मराठवाडा, विदर्भ, उत्तर महाराष्ट्र, लातूर, नांदेड, नाशिक, जळगाव, धुळे, यवतमाळ, जालना, चंद्रपूर व सांगली या जिल्ह्यातील प्रश्न विचारलेला आहे. सन 2016मध्ये

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

14-03-2016 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) E-7

AJIT/ AKN/ ST/ पूर्वी श्री.भारवि... 12:40

ता.प्र.क्र.15966...

श्री.एकनाथराव खडसे....

वा त्या दरम्यान एकूण 3 हजार 228 शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत हे खरे आहे काय असा प्रश्न विचारलेला आहे. त्यावर सरकारने उत्तर दिलेले आहे की, हे अंशतः खरे आहे आणि सरकार दरबारी एकूण 3 हजार 228 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची नोंद आहे. आत्महत्या कशाला म्हणावी या संदर्भात मागील दहा वर्षापासून सरकारने जे निकष ठरवून दिलेले आहेत. सर्वसाधारणपणे नापिकीमुळे केलेली आत्महत्या, सावकारी कर्जामुळे केलेली आत्महत्या, कर्जाच्या वसुलीबाबत सातत्याने केलेल्या तगाद्यामुळे केलेली आत्महत्या अशा स्वरुपाचे निकष आहेत. या निकषामध्ये तो शेतकरी बसत असेल त्याला मदत द्यावी अशा स्वरुपाचा निर्णय मागच्या सात-आठ वर्षापूर्वी केलेला आहे. या संदर्भात जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नियुक्ती केलेली आहे. जिल्हाधिकाऱ्यांकडे अशा स्वरुपाचे अर्ज प्राप्त झाल्यानंतर आत्महत्या नेमकी कोणत्या कारणासाठी झाली याची माहिती आल्यानंतर वरील तीन कारणांपैकी एक कारण असेल तर त्या शेतकऱ्यांना मदत देण्याचा निर्णय जिल्हास्तरीय समिती घेते. या ठिकाणी 1 हजार 841 प्रकरणे त्या निकषात बसणारी असल्यामुळे त्यांना मदत देण्यात आलेली आहे. उर्वरित प्रकरणे त्या निकषामध्ये बसली नाहीत म्हणून अधिक माहिती घेण्यासाठी ती प्रकरणे फेरतपासणीसाठी परत पाठविण्यात आली. तसेच जोपर्यंत व्हीसेराचा रिपोर्ट येत नाही तोपर्यंत आत्महत्येचे नेमके कारण समजू शकत नाही.... आपल्या अकरा प्रश्नांना उत्तरे मला द्यायची आहेत. राज्यातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या संदर्भातील प्रश्न आहे आणि त्या संदर्भात असमाधानकारण उत्तर दिले तर ते राज्य सरकारला शोभणार नाही.

यानंतर श्री.बोर्डे..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.15966....

श्री.एकनाथराव खडसे....

त्यामुळे मला या संदर्भातील सविस्तर उत्तर देणे आवश्यक आहे. विरोधी पक्षाचे समाधान होईपर्यंत मी उत्तर देत राहील. हे खरे आहे की, काही प्रकरणांच्या बाबतीत प्रयोगशाळेत व्हिसेरा पाठविलेला आहे. परंतु त्या बाबतचे अहवाल अजून आलेले नाहीत. त्यामुळे काही प्रकरणे प्रलंबित आहेत. व्हिसेराचा अहवाल येण्यासाठी विलंब लागत आहे. त्यामुळे माननीय मुख्यमंत्र्यांनी मागच्या आठवड्यामध्ये अशा सूचना दिल्या आहेत की, शेतकऱ्यांच्या आत्महत्या विशेष बाब समजून, उर्वरित सर्व प्रकरणे बाजूला ठेवून शेतकऱ्यांच्या आत्महत्यांसंदर्भातील व्हिसेराचे अहवाल एक महिन्याच्या आत आले पाहिजेत. जेणेकरुन आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना तातडीने लाभ देता येतील. तसेच माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी राज्य सरकारने माननीय उच्च न्यायालयात चुकीची आकडेवारी सादर करण्याबाबत सांगितले. मी सांगू इच्छितो की, राज्य सरकारने माननीय उच्च न्यायालयात चुकीची आकडेवारी दिलेली नाही. त्या वेळी सरकारकडे जी आकडेवारी उपलब्ध होती ती माहिती न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिली आहे.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, आम्ही प्रश्न विचारला होता की, उर्वरित 1400 शेतकऱ्यांच्या आत्महत्यांची कारणे काय आहेत ? महोदय, आत्महत्यांची निरनिराळी कारणे असू शकतात हे आम्ही समजू शकतो. व्हिसेराच्या अहवालावरुन कशामुळे उदाहरणार्थ विष प्यायल्यामुळे किंवा गळफास घेतल्यामुळे आत्महत्या झाली हे समजू शकतो. कदाचित मी चुकीचे असेल, त्यामुळे आपण माझ्या ज्ञानात भर घालावी. परंतु शेतकऱ्यांच्या आत्महत्या कर्जबाजारीपणा, नापिकी किंवा अन्य कारणांमुळे झाल्या हे व्हिसेरातून कळणार असेल तर मला वाटते या बाबत सरकारकडून नवीन संशोधन केले जात आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्यांबाबत सरकार थोडे सुध्दा गंभीर नाही. माननीय मंत्री श्री.एकनाथराव खडसे साहेब, मला आपला अनादर करावयाचा नाही. मला आपल्याबद्दल प्रचंड आदर आहे. परंतु आपण आमच्या ज्ञानात भर घालावी. आत्महत्येचे कारण व्हिसेराच्या अहवालात कळत असेल तर ते फार अवघड आहे. या सभागृहातील सन्माननीय सदस्यांनी मागणी केली होती की, आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना 1 लाख रुपयांऐवजी 2 लाख रुपये मदत करावी. परंतु या अनुषंगाने काहीच निर्णय होत नाही. आत्महत्याग्रस्त

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.15966....

श्री.धनंजय मुंडे....

शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना 1 लाख रुपये देऊन विहिरी सुध्दा देण्यात येतील असे सांगितले होते. दुष्काळाच्या प्रस्तावावर बोलताना आम्ही विचारले होते की, नरेगा किंवा एमआरईजीएस मधून विहिरी देण्याऐवजी धडक कृती कार्यक्रमातून विहिरी देण्याबाबत आपण काय निर्णय घेणार आहात ?

श्री.एकनाथराव खडसे : महोदय, या संदर्भात मी जे निकष सांगितले आहेत ते आमच्या सरकारने काढलेले नाहीत तर.....

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ ऑर्डर आहे. या ठिकाणी माननीय महसूल मंत्री प्रत्येक विषयाच्या बाबतीत सांगत आहेत की, अमुक बाबी मागच्या सरकारने केलेल्या आहेत. मी पॉईंट ऑफ ऑर्डरच्या माध्यमातून विचारु इच्छितो की, व्हिसेराच्या बाबतीत आमच्या सरकारने काही नमूद केले असेल तर व्हिसेराचा अहवाल येईपर्यंत किती प्रकरणांमध्ये मदत दिली नाही याची सुध्दा माहिती दिली पाहिजे. व्हिसेराच्या अहवालामुळे निम्म्यापेक्षा जास्त शेतकऱ्यांना मदत देण्याचे थांबविण्यात आले आहे. आमच्या सरकारच्या काळात असे झाले असते तर आपण किंवा माननीय श्री.दिवाकर रावते साहेबांनी संपूर्ण सभागृह डोक्यावर घेतले असते. मंत्री महोदय, आपण सभागृहात दिशाभूल करणारे वक्तव्य करीत आहात. त्याचा आम्ही जाहीररित्या निषेध करीत आहोत. 50 टक्क्यांपेक्षा जास्त आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या कुटुंबीयांना मदत नाकारणाऱ्या सरकारचा आम्ही निषेध करतो. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी निदर्शनास आणून दिले की, गळफास किंवा अन्य कारणांमुळे आत्महत्या होऊ शकतात. परंतु या राज्य सरकारकडून निम्म्यापेक्षा जास्त शेतकरी आत्महत्याग्रस्त नाहीतच असे ठरविणे म्हणजे त्या शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांवर प्रचंड अन्याय केल्यासारखे आहे.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात.)

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, हे प्रश्न एकाएकी निर्माण झालेले नाहीत. किंबहुना, हे सर्व पाप एका दिवसात निर्माण झालेले नाही. तुमच्या सरकारने केलेले पाप आमचे सरकार फेडत आहे. तुमच्या सरकारने जे पाप केले आहे त्यामुळेच ही परिस्थिती ओढवली आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

एका दिवसात शेतकरी आत्महत्या करावयास लागलेला नाही. हा तुमच्या धोरणांचा परिपाक आहे.

..3..



ता.प्र.क्र.15966....

श्री.एकनाथराव खडसे....

गेल्या 10 वर्षात तुमच्या सरकारने जो भ्रष्टाचार केला, शेतकऱ्यांवर अन्याय केला त्याचा हा परिणाम आहे. परंतु आता आपण आरडाओरड करीत आहात. तुम्ही 10 वर्षे काय केले, गेल्या 10 वर्षात शेतकऱ्यांकडे दुर्लक्ष करण्यात आले. 10 वर्षातील तुमचे धोरण चुकीचे होते. त्यामुळे शेतकरी आत्महत्या करण्यास प्रवृत्त झाला. एका वर्षात.....

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देतात.)

**सभापती** : सभागृहातील गोंधळसदृश परिस्थितीत मला सभागृहाचे कामकाज पार पाडणे शक्य होत नसल्यामुळे मी सभागृहाची बैठक 10 मिनिटांसाठी स्थगित करतो.

(सभागृहाची बैठक दुपारी 12.55 ते 1.05 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

--------

जी.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी सभापती)**

**सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे. आता पुढील कामकाज घेण्यात येईल.

श्री. चंद्रकांत रघुवंशी : सभापती महोदय, प्रश्नोत्तराच्या तासात पाचही प्रश्न होत नाहीत. कृपया आपण याबाबतीत लक्ष द्यावे अशी माझी विनंती आहे.

**सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, माझ्यापेक्षा सन्माननीय सदस्यांनी सहकार्य केले तर प्रश्नांची संख्या पुढे जाईल.

----

..2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.** : लेखी उत्तरे

**मु.शी.** : तारांकित प्रश्नासंबंधी अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवणे.

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (ऊर्जामंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "राज्यातील वीज निर्मितीकरिता कोळसा खाणी महाराष्ट्रात राहण्याबाबत" या विषयावरील ॲड. जयदेव गायकवाड व इतर वि.प.स. यांच्या तारांकित प्रश्न क्रमांक 7963 ला दिनांक 23 जुलै, 2015 रोजी अनुपूरक प्रश्नोत्तराच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहे.

(**प्रेस** : अधिक माहिती छापावी.)

----

..3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

<u>नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावांच्या सुचनांबाबत</u>

**सभापती** : माझ्याकडे नियम 289 च्या 2 सूचना आलेल्या आहेत.

आज दिनांक 14 मार्च, 2016 रोजी सर्वश्री. धनंजय मुंडे, सुनील तटकरे, हेमंत टकले, संदीप बाजोरिया, जयंत प्र. पाटील, वि.प.स. यांनी सकाळी 09.44 मिनिटांनी "मुंबई आणि परिसरात अपहरण, अल्पवयीन मुली, बाल अत्याचारांच्या घटनांमध्ये दिवसेंदिवस झपाट्याने वाढ होत असणे, पवई येथील चार वर्षांच्या मुलीचे अपहरण करून तिच्यावर लैंगिक अत्याचार करून हत्या करणे, गोरेगावमधील एका मुलीची विक्री करण्याचा कट उघडकीस येणे, 15 लाखांच्या खंडणीसाठी अपहरण केलेल्या कल्याणमधील एका सात वर्षीय मुलाची हत्या होणे, सन 2016 च्या फेब्रुवारी महिन्यापर्यंत बलात्काराच्या 79 तर सन 2015 मध्ये 447 घटना असणे, गुन्हेगारांवर पोलिसांचा वचक नसल्यामुळे अत्याचाराचे गुन्हे रोखण्यात पोलिसांना आलेले अपयश, त्यामुळे जनतेमध्ये निर्माण झालेले भितीचे वातावरण" याबाबतीत म.वि.प. 289 अन्वये सूचना दिली आहे.

महाराष्ट्र विधानपरिषदेच्या नियमांतील एखादा नियम स्थगित करणे यासंबंधाचा नियम 289 आहे. कोणत्याही सन्माननीय सदस्यांस माननीय सभापतींच्या अनुमतीने कोणताही नियम स्थगित करण्याच्या बाबतीत सूचना देता येईल. यावरून असे दिसून येते की, प्रश्नोत्तराचा तास किंवा इतर सगळे कामकाज स्थगित करण्यासाठी त्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात असे काम किंवा एखादा विशिष्ट प्रस्ताव सभागृहासमोर असणे आवश्यक आहे. वरील विषय आजच्या कामकाजपत्रिकेत समाविष्ट नाही. परंतु विषयाचे गांभीर्य व महत्त्व पाहता सन्माननीय सदस्यांना 2 मिनिटे बोलण्याचा मी वेळ देत आहे. सन्माननीय सदस्यांना या विषयावर बोलायचे आहे का ? सन्माननीय सदस्यांना बोलायचे नसेल तर मी पुढील प्रस्ताव वाचतो. ठीक आहे.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, मला बोलायचे आहे.

**सभापती** : आपले त्या प्रस्तावामध्ये नाव नसल्यामुळे आपल्याला बोलता येणार नाही. आज दिनांक 14 मार्च, 2016 रोजी सर्वश्री. धनंजय मुंडे, सुनील तटकरे, हेमंत टकले, संदीप बाजोरिया, जयंत प्र. पाटील, वि.प.स. यांनी सकाळी 09.45 वाजता "पालघर जिल्ह्यातील मोखाडा

..4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

सभापती ....

या आदिवासी बहुल तालुक्यात रोजगार न मिळाल्यामुळे व घरात खाण्यासाठी अन्न नसल्याने श्री. सुरेश निकुळे या बेरोजगार तरूणाने स्वतःला जाळून घेऊन आत्महत्या करणे, मौजे आटपाळे या आदिवासी गावात व परिसरात रोजगार हमीचे कुठलेही काम मागील काही वर्षांत उपलब्ध नसणे, एकीकडे दुष्काळ आणि रोजगारही उपलब्ध नसल्याने या परिसरातील अनेक कुटुंबे आर्थिक विवंचनेत असणे, या दुष्काळामुळे शेतकऱ्यांच्या होत असलेल्या आत्महत्यांच्या पाठोपाठ आता काम नसल्यामुळे मजुरांच्याही होत असलेल्या आत्महत्या व त्यामुळे आदिवासी व दुष्काळी भागात रोजगार हमीची कामे उपलब्ध करून देण्याची आवश्यकता" याबाबतीत म.वि.प. नियम 289 अन्वये सूचना दिली आहे.

महाराष्ट्र विधानपरिषदेच्या नियमांतील एखादा नियम स्थगित करणे यासंबंधाचा नियम 289 आहे. कोणत्याही सन्माननीय सदस्यांस माननीय सभापतींच्या अनुमतीने कोणताही नियम स्थगित करण्याबाबतीत सूचना देता येईल. यावरून असे दिसून येते की, प्रश्नोत्तराचा तास किंवा इतर सगळे कामकाज स्थगित करण्यासाठी त्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात असे काम किंवा एखादा विशिष्ट प्रस्ताव सभागृहासमोर असणे आवश्यक आहे. वरील विषय आजच्या कामकाजपत्रिकेत समाविष्ट नाही. परंतु विषयाचे गांभीर्य व महत्त्व पाहता सन्माननीय सदस्यांना 2 मिनिटे बोलण्याचा मी वेळ देत आहे.

श्री. धनंजय मुंडे : सभापती महोदय, मी म.वि.प. नियम 289 अन्वये या सदनात अतिशय महत्त्वाच्या विषयावर बोलण्यासाठी उभा आहे.

....H

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे........

पालघर जिल्ह्यातील मोखाडा या आदिवासीबहुल तालुक्यातील एका बेरोजगार तरुणाने आत्महत्या केलेली आहे. विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र, खानदेश येथे शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याबाबतची चर्चा थोड्या वेळापूर्वी सभागृहात झाली आहे. या राज्यात मोठ्या प्रमाणावर शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत, हेही आपण पहातो आहोत. दुष्काळ, नापिकी, नैसर्गिक संकटे आणि सरकारचे दुर्लक्ष यामुळे या आत्महत्या होत आहेत. परंतु, या प्रकरणामध्ये हाताला रोजगार नाही, कुटुंब चालवू शकणार नाही, घरात खाण्यासाठी अन्न नाही म्हणून मोखाड्याच्या एका सुशिक्षित बेरोजगार तरुणाने आत्महत्या केलेली आहे. हा मतदारसंघ आदिवासी विकास मंत्री महोदयांचा आहे. सन्माननीय आदिवासी विकास मंत्री श्री.विष्णु सवरा यांच्या मतदारसंघात श्री.सुरेश निकुळे या आदिवासी समाजातील बेरोजगार तरुणाने चार दिवसांपूर्वी स्वत:ला जाळून घेऊन आत्महत्या केलेली आहे. या तरुणाच्या जॉब कार्डवर सन 2007-2008 पासून रोजगार हमी योजनेच्या कामाची कोणतीही नोंद नाही. एकीकडे कामाची किती मोठी व्याप्ती ठेवली आहे, सरकार किती तत्पर आहे, बेरोजगार तरुणांच्या हाताला कसे काम मिळत आहे म्हणून सरकार आपली पाठ थोपटून घेत आहे आणि मुंबईपासून 120 कि.मि.अंतरावरील पालघर जिल्ह्यातील एका तालुक्यात एक आदिवासी बेरोजगार तरुण आपल्या कुटुंबाला खाऊ घालता येत नाही, हाताला काम नाही म्हणून आत्महत्या करीत आहे, या सारखी दुसरी शरमेची कोणतीही बाब या सरकारसाठी नाही. परंतु, या सरकारला त्याचे काही वाटत नाही. ज्या रोजगार हमी योजनेबाबत सरकार आपली पाठ थोपटून घेत आहे, त्या योजनेमधून मौजे आटपाळे येथे मागील काही वर्षात काम उपलब्ध नाही. उदरनिर्वाहाचे कोणतेही साधन नसल्यामुळे आणि आपले कुटुंब उपाशी रहात आहे, या विवंचनेतून या बेरोजगार तरुणाने आत्महत्या केलेली आहे. हा एक प्रकारे भुकबळीच आहे. त्या तरुणाने भुकेच्या चिंतेनेच आत्महत्या केलेली आहे.

सभापती महोदय, माननीय संसदीय कार्य आणि अन्न व नागरी पुरवठा मंत्री माझ्यासमोर आहेत. एखाद्या कुटुंबाला अन्न मिळत नाही म्हणुन घरातील कर्त्या माणसाला आत्महत्या करावी लागते, याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री म्हणून आपल्याला थोडे तरी काही वाटावे ? अन्न



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे.......

पुरवठा करणे ही आपली जबाबदारी आहे, सरकारची जबाबदारी आहे. असे भुकबळी यापूर्वी झाले आहेत. यापूर्वीही याबाबतीत चर्चा झालेली आहे. म्हणून माझी आपल्याला विनंती आहे की, या अतिशय गंभीर प्रश्नावर सभागृहापुढील इतर सर्व कामकाज बाजूला ठेऊन आपण चर्चेची परवानगी द्यावी.

**सभापती :** ही सूचना मी यापूर्वीच नाकारलेली आहे.

यानंतर आज दिनांक 14 मार्च, 2016 रोजी सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी सकाळी 10.00 वाजता "राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या तीन दिवसीय अखिल भारतीय प्रतिनिधी सभा कार्यक्रमात भाजपा अध्यक्षांनी भाजपा सरकार हे संघाच्या धोरणानुसारच चालणार, अशी स्पष्टोक्ती केली. तसेच, राष्ट्रीय स्वयंसेवकाच्या विचारांसाठी व ध्येयधोरणासाठी कोणतीही तडजोड केली जाणार नाही, अशी भावना व्यक्त करणे, या वरुन देशामध्ये समाजवाद व धर्मवाद निर्माण होत असणे, तसेच, भविष्यनिर्वाह निधीवर लावलेला कर मागे घेण्याचा निर्णय हा भाजपाची कामगार संघटना व भारतीय मजदूर संघ यांच्या सल्ल्यानंतर घेतला गेला, असे स्पष्ट करणे, यावरुनच केंद्र सरकार कोण चालवतो हे अद्याप स्पष्ट होत नसणे, या घटनेबद्दल राज्यातील जनतेमध्ये तीव्र असंतोष पसरला असणे", या विषयाबाबत म.वि.प. नियम 289 अन्वये सूचना दिलेली आहे. महाराष्ट्र विधान परिषद नियमातील एखादा नियम स्थगित करणे, या संबंधी नियम 289 हा आहे. कोणत्याही सदस्यास सभापतींच्या अनुमतीने कोणताही नियम स्थगित करण्याच्या बाबतीत सूचना देता येईल. यावरुन असेही दिसून येते की, प्रश्नोत्तराचा तास किंवा इतर सर्व कामकाज स्थगित करण्यासाठी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात असे काम किंवा एखादा विशिष्ट प्रस्ताव सभागृहासमोर असणे आवश्यक आहे. वरील विषय आजच्या कामकाज पत्रिकेत समाविष्ट नसल्यामुळे मी सूचना नाकारीत आहे. परंतु, राजकीयदृष्ट्या कोणतेही भाष्य न करता केवळ एक मिनिटे बोलण्याची अनुमती मी सन्माननीय सदस्यांना देत आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, हे सभागृह संविधानाप्रमाणे चालते. सन्माननीय मंत्री श्री.गिरीष बापट साहेब आपण जर संविधानच बदलणार असाल तर..........

...3.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.गिरीश बापट : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, आपण सदर नियम 289 च्या सूचनेतील वाचलेला विषय हा या नियमाच्या कक्षेबाहेरील आहे. तरी देखील आपण परवानगी दिली आहे, त्याबाबत आमचे काही म्हणणे नाही. परंतु, मला असे म्हणावयाचे आहे की, यामध्ये संविधानाचा कोणताही प्रश्न येत नाही. आपण या ठिकाणी वाचलेल्या विषयात संविधानाचा कोणताही विषय नाही. परंतु, प्रत्येक वेळी संविधानाचा प्रश्न उपस्थित करायचा, हे बरोबर नाही. कारण, यामध्ये तसे काहीही नाही.

**सभापती :** सन्माननीय सदस्यांना मी बोलण्याची परवानगी दिलेली आहे. या विषयाच्या बाहेर ते काही बोलले असतील तर मी रेकॉर्डवरुन काढून टाकीन.

श्री.गिरीश बापट : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी माझे नाव घेतले आहे. या सभागृहात कोणता विषय मांडावा, हा त्यांचा हक्क आहे. त्यांनी सूचनेमध्ये दिलेल्या विषयात कोठेही घटना बदलणार वगैरे नसल्यामुळे बळजबरीने तो विषय आणून लोकांमध्ये गैरसमज पसरविण्याचे काम ते करीत आहेत.

**सभापती :** या संदर्भात यापूर्वीच मी निर्णय दिलेला आहे. ज्या सन्माननीय सदस्यांनी सूचना दिलेली आहे त्यांना एक मिनिटे बोलण्याची परवानगी मी दिलेली आहे. सन्माननीय सदस्यांनी आपले म्हणणे मांडावे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय मंत्री श्री.गिरीश बापट हे स्वत:ला राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे समजतात म्हणून मी बोललो. ते तसे समजत नसतील तर त्यांनी नाही म्हणून सांगावे.

(सत्तारुढ पक्षातील काही सन्माननीय सदस्य एकत्रितपणे बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

**सभापती :** सन्माननीय सदस्यांनी विषयाच्या अनुषंगाने बोलावे.

सन्माननीय सदस्य श्री.शरद रणपिसे आपणही बोलण्याची परवानगी मागत आहात. सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी सूचना दिलेली आहे. आपण त्यावर कसे बोलू शकता ?

...4....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, ते पाठींबा देऊ शकतात.

सभापती महोदय, या ठिकाणी आम्ही शपथ घेतलेली आहे. आजच्या 'नवाकाळ' या वर्तमानत्रात भाजपा अध्यक्ष श्री.अमित शहा यांचे एक वक्तव्य छापून आलेले आहे. "या देशाचा आणि राज्याचा कारभार हा संघाच्या आदेशाप्रमाणे चालेल", असे त्यांचे वक्तव्य आहे. संघ हिंदुत्ववादी आणि धर्मवादी आहे. राज्यघटनेमध्ये ही तरतूद नाही. घटनेची सुरुवात "आम्ही भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य घडविण्याचा....", अशी करण्यात आलेली आहे. ज्यावेळी आपण आम्हाला या सभागृहात शपथ देता त्यावेळी घटनेचे पुस्तक घेऊन शपथ देत असता. हे राज्य घटनेप्रमाणे चालणार आहे. या राज्यामध्ये जातीयवाद निर्माण होत आहे. सभापती महोदय, मनुस्मृती प्रमाणे बारा बलुतेदारांवर अन्याय करणारे वक्तव्य या पुस्तकात छापले जात आहे, ही राज्यकारभाराच्या दृष्टीने गंभीर बाब आहे. माझे म्हणणे आहे की, याचा खुलासा झाला पाहिजे. सन्माननीय श्री.अमित शहा यांच्या विचाराने आणि संघाच्या विचाराने हे राज्य चालणार आहे की, घटनेप्रमाणे चालणार आहे, हे आम्हाला कळले पाहिजे.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय,..........

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय,..........

**सभापती :** सन्माननीय विरोधी पक्षनेते व सन्माननीय सदस्य श्री.शरद रणपिसे या दोघांनीही मला समजावून सांगावे की, सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी नियम 289 अन्वये सूचना दिलेली आहे व त्यांना मी एक मिनिटे बोलण्याची परवानगी दिलेली आहे. आता आपला असा आग्रह आहे की, आपल्यालाही बोलण्याची परवानगी द्यावी. हे कोणत्या अधिकारात आणि नियमाने आहे, हे आपण मला सांगावे.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, महाराष्ट्र विधानपरिषद नियम 289 अन्वये ज्यावेळी सभागृहात एखादे सदस्य ......

श्री.भाई गिरकर : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ ऑर्डर आहे. नियम 289 अन्वये द्यावयाची सूचना ही सार्वजनिक बाबीवर सरकारविरोधात असंतोष असेल तर त्यासंदर्भात असते.

...5.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भाई गिरकर......

परंतु, कोणत्याही वर्तमानपत्रात एखादी बातमी छापून आली तर त्या संदर्भात नियम 289 ची सूचना द्यायची, हे चुकीचे आहे. अशा सूचनांना आपण परवानगी देता कामा नये.

**सभापती :** मी सूचनेला अनुमती नाकारलेली आहे. परंतु, सन्माननीय सदस्यांना एक मिनिटे बोलण्याची परवानगी दिलेली आहे. आता आपल्यासमोर विषय असा आहे की, सन्माननीय सदस्य श्री.शरद रणपिसे व सन्माननीय विरोधी पक्षनेते यांनी या सूचनेच्या अनुषंगाने बोलावे का ?

यानंतर श्री.बोरले......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील साहेबांनी म.वि.प. नियम 289 अन्वये प्रस्ताव कसा होतो.....

श्री.भाई गिरकर : सभापती महोदय,.....

**सभापती** : भाई, मी उत्तर दिलेले आहे. मी त्यांना बोलण्याची परवानगी दिलेली आहे. आपण मला चॅलेन्ज करु नका. आपण कृपया खाली बसावे.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.भाई गिरकर हे.....

**सभापती :** सन्माननीय सदस्य श्री.शरद रणपिसे साहेब आपण बोलावे.

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय,....

( विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

**सभापती** : मी त्यांना बोलण्याची परवानगी दिलेली आहे. आपल्या तिघांपैकी अगोदर कोण बोलणार आहे, हे आपण ठरवावे. सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे, माननीय विरोधी पक्षनेते आणि तुम्ही देखील बोलण्यासाठी उभे आहात. मी सन्माननीय सदस्य श्री.शरद रणपिसे साहेबांना बोलण्याची परवानगी दिलेली आहे. माननीय विरोधी पक्षनेते आपण एक मिनिट थांबावे. तुमचे बोलणे झालेले आहे. मी मघाशी माननीय विरोधी पक्षनेत्यांना विचारले की, आपण कशावर बोलत आहात हे मला समजावून सांगावे. आपण त्या विषयावर बोलावे.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, म.वि.प. नियम 289 अन्वये एखाद्या सन्माननीय सदस्याने अतिशय गंभीर प्रश्न (...अडथळा...) मी आपल्याला सांगतो.

**सभापती :** भाई आपण मध्ये बोलू नका.

( विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, हा विषय गंभीर का आहे, हे मी सांगतो. राज्य आणि केंद्र सरकार संघ विचारसरणीने चालणार असेल, सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील साहेब म्हणाले की, घटना बदलण्याचे काम संघ करीत आहे. आमच्या सारख्या 12 बलुतेदारांना घटनेने आरक्षणाचे अधिकार दिलेले आहेत. परंतु, संघाला आरक्षण बदलायचे आहे आणि हेच विचार संघाचे, राज्याचे आणि केंद्राचे असतील आणि अशा पद्धतीने राज्याचे आणि केंद्राचे सरकार चालणार असेल, म्हणून हा विषय गंभीर आहे. म्हणून सभागृहासमोर असलेले सर्व कामकाज बाजूला सारुन या विषयावर चर्चा करावी.

..2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. हे ज्येष्ठांचे सभागृह आहे. जे या सभागृहाचे सदस्य नाहीत त्यांच्या विषयी आपण बोलावयाचे काय ? उद्या आम्ही माननीय श्री.शरद पवार साहेब, माननीय श्रीमती सोनिया गांधी यांच्या विषयी बोलावयाचे काय ? आपण असे विषय स्वीकारु नयेत. त्यांनी राज्य शासनाच्या पॉलिसीवर नक्की बोलावे. परंतु, माननीय श्री.अमित शहा किंवा त्यांनी केलेले वक्तव्य असेल, याचा काही संबंध नाही अशा गोष्टींवर....

( विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

**सभापती** : माननीय विरोधी पक्षनेते मी उभा आहे. आपण कृपया खाली बसावे. मी माननीय श्री.विनोद तावडे साहेबांना सांगू इच्छितो की, एकतर आपण सभागृहात उशिरा आलेला आहात. विषय असा आहे की, आपले सक्षम संसदीय कार्यमंत्री सभागृहात बसलेले होते. विषय कोठपर्यंत पोहोचलेला होता, हे आपण समजून घ्यावे. मी ही सूचना नाकारलेलीच आहे. मी सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील साहेबांना एक मिनिट बोलण्याची परवानगी दिली. हा निर्णय माझा आहे. त्यानंतर सन्माननीय सदस्य श्री.शरद रणपिसे साहेब बोलण्यासाठी उभे राहिले. त्यानंतर माननीय विरोधी पक्षनेते बोलण्यासाठी उभे राहिले. आम्हाला बोलण्याची परवानगी द्यावी, अशी त्यांनी विनंती केली. आता सन्माननीय सदस्य श्री.शरद रणपिसे यांनी आपले म्हणणे मांडावे.

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी ज्या गोष्टीचा उल्लेख केला त्याबाबत मी माननीय मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेल्या भारतीय राज्य घटनेनुसार या सभागृहाची निर्मिती झालेली आहे. दुसरे म्हणजे, विधीमंडळाच्या कमकाजाचे नियम आहेत आणि नियमाच्या बाहेर जाऊन काही कामकाज होत असेल तर ते होऊ नये, ही सभागृहाची भावना योग्य आहे. यामध्ये विषय असा येतो की, कोणतेही राजकीय पक्ष असोत. मग काँग्रेस पक्ष असेल, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष असेल....

**सभापती** : आपण कशावर बोलत आहात ? मी दोघांनाही सूचना दिली होती की, (...अडथळा...) माननीय श्री.गिरीष बापट साहेब, मला एक मिनिट बोलू द्यावे. सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील साहेबांनी जेव्हा (...अडथळा...) भाई, आपण खाली बसून बोलणार आहात का मी बोलू, हे एकदा ठरवून घ्यावे. तुम्हाला बोलण्याचा अधिकार आहे काय, हा खरा विषय आहे, तेवढ्यापुरते आपण बोलावे.



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, ज्यावेळी सभागृहात कामकाजाविषयीचे नियम किंवा घटनात्मक (...अडथळा...) मंत्री महोदय, आपण माझे म्हणणे ऐकून घ्यावे.

( दोन्ही बाजूचे काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

**सभापती** : मी त्यांना बोलण्याची परवानगी दिलेली आहे. ते सर्व रेकॉर्डवरुन काढण्यात येईल.

सभागृहातील गोंधळसदृश परिस्थितीत मला सभागृहाचे कामकाज पार पाडणे शक्य होत नसल्यामुळे मी सभागृहाची बैठक 5 मिनिटांसाठी स्थगित करतो.

( सभागृहाची बैठक दुपारी 1 वाजून 25 मिनिटांनी 5 मिनिटांसाठी स्थगित झाली.)

--------

..J-1/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.विनायक मेटे)**

**तालिका सभापती (श्री.विनायक मेटे) :** सभागृहाची बैठक मी पुन्हा 2.00 वाजेपर्यंत स्थगित करतो.

(सभागृहाची बैठक दुपारी 1.30 ते 2.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

या नंतर श्री.सांगळे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**(स्थगितीनंतर)**

**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.विनायक मेटे )**

**तालिका सभापती :** मी सभागृहाची बैठक दुपारी 2.30 पर्यंत स्थगित करीत आहे.

( सभागृहाची बैठक दुपारी 2.00 ते 2.30 पर्यंत स्थगित झाली.)

--------

यानंतर L-1....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

(स्थगितीनंतर)

**सभापतीस्थानी माननीय सभापती**

श्री.गिरीश बापट : सभापती महोदय, आज सभागृहात नियम 289 अन्वयेच्या सूचनेसंबंधी चर्चा झाली. आपण माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांना थोडक्यात म्हणणे मांडण्यास संधी दिली होती. आपल्या निर्णयाबद्दल माझे काहीही म्हणणे नाही. साधारणपणे सभागृहात राज्यातील विषयांवर चर्चा होत असते. तसा नियम नसला तरी प्रथा आणि परंपरा म्हणून कोणत्याही राजकीय पक्षाच्या नेत्यांबद्दल टिकाटिप्पणी टाळली जाते. असे प्रसंग येतात त्यावेळी आपण गटनेत्यांना आपल्या दालनात बोलवावे. आपण सूचना दालनात नाकारली असल्याचे म्हटले होते, या व्यतिरिक्त पुन्हा माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांच्यासह माननीय विरोधी पक्षनेते व माननीय सदस्य सर्वश्री शरद रणपिसे व सुनील तटकरे यांनाही सभागृहात बोलण्यास परवानगी दिली आणि त्या अनुषंगाने सभागृहात चर्चा झाली. सभागृहाने या संदर्भात विचार करावा. माझी आपल्याला विनंती आहे की, कोणत्याही राजकीय पक्षाचे नेते या सभागृहात हजर नसतात, विषय राष्ट्रीय पातळीवरील असतो, त्यामुळे त्याबाबत या सभागृहात चर्चा करुन कटू प्रसंग निर्माण होण्यापेक्षा ते टाळावे. आज भारतीय जनता पक्षाचे राष्ट्रीय नेते श्री.अमित शहा यांच्याबद्दल जी चर्चा झाली ते वक्तव्य सभागृहाच्या कामकाजातून वगळण्यात यावे अशी माझी विनंती आहे.

**सभापती** : मी या विषयाबाबत फार तपशीलवार बोलणार नाही. परंतु या विषयावरील संपूर्ण रेकॉर्ड मी तपासून घेतो आणि मला उचित वाटले तरच हे वक्तव्य रेकॉर्डवर राहील. प्रिंट आणि इलेक्ट्रॉनिक मीडिया यांना माझे स्पष्ट आदेश आहेत की, जोपर्यंत माझ्याकडून हे रेकॉर्ड तपासून घेऊन निर्णय होत नाही तोपर्यंत या विषयाला प्रसिध्दी देऊ नये, विषय प्रसिध्द होत असेल तर तातडीने थांबवावा. नियम 289 अन्वयेच्या सूचनेच्या अनुषंगाने काही गोष्टी माझ्या लक्षात आल्या आहेत. सभागृहाची संमती असेल तर मला त्यामध्ये बदल करावयाचा आहे. नियम 289 अन्वये सूचना सकाळी 10.00 वाजण्यापूर्वी दिली जाते, त्याऐवजी सायंकाळी 6.00 ते रात्रौ 10.00 वाजेपर्यंत द्यावी, जेणेकरुन आम्हाला त्याची योग्यप्रकारे तपासणी करता येईल.

..2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, आपण दिलेला निर्णय सर्वतोपरी मान्य आहे, तो सर्वोच्च आहे. मात्र कामकाजातून एखादी बाब काढून टाकण्याचा अधिकार सभापती या नात्याने आपल्याला आहे. आपण कामकाजातून काढून टाकलेली बाब मीडियाकडून छापली जात नाही, ते बंधनकारक आहे. परंतु आपल्या आसनावरुन मीडीयाने छापू नये अशा प्रकारचे आदेश देऊ नयेत अशी माझी विनंती आहे.

**सभापती** : ठीक आहे.

--------

...3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.:** नियम 93 अन्वये सूचना

**सभापती** : आता नियम 93 अन्वये प्राप्त झालेल्या सूचनांबाबतचा माझा निर्णय सचिव वाचून दाखवतील.

सचिव : माननीय सदस्य सर्वश्री सतीश चव्हाण, अमरसिंह पंडित यांनी "महाराष्ट्र कर्नाटक वादग्रस्त सीमा भागातील उमेदवारांनी महाराष्ट्राची आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमाची एमएचसीईटी परीक्षा देण्याऐवजी कर्नाटक राज्याची प्रवेश परीक्षा द्यावी अशी अधिसूचना काढण्यात येणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी "पेण तालुक्यातील (जि.रायगड) वढाव काळेश्री या विठ्ठलवाडी, कान्होबा, जनवली, मंत्रीबेडी, बहिरामकोटक इ.वाडयांना जोडणा-या पुलाची बिकट अवस्था होऊन पुलाचा भाग कोसळल्यास मोठी जीवितहानी होण्याची शक्यता निर्माण होणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर माननीय सदस्य श्री.जगन्नाथ शिंदे यांनी "शासकीय रुग्णालयातील विविध सेवांसाठी दि.28.12.2015 रोजी आरोग्य विभागाने दुप्पट दरवाढ करण्याबाबत आदेश निर्गमित केल्याने 250 प्रकारच्या रुग्ण शुल्कात वाढ झालेली असणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी "पंजाब, हरियाणा, तामीळनाडू, बिहार, हिमाचल प्रदेश व राजस्थान या राज्यांनी आयसीटी शिक्षकांना सेवेत कायम करणे, मात्र महाराष्ट्राने अद्यापही याबाबत निर्णय न घेणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

सचिव..........

यानंतर माननीय सदस्य सर्वश्री धनंजय मुंडे, सतीश चव्हाण यांनी "गेवराई, जि.बीड नगरपालिकेत कोटयवधी रुपयांचा भ्रष्टाचार होणे, नगरसेवक व त्यांच्या कुटुंबियांनी शासकीय जागावर अतिक्रमण करणे, शाळेच्या जागेत बिअरबार चालवणाऱ्यांना ना हरकत प्रमाणपत्र देण्यात येणे, याबाबत दि.8.12.2015 रोजी आदेश होऊनही चौकशी न होणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी "मिरज (जि.सांगली) येथील एका पत्र्याच्या घरातून सुमारे 3 कोटी रुपयांची रोकड दि.12.3.2015 रोजी जप्त केल्याचा धक्कादायक प्रकार उजेडात येणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

----------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.** : मुंबई शहरातील जून्या पाईपलाईनमुळे होणारी पाण्याची गळती

**मु.शी.** : मुंबई शहरातील जून्या पाईपलाईनमुळे होणारी पाण्याची गळती यासंबंधी श्री.विजय उर्फ भाई गिरकर, ॲड.राहुल नार्वेकर, सर्वश्री आनंद ठाकूर, हेमंत टकले, सुनील तटकरे, ख्वाजा बेग, नरेंद्र पाटील,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.भाई गिरकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"मुंबईला होणाऱ्या पाणी पुरवठयांपैकी ७०० दशलक्ष लीटर पाणी गळतीमुळे वाया जात असणे, तर १६० दशलक्ष लीटर पाणी टँकर लॉबीकडून चोरी केले जाणे, अनेक ठिकाणी जलवाहिन्या फोडून पाणी चोरी करुन पाण्याची विक्री होत असल्याने शासनाच्या महसूलाचे होत असलेले नुकसान व पाणी चोरी रोखण्यात आलेले अपयश, पाण्याची गळती रोखण्यासाठी प्रशासनाने काही उपाययोजना आखल्या असणे, पण प्रत्यक्षात गळती रोखण्यासाठी प्रशासनाला अपयश आलेले असणे, अर्थसंकल्पात तरतूद करूनही समस्या कायमस्वरूपी मिटलेली नसणे, रस्ते खोदकाम अथवा इतर खोदकामांवेळी संबंधित प्राधिकरण आणि महापालिका यांच्यात समन्वयाचा अभाव आढळून आला असणे, जीर्ण जलवाहिन्यामुळे हजारो लिटर पाण्याची गळती होत असणे, त्यामुळे गळतीची समस्या मिटण्याऐवजी वाढतच जाणे, गतवर्षीची आकडेवारी पाहता शहर विभागात ९ हजार ६२०, पूर्व उपनगरात ४ हजार ६९७ आणि पश्चिम उपनगरात ५ हजार ४६४ एवढी जलगळती झालेली असणे, प्रत्यक्षात गळतीचे पाणी हे माफियांच्या घशात जात असणे, महापालिकेच्या जलविभागाकडे गळती शोधण्यासाठी साऊंडिंग रॉड आणि लिंक लोकेटर ही उपकरणे उपलब्ध नसणे, पाण्याची गळती आणि चोरी या दोन्ही प्रकरणांची कारणमीमांसा होत नसणे, परिणामी, गळतीच्या नावाखाली मुंबईकरांचे २५ टक्के पाणी हे माफियांना विकले जात असणे, पाणी चोरी शोधून काढण्यासाठी एक विशेष पथक तयार करुन हेल्पलाईनची तात्काळ व्यवस्था करण्याची गरज, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व ठोस उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया."

...६...



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.रणजित पाटील (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..7..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भाई गिरकर : सभापती महोदय, मुंबई शहरातील जलवाहिन्या ब्रिटिश काळातील असून त्या 100 वर्षापेक्षा अधिक जून्या असल्यामुळे मोठया प्रमाणात पाण्याची गळती होत आहे. पाणी पुरवठ्याची समस्या सोडविण्यासाठी शासन मास्टर प्लॅन तयार करणार आहे का? मुंबई उपनगरातील चारकोप परिसरात निवासी इमारती, जून्या इमारतींची पुनर्बांधणी करण्याचे काम वेगाने सुरु आहे. त्या दृष्टीकोनातून पाणी पुरवठा करण्याबाबत शासनाने नियोजन केले आहे का व ज्या अनधिकृत नळ जोडण्या आहेत त्याबाबत कोणती कारवाई करण्यात येणार आहे?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी मुंबई शहरात जून्या झालेल्या जलवाहिन्यांबद्दल प्रश्न उपस्थित केला आहे. या संदर्भात मास्टर प्लॅन आहे. पुढील पाच वर्षात 150 कि.मी. भूमिगत पाईपलाईन टाकण्याचे प्रस्तावित आहे. 2015-16 मध्ये 36 कि.मी. पाईपलाईन टाकलेली आहे. पुढील पाच वर्षाचा दुरूस्ती, पुनर्वसन यासह मास्टर प्लॅन तयार झालेला आहे. लक्षवेधी सूचनेचा ओघ अनधिकृत नळजोडणी व गळतीच्या माध्यमातून पाणी जमा करुन ते टँकरद्वारे विकण्याचा व्यवसाय केला जातो त्या संदर्भात आहे. काही टँकरमधील पाणी पिण्यासाठी न वापरता बाहेरच्या कामासाठी वापरले जाते. परंतु पोटेबल वॉटर ड्रिंकिंगसाठी पाणी वापरले जात असेल तर आरोग्य विभाग व जल वितरण विभागाचा समन्वय साधून समिती स्थापन करुन माहिती घेतली जाईल.

श्री.मुझफ्फर हुसेन : सभापती महोदय, मुंबई महापालिकेला साधारणतः 4500 दशलक्ष लीटर पाण्याची आवश्यकता असताना 3750 दशलक्ष लीटर पाणी उपलब्ध होत आहे. या शिवाय 900 दशलक्ष लीटर पाण्याची गळती होत आहे. जून्या पाईपलाईन्स, टँकर माफिया, अनधिकृत नळजोडण्या, झोपडपट्ट्या यामुळे वर्षानुवर्षे पाण्याची गळती होत आहे. मुंबई महापालिकेत शिवसेना भारतीय जनता पक्षाचे सरकार अनेक वर्षे सत्तेत असताना ही पाण्याची गळती रोखण्यासाठी आजपर्यंत कोणतीही उपाययोजना करण्यात आलेली नाही. ही पाण्याची गळती थांबविण्यासाठी विशेष पथकाची निर्मिती करण्यात येईल काय?

...8...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.मुझफ्फर हुसेन.....

सभापती महोदय, मुंबई महापालिकेतील एका वॉर्ड ऑफिसचे क्षेत्र हे राज्यातील ब वर्ग नगरपरिषदेच्या क्षेत्राएवढे आहे. त्या शिवाय अतिरिक्त महापालिका आयुक्त, महापालिका उप आयुक्त, सहाय्यक महापालिका आयुक्त दर्जाचे अधिकारी कार्यरत आहेत. या पथकावर नियंत्रण ठेवण्याची व योग्य ती कारवाई करण्याची जबाबदारी वॉर्ड ऑफिसरकडे दिली जाईल काय, त्यांनी त्यांची जबाबदारी योग्यप्रकारे पार पाडली नाही तर त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल काय?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, हे खरे आहे की पावसाचे प्रमाण कमी झाल्यामुळे 2015 मध्ये 15 टक्के पाणी कपात केली. शहराला 3750 दशलक्ष लीटर नव्हे तर 3250 दशलक्ष लीटर पाणी पुरविले जात आहे. जी काही सांख्यिकी माहिती उपलब्ध आहे त्यानुसार आज जो पाणी साठा आहे तो जूनअखेर पुरेल एवढा आहे. त्यामुळे 3250 दशलक्ष लीटर पाणी पुरविले जात आहे. पाण्याची गळती होत आहे त्या संदर्भात काही नवीन धोरण स्वीकारले आहे. जल वितरण सुधारणा कार्यक्रमांतर्गत सेवा सल्लागाराची नेमणूक करण्यात आली आहे. या कार्यक्रमात गळती अन्वेषण म्हणजे व्हिजिलन्स व इन्स्पेक्शन सेवा अंतर्भूत आहे.

नंतर एम.1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.रणजित पाटील...

सेवा सल्लागाराच्या सूचनेप्रमाणे आता आपण अद्ययावत अशा हेलियम गॅस टेक्नॉलॉजीचा उपयोग करीत आहोत. तसेच पूर्वापार पद्धतीप्रमाणे चालणाऱ्या साऊंडींग रॉड सिस्टीमप्रमाणे देखील गळती शोधण्याचे काम करीत आहोत. आता आपण लिक डिटेक्टरचा देखील उपयोग करीत आहोत.

**सभापती :** मंत्रिमहोदय, आपण साऊंडी रॉड व लिक डिटेक्अर या दोन उपकरणांचा उल्लेख केला आहे. हे नेमके काय आहे ?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, एखाद्या लूप मधून पाणी लिक होत असेल तर रॉड टाकून आवाजाची माहिती घेतात त्याला साऊंडींग रॉड म्हणतात. दुसरे उपकरण लिक डिटेक्टर आहे. पाणी लिक होत असेल तर ते कुठे लिक होत आहे हे शोधण्यासाठी हे उपकरण वापरले जाते. हे सर्व अद्ययावत असे तंत्रज्ञान आहे. या सोबत आपण अनेक गोष्टी करीत आहोत. पण यात सर्वात अत्याधुनिक तंत्रज्ञान हे हेलियम टेक्नॉलीजीचे आहे. यात डिजिटल साऊंडींग स्टीच आहे. तसेच 10 अलाईनमेंट मशिन्स आहेत. सर्व्हिस व्हॉल्व लोकेटर आहे. काही व्हॉल्व हे जमिनीत गाडले जातात. नंतर ते लोकेट होत नाही. असे व्हॉल्व शोधण्यासाठी महानगरपालिकेकडे पाच व्हॉल्व लोकेटर आहेत. या सर्व उपाययोजना आपण करीत आहोत. तरी देखील जवळपास 25 टक्के पाण्याची गळती निश्चितपणे आहे. ही गळती अंदाजित आहे. सेंट्रल पब्लिक हेल्थ आणि एन्व्हॉयर्मेन्ट यांनी निकष ठरवून दिलेले आहेत. त्याप्रमाणे 15 टक्क्ेच्या वर गळती ग्राह्य धरण्यात आलेली आहे. सदर गळती रोखण्यासाठी आपल्याला निश्चितपणे उपाययोजना करावी लागणार आहे. महानगरपालिकेने जी काही यंत्रणा खरेदी केलेली आहे त्याप्रमाणे काम होते किंवा कसे याकडे लक्ष घातले जाईल.

ॲड.राहुल नार्वेकर : सभापती महोदय, पाण्याचा प्रश्न हा मुंबई शहरासाठी अत्यंत गंभीर आहे याबद्दल वाद नाही. या शहरात जवळ जवळ दीड कोटी लोक राहतात. आपण फक्त 75 ते 90 लाख लोकांपर्यंत पाणी पोहचू शकतो. आपण अधिक पाणी आणू शकत नाही तर किमान जे पाणी येते त्याचा वापर पुरेपूरपणे, योग्यरितीने होणे अपेक्षित आहे. माझा माननीय मंत्री महोदयांना प्रश्न असा आहे की, ज्यावेळी आपण वॉटर कनेक्शन देतो त्यावेळी आपण वॉटर मीटर्स इन्स्टॉल

..2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.राहुल नार्वेकर....

करतो. त्यामुळे मुंबईतील सर्व वॉटर्स मीटर्स बरोबर काम करीत आहेत काय, किती वॉटर्स मीटर्स बंद पडलेले आहेत, त्यावर महानगरपालिकेने कोणती उपाययोजना केली आहे असा माझा पहिला प्रश्न आहे. मुंबई शहरात अनेक पंचतारांकित हॉटेल्स आहेत. अनेक इंडस्ट्रीयल एस्टाब्लिशमेंट आहेत, अनेक शॉप्स ॲंड एस्टाब्लिशमेंटस् आहेत. माझ्या माहितीनुसार अनेक भागांमध्ये वॉटर बिल्स एरिअर्स आहेत. तेव्हा ही थकबाकी एकूण किती रकमेची आहे ? यावर महानगरपालिकेने कोणती ॲक्शन घेतली आहे ? उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार आर्टिकल 21 राईट टू लाईफ मध्ये राईट टू पोटेबल वॉटर हे पण मान्य केले आहे. महानगरपालिकेला आणि शासनाला हायकोर्टाने स्पष्ट निदेश दिले आहेत की, जेवढे लोक आहेत त्यांना पाणी पुरविणे हे आपले कर्तव्य आहे. त्यांना आपल्याला पाणी पुरवठा करावा लागेल. असे असूनही महानगरपालिका सन 2000 ची पात्रता पकडून केवळ दिनांक 1.1.2000 पर्यंतच्या झोपड्या आहेत त्यांनाच पाणी पुरवठा करीत आहे. तेव्हा माझा प्रश्न असा आहे की, हा हायकोर्टाच्या आदेशाचा अवमान नाही काय ? हायकोर्टाचे आदेश असताना राज्य शासन, महानगरपालिका सर्वांना पाणी का पुरवित नाही ?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांचा पहिला प्रश्न हा पाणी पुरवठा आणि कनेक्शनसंबंधातील होता. मुंबई महानगरपालिका इस्टर्न सबर्ब, वेस्टर्न सबर्ब आणि मुख्य सिटी अशी विखुरलेली आहे. इस्टर्न सबर्ब आणि वेस्टर्न सबर्बमध्ये पूर्णत: वॉटर्स मीटर्स लागलेली आहेत आणि ती योग्य आहेत. पण आयलंड सिटीमध्ये जुने बांधकाम आहे तेथे पाहिजे त्या व्याप्त प्रमाणात पाण्याचे मीटर कशेक्न्स नाही. एकूण कनेक्शन्स 3 लाख 70 हजार असून ते मीटर्ड आहेत. जवळ पास 1 लाख कनेक्शन्स अन मीटर्ड आहेत हे मान्य करावे लागले. यात आयलॅंड सिटी आहे हे आधीच सांगितलेले आहे. जुनी बांधकामे आहेत तेथे अन मीटर्ड पाणी आहे असे संगितले आहे. आता आपण दुसरा प्रश्न उपस्थित केला आहे की, जेथे इलेक्ट्रॉनीक वॉटर मीटर बंद आहे त्यासाठी आपण काय करणार आहात ? यासंबंधी निश्चित असे धोरण आखून आयलॅंड सिटीमध्ये जेथे मीटर नाही तेथे कार्यवाही करण्यात येईल. हायकोर्टाचे बंधन असल्यामुळे

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.रणजित पाटील....

आपल्याला प्रत्येकाला पोटेबल वॉटर देणे बंधनकारक आहे. पण त्याच वेळी जेथे अनमीटर्ड पाणी दाखविले जाते तेथे बेहिशोबी गळती होते. ती गळती कमी होणे आवश्यक आहे. त्याला एन.आर.डब्ल्यू असे म्हणतात. आपला दुसरा प्रश्न असा होता की, पाणी कमी आहे. मोडक सागर, तानसा, अप्पर वैतरणा, वैतरणा, मध्य वैतरणा, तुळशी, भातसा येथील एकूण पाण्याची क्षमता 14 लाख 47 हजार दक्ष लक्ष घन मीटर एवढी आहे. आज सुद्धा आपल्याकडे 5 लाख 13 हजार दशलक्ष घन मीटर इतके पाणी उपलब्ध आहे. 50 टक्के मृत साठा आपण पकडला तर जुलै-ऑगस्ट अखेर पर्यंत आपल्याकडे पाणीसाठा उपलब्ध आहे. थकबाकीसह बाकी अन्य मेझर्स आपल्याला घ्याव्या लागणार आहेत. पाणी हे मीटर्ड असले पाहिजे असा संदेश आपल्याला कुठे तरी द्यावा लागेल. आज आपला महसूल जात आहे. आज आपल्याला महसूल मिळत नाही, एनआरडब्ल्यू आहे त्याचे प्रमाण कमी होण्यासाठी ज्या काही उपाययोजना करणे आवश्यक आहे त्या केल्या जातील.

ॲड.राहुल नार्वेकर : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी बरीच माहिती दिली आहे त्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत. पण नेमका जो प्रश्न होता त्याला उत्तर दिलेले नाही. थकबाकी किती जणांची बाकी आहे असा मी प्रश्न विचारला होता. ती थकबाकी वसूल करण्यासाठी महानगरपालिकेने कोणती पावले उचलली आहेत, याचे उत्तर आम्हाला अजूनही मिळालेले नाही. ते अत्यंत महत्वाचे आहे. आपण वॉटर मीटर दिलेले आहे. जे लावलेले नाही त्याबद्दल मी विचारलेले नाही. पण जे लावले आहे पण काम करीत नाही त्याची संख्या किती आहे, त्याबद्दल आपण कोणती उपाययोजना केली आहे हा माझा प्रश्न होता.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, जी मीटर्स लावलेली आहेत, परंतु काम करीत नाही किंवा थकबाकी आहे यासंबंधातील तपशीलवार माहिती घेऊन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल.

..4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी पाण्यासंबंधात विस्तारपूर्वक अशी माहिती दिलेली आहे. मी आपल्याला स्पेसिफिक प्रश्न विचारीत आहे. गळती शोधण्यासाठी आपण साऊंडींग रॉड, लिक डिटेक्टर, हेलियम गॅस याचा वापर करीत आहात. आजही मुंबईतील कित्येक भागांमध्ये परळ, प्रभादेवी, काळाचौकी येथे वारंवार गढूळ पाणी येत आहे. आपण पाण्याची गळती रोखण्यासाठी तीन सिस्टीम काढलेल्या आहेत. तसे गढूळ पाणी शोधण्यासाठी कोणती उपकरणे शोधून काढली आहेत ? कारण प्रत्येक महिन्यामध्ये गढूळ पाण्याचा प्रश्न समोर येत आहे. त्यावर कोणती उपायोजना शोधून काढली असेल ती सदनासमोर सांगावी. आपण लेखी उत्तराच्या शेवटच्या परिच्छेदामध्ये नमूद केले आहे की, "मुंबईमध्ये पिण्याव्यतिरिक्त वापरासाठी खाजगी टँकरमधून पाण्याचा पुरवठा केला जातो. मात्र त्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून परवानगी देण्यात येत नाही." आपण मुंबईच्या रस्त्यावर बघितले असेल की, दहा वाहने गेल्यानंतर पाण्याचा एक टँकर जाताना दिसतो. आपण मेक इन महाराष्ट्र करायला निघाले आहात. उद्योगांसाठी लागणारे पाणी आपण देऊ शकत नाही. परवानगी मागितली तर टँकर पाठवत नाही असे म्हणता. उद्योग धंदे चालविण्यासाठी टँकर फिरत आहेत ते परवानगी नसताना कसे काय फिरत आहेत ? ते रॉकेल न भरता पाणी भरूनच फिरत आहेत. आम्ही परवानगी देत नाही असे आपणच म्हणत आहात. तेव्हा रस्त्यावर फिरणारे पाण्याचे टँकर आपण तातडीने बंद करणार आहात काय ?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांनी गढूळ पाण्यासंबंधात प्रश्न विचारला आहे. जेथून अशा प्रकारच्या तक्रारी येतात तेथील स्टँड पोस्टपर्यंतची पाईपलाईन शुद्ध पाणी येईपर्यंत रिकामी केली जाते. नंतर गळती शोधून पूर्ववत पाणी पुरवठा आपण सुरू करतो. परवानगी शिवाय टँकर चालतात काय, असा दुसरा प्रश्न विचारलेला आहे. पाणी पुरवठा खंडित अथवा कमी प्रमाणात होत असेल आणि त्यासंबंधी एखाद्या सोसायटीकडून महानगरपालिकेकडे लिखित स्वरूपात टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्याचा अर्ज प्राप्त झाल्यास पाण्याचे शुल्क आकारून पाणी पुरविण्यात येते. मुंबईमध्ये पिण्याव्यतिरिक्त वापरासाठी पाण्याचा पुरवठा खाजगी टँकरमधून केला जातो असे लेखी उत्तरात लिहिलेले आहे.

..5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, चुकीचे रेकॉर्डवर येऊ नये म्हणून मी सांगू इच्छितो की, मुंबईतील असंख्य सोसायटीमध्ये आजही टँकरने पाणी येत आहे. याची कल्पना महानगरपालिकेला आहे. याची माहिती मंत्रिमहोदयांनी अधिकाऱ्यांकडून घ्यावी.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांची माहिती सत्य गृहीत धरून जर मला विभागाने चुकीची माहिती दिली असेल तर त्यासंबंधी चौकशी करून पुढील कारवाई केली जाईल.

यानंतर श्री.अजित...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, कांदिवली (पूर्व) येथील दामू नगर आणि लहूगड येथील पाईपलाईन फुटल्यामुळे त्या पाईपलाईनतून मोठ्या प्रमाणावर पाणी वाया जात आहे. महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले की, ती पाईपलाईन दुरूस्त करता येत नाही. आजपर्यंत त्या पाईपलाईनमधून लाखो लीटर पाणी वाया गेले आहे. तेव्हा ती पाईपलाईन ताबडतोब दुरूस्त करण्यात येईल काय ? माझा दुसरा प्रश्न आहे की, मालाड रिझर्व्हवॉयर येथे पाण्याची मोठी टाकी असूनही तेथील सहा वॉर्डामध्ये पाण्याचे कनेक्शन्स मिळत नाही. परंतु माफियांना मात्र एका रात्रीत पाण्याचे कनेक्शन मिळते. पाणी माफिया ते पाणी झोपडपट्टीतील लोकांना पाच रूपयाला एक हंडा या दराने विकतात. यामध्ये नगरसेवक आणि महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांची मिलिभगत आहे. सत्ताधारी पक्षातील मंडळींमार्फत हे काम होत आहे. आपणास मुंबईतील अनेक ठिकाणी पाईपलाईन्समध्ये लिकेजेस दिसतात. परंतु ते लिकेजेस तातडीने दुरूस्त करण्यात येत नाही. हे लिकेजेस केव्हा दुरूस्त करण्यात येणार आहेत ? मी ज्या भागाचे प्रतिनिधी करते तसेच पूर्वी त्या भागाची नगरसेविका होते त्या भागातील लोकांना पाण्याचे कनेक्शन मागितले तर आमच्याकडे 20 घरांची रेशनकार्डस, व्होटींग लिस्टमधील लोकांची नावे आणण्यास सांगितले जाते. ही सर्व माहिती दिल्यानंतरही पाणी उपलब्ध करुन दिले जात नाही. परंतु माफियांना मात्र एका रात्रीत पाईपलाईन दिली जाते. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांनी टँकरबद्दल सांगितले. विलेपार्ले (पूर्व) येथे प्रार्थना समाज रोडवर अनेक टँकर्स उभे असतात. परांजपे स्कीम या विकासकाच्या साईटवर ती टँकर्स जातात. हे सर्व महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांना माहीत असूनही काही कारवाई होत नाही. मुंबईत सत्ताधारी पक्षाच्या आशीर्वादाने सुरु असलेला पाणी माफियाचा धंदा बंद होईल काय ?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण यांनी कांदिवली येथील दामू नगर आणि लहूगड भागात पाण्याची गळती होत असल्याचे सांगितले. मागील पाच वर्षात 39 हजार 556 तक्रारी आलेल्या आहेत. दुरूस्तीचे काम निरंतर चालू असते. जल अभियंता, उप जल अभियंता, कार्यकारी अभियंता, सहाय्यक अभियंता यांचे एक पथक हे काम पाहत असते. दिडोंशी येथे रिझर्व्हवॉयर असताना तेथील लोकांना पाणी मिळत नाही असे



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.रणजित पाटील.....

सन्माननीय सदस्यांनी सांगितले. तसेच त्यांनी येथे ज्या बाबींचा उल्लेख केलेला आहे त्याची माहिती घेऊन त्या संदर्भात निश्चितपणे कारवाई करण्यात येईल.

-------

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती )**

**पृ. शी.** : राज्यात सुरु असलेली ऑनलाईन औषध विक्री

**मु. शी.** : राज्यात सुरु असलेली ऑनलाईन औषध विक्री यासंबंधी डॉ. सुधीर तांबे, सर्वश्री शरद रणपिसे, माणिकराव ठाकरे, डॉ.नीलम गोऱ्हे, श्रीमती स्मिता वाघ, श्रीमती शोभाताई फडणवीस,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री.शरद रणपिसे (विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय अन्न व औषध प्रशासन मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"ऑनलाईन औषध विक्री करणाऱ्यांकडून औषधे खरेदी करणे हा गुन्हाच आहे असे मत मा.उच्च न्यायालयाने जनहित याचिकेत व्यक्त केले असून अन्न व औषध प्रशासनाने ऑनलाईन औषध कंपन्यांवर कारवाई करण्याचे आदेश मा.उच्च न्यायालयाने दिले असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले असणे, महाविद्यालयीन विद्यार्थी औषधांची ऑनलाईन खरेदी करून त्या औषधाचा दुरूपयोग करीत असणे, बेटी बचाओ बेटी पढाओ हा कार्यक्रम जोमात सुरू असतानाही गर्भपाताच्या औषधांची सुध्दा ऑनलाईन विक्री होत असणे, तसेच पेनकिलर कॅन्सर इत्यादी औषधांची सुध्दा ऑनलाईन विक्री होत असणे, ऑनलाईन औषधांचा स्टॉक रिपोर्ट उपलब्ध न होणे, विक्रीकरता रुग्णांना सवलतीचे आमिष दाखविण्यात येणे, सध्या सात वेबसाईटसवर ऑनलाईन औषधविक्री होत असुनही राज्य शासन याबाबत आवश्यक कारवाई करीत नसल्याने नागरिकांचे जीवन धोक्यात आलेले असणे, याप्रकारे विनापरवानगी औषध विक्री करणाऱ्यांवर कडक कारवाई करण्याची आवश्यकता असणे, हे लक्षात घेता शासनाने याबाबत त्वरीत करावयाची कारवाई तसेच शासनाची प्रति क्रया."

..4..



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. गिरीष बापट ( अन्न आणि औषध प्रशासन मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..5..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, ऑनलाईन औषधांची विक्री हा अतिशय गंभीर स्वरुपाचा विषय आहे. या संदर्भात माननीय उच्च न्यायालयाने ऑनलाईन पद्धतीने औषधांची विक्री करणे हे कायद्याला धरुन नाही, ते बेकायदेशीर आहे, अवैध आहे असे सांगितलेले आहे. तसेच ड्रग कंट्रोल ऑफ इंडिया यांनी सुद्धा कायद्यामध्ये ऑनलाईन औषध खरेदीची तरतूद नाही असे सांगून जेथे जेथे अशाप्रकारचे गुन्हे घडत असतील तर त्यांच्यावर कारवाई करावी असे आदेश दिलेले आहेत. माझे दोन स्पेसिफीक प्रश्न आहेत. माझा पहिला प्रश्न आहे की, माननीय उच्च न्यायालयाचे आणि ड्रग कंट्रोल ऑफ इंडियाचे आदेश असताना मुंबईच्या पोलीस आयुक्तांनी पोलिसांनी फर्मा ईजी कंपनीची औषधे खरेदी करावीत असे लेखी पत्र सर्वांना पाठविले आहे काय ? माझा दुसरा प्रश्न असा आहे की, अन्न व औषध प्रशासन विभागाने स्नॅपडील आणि शॉपक्ल्यू या दोन ऑनलाईन विक्री करणाऱ्या कंपन्यांवर छापे टाकले. त्या कंपन्यांवर गुन्हे नोंदविण्याबाबत पोलीस विभागाला कळविण्यात आले. या दोन कंपन्यांवर गुन्हे नोंदविण्यात आले का, नसल्यास का, तसेच विलंबाची कारणे काय आहेत आणि त्या संदर्भात राज्य शासन कोणती कारवाई करणार आहे ?

श्री.गिरीष बापट : सभापती महोदय, एका महत्वाच्या आणि देशव्यापी प्रश्नावर सन्माननीय सदस्यांनी लक्ष वेधलेले आहे त्याचे मी सविस्तर उत्तर देतो. कोणत्याही राज्यातील औषधांची विक्री ही या विभागाच्या परवानगीने होते. या प्रश्नाची व्याप्ती सांगातो. मुंबईत एका ठिकाणी छापा टाकला तेव्हा तीन राज्यांतून व्हीजिलन्स पथक प्रवास करुन बांगला देशाच्या सीमेपर्यंत जाऊन थांबले आणि तेथे काही करता आले नाही. राज्य शासनाने ऑनलाईन विक्रीची परवानगी दिलेली नाही आणि देणारसुद्धा नाही. या संदर्भात केंद्र सरकारने चार महिन्यापूर्वी महाराष्ट्राचे अन्न व औषधे प्रशासन आयुक्त श्री.कांबळे यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली आहे. या समितीला सहा महिन्यामध्ये अहवाल द्यायचा आहे. त्या समितीच्या आतापर्यंत चार बैठका झाल्या. त्या बैठकांमध्ये उत्पादक, विक्रेत, डॉक्टर्स, सामाजिक संस्था, ग्राहकमंच या सर्वांनी आपल्या सूचना दिलेल्या आहेत. या संदर्भात कोणता कायदा करायचा याची माहिती सदर समिती केंद्र सरकारला देणार आहे. ऑनलाईन विक्रीच्या माध्यमातून गर्भाशयाच्या संदर्भातील, मादक किंवा उत्तेजक अशाप्रकारची औषधे किंवा वस्तू विकल्या जातात त्याचा गैरवापर आणि दुरुपयोग होतो. त्यावर

..6..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.गिरीष बापट....

आपणास नियंत्रण ठेवायचे आहे आणि ते नियंत्रण करण्यास विभाग समर्थ आहे. आपणास माहीत आहे की, जोपर्यंत नवीन कायदा होत नाही तोपर्यत औषधे व सौंदर्य प्रशासन 1940 च्या कायद्याखाली कोणतीही परवानगी दिली नाही. ऑनलाईन विक्रीस विक्रेत्यांकडून विरोध आहे. फार्मसीच्या दुकानदारांनी सांगितले की, ऑनलाईनमुळे व्यवसाय कमी होत आहे, बंद पडत आहे. हा इतका व्यापक प्रश्न असल्यामुळे केंद्र सरकारने नेमलेल्या समितीचा अहवाल आल्यानंतर त्यावर निर्णय घेण्यात घेईल. सन्माननीय सदस्यांनी दोन कंपन्यांची नावे सांगितली. राज्यात 50 ठिकाणी धाडी टाकून ऑनलाईन विक्री करणाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत. स्नॅपडील आणि शॉपक्ल्यूज आणि दहा कंपन्यावर गुन्हे दाखल केले असून संबंधितांना अटक केलेली आहे. त्यातील काही जण न्यायालयात जामीन घेऊन सुटले आहेत. तो आपल्या अखत्यारितील प्रश्न नाही. दहा कंपन्यांवर खातेनिहाय कारवाई होऊन पोलिसांच्या मदतीने त्यांच्यावर केस दाखल केलेली आहे. त्यामध्ये त्यांना काय शिक्षा व्हायची ती होईल.

यानंतर श्री.बोर्डे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.गिरीश बापट....

हा कायदा मुळात केंद्र सरकारचा आहे. केंद्र सरकारचा कायदा राज्य सरकारला ॲप्लीकेबल आहे. त्यामुळे यामध्ये सुधारणा करण्यासंदर्भात सुध्दा समिती विचार करीत आहे. कारण लोकांना घरबसल्या ओषधी पाहिजेत ही मानसिकता झाली आहे. परंतु अवैधपणे जी विक्री सुरु आहे त्यावर राज्य सरकारला नियंत्रण ठेवायचे आहे. अवैधपणे विक्री करणाऱ्या कंपन्यांवर कारवाई केली. त्यांना अटक झाली होती आणि त्यांनी बेल घेतली. यातील 10 कंपन्या बाहेरच्या राज्यातील आहेत. बाहेरच्या राज्यातील कंपन्यांवर कारवाई करण्याबाबत आपल्या राज्य सरकारने त्या त्या राज्य सरकारांना कळविले आहे. या बाबतची यादी सुध्दा मी पटलावर ठेवू शकतो. तसेच सन्माननीय सदस्यांनी पोलीस विभागाशी संबंधित प्रश्न विचारला आहे. मी सांगू इच्छितो की, अशा प्रकारची खरेदी करण्यासाठी आमच्या विभागाने पोलीस विभागाला कोणतीही परवानगी दिलेली नाही. जोपर्यंत या कायद्यात दुरुस्ती होत नाही किंवा अवैधपणे विक्री बंद होत नाही तोपर्यंत विभागाकडून अशा प्रकारची परवानगी दिली जाणार नाही. ऑनलाईन औषध विक्रीला परवानगी नसताना सुध्दा पोलीस आयुक्तांनी अशा प्रकारची परवानगी दिली असेल तर त्याची माहिती घेऊन, त्यांनी तसे पत्रक काढले असेल तर ते रद्द करण्याचे आदेश राज्य सरकारकडून देण्यात येतील आणि तोपर्यंत राज्य सरकार अशा प्रकारची विक्री करु देणार नाही.

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, मी विचारलेल्या प्रश्नांना माननीय मंत्र्यांनी काही प्रमाणात उत्तरे दिलेली आहेत. मी स्नॅप डीलच्या बाबतीत निदर्शनास आणून दिले होते. माननीय मंत्र्यांनी सांगितले की, त्या कंपनीवर गुन्हा दाखल केला आहे. त्या कंपनीवर गुन्हा दाखल केला की नाही हे आम्ही पाहू. जर त्या कंपनीवर गुन्हा दाखल केला नसेल तर आम्ही विशेषाधिकार भंगाची सूचना मांडू. असो. महोदय, पोलीस आयुक्तांनी मी सांगितल्याप्रमाणे पत्रक निर्गमित केले असेल तर त्या बाबतची माहिती घेऊन चौकशी करु, असे माननीय मंत्र्यांनी उत्तर दिले आहे. परंतु या संदर्भात त्यांच्यावर करावयाच्या कारवाईबाबत त्यांनी उत्तर दिलेले नाही. मी पुनश्च विचारु इच्छितो की, जर पोलीस आयुक्तांनी कायदा मोडला असेल तर त्यांच्यावर सुध्दा गुन्हा दाखल करणार काय ?



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.गिरीश बापट : सभापती महोदय, या संदर्भातील सर्व माहिती घेतल्यानंतर कोणत्याही पर्टीक्युलर कंपनीकडून औषधी घेण्याची शिफारस केली असेल तर त्याचा वेगळा अर्थ होऊ शकतो. उदाहरणार्थ ती कंपनी त्या औषधाच्या बाबतीत डिस्काऊंट देत असेल. तशा प्रकारे ही सुध्दा कंपनी असू शकते. परंतु त्यांनी पत्रामध्ये ऑनलाईन खरेदी करा असे नमूद केले असेल तर त्यांचे पत्रक तपासले जाईल. जर त्यांनी ऑनलाईन खरेदी करावी असे नमूद केले असेल तर त्यांना त्यामध्ये दुरूस्ती करावयास सांगितले जाईल आणि त्यांनी कोणत्या अधिकाराखाली ऑनलाईन खरेदीबाबतपत्र पत्र दिले याची चौकशी करण्यात येईल. वास्तविक पाहता कायदा हा सर्वांना सारखा आहे. मग ते पोलीस आयुक्त असोत किंवा सामान्य नागरीक असोत. त्यामुळे या प्रकरणी कायदेशीर बाबी तपासून या प्रकरणी योग्य ती कारवाई केली जाईल.

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, माननीय मंत्र्यांनी सविस्तरपणे उत्तर दिलेले आहे. परंतु मी काही मुद्दे त्यांना विचारु इच्छितो. लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात नमूद केले आहे की, 51 वेबपोर्टल्सची माहिती घेण्यात येऊन त्यावर ऑनलाईन औषधांची मागणी नोंदविण्यात आली होती. महोदय, याचा अर्थ विभागाने 51 वेबपोर्टल्स ऑनलाईन औषधांची विक्री करीत असल्याचे मान्य केले आहे. यातील 21 प्रकरणांत प्रतिसाद दिल्यामुळे त्यांच्यावर कारवाई करण्यात आलेली आहे. परंतु उर्वरि 30 प्रकरणी प्रतिसाद न दिल्यामुळे त्यांच्यावर कारवाई करण्यात आलेली नाही. मी विचारु इच्छितो की, ज्या 30 लोकांनी प्रतिसाद दिला नाही त्यांच्यावर कारवाई करणार आहात की की नाही ? वास्तविक पाहता या लोकांकडून जरी प्रतिसाद मिळाला नसला तरी त्यांच्यावर कारवाई व्हावयास पाहिजे होती. डीजीसी ॲक्टमध्ये फार शिक्षेची तरतूद नाही. कारण हा ई-कॉमर्स प्लॅटफॉर्मवर चालणारा व्यवसाय आहे. ऑनलाईन व्यवसाय हा ग्राहकांच्या उपयुक्ततेसाठी असणारा व्यवसाय असे चित्र रंगविले जाते. परंतु डीजीसीएमध्ये शेड्यूल्ड ठरलेले आहेत. त्यानुसार एच-1 मध्ये विना प्रिस्क्रीप्शन किंवा ऑन दि काऊंटर कोणते ड्रग्ज्/औषध दिले पाहिजे याची नियमावली आहे. परंतु ऑनलाईन विक्रीमध्ये कोणतेही नियम पाळले जात नाहीत. माझे स्पेसिफिक म्हणणे आहे की, हा सायबर क्राईम आहे. वास्तविक पाहता या प्रकरणी आयटी ॲक्ट-2000 अंतर्गत कारवाई होईल शकते. आपण या ॲक्ट अन्वये कारवाई

..3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील....

केली तरच याला पायबंद घालता येऊ शकतो. डीजीसी ॲक्टची भिती ऑनलाईन विक्री करणाऱ्यांना नाही. ऑनलाईन विक्री करणाऱ्या कंपन्यांची शक्ती प्रचंड प्रमाणावर आहे. त्यामुळे आयटी ॲक्ट आणि सायबर क्राईमखाली कारवाई करणार काय आणि उर्वरित 30 लोकांवर सुध्दा कारवाई करणार काय ?

श्री.गिरीश बापट : सभापती महोदय, अशा प्रकारे अवैधपणे ऑनलाईन विक्री करणाऱ्या राज्यातील सर्व कंपन्यांवर लगेच कारवाई केली आहे. राज्याच्या बाहेरील आणि परदेशातील सुध्दा अशा अनेक कंपन्या आहेत. परदेशातील कंपन्यांवर कशा प्रकारची कारवाई करावी हा विषय आहे. राज्याबाहेरील कंपन्यांवर सुध्दा कारवाई केली आहे. यातील 5-7 कंपन्या राज्याबाहेरील आहेत. परंतु राज्यातील सर्व कंपन्यांवर योग्य ती कारवाई केली आहे. त्यांची वेबसाईट टेक्नीकल आणि आयटी दृष्ट्या चेक केली. त्यामध्ये निदर्शनास आले की, फक्त 21 जणांनीच औषधांचा पुरवठा केला आहे. आम्ही 51 जणांच्या विक्रीची तपासणी केली आहे. त्यामध्ये 21 लोकांनी औषधांची विक्री केली आहे. यामध्ये राज्यातील सर्व लोकांवर कारवाई केली आणि परराज्यातील 5 कंपन्यांवर कारवाई करण्याबाबत त्या राज्य सरकारांना कळविले आहे. मी पुन्हा सांगू इच्छितो की, अवैधपणे ऑनलाईन औषध विक्री करणाऱ्या सर्वांवर कारवाई केली जाईल. परंतु टेक्नीकली हे शोधणे फार कठीण असते. एका निरीक्षकाने लाखो वेबसाईट शोधणे शक्य नाही. त्यामुळे या कामी भविष्यात सायबरची सुध्दा मदत घेऊ. सन्माननीय सदस्यांनी आयटी ॲक्ट आणि सायबर क्राईमची मदत घेण्याबाबत अतिशय योग्य सूचना केली आहे. याशिवाय विभागाला तांत्रिक गोष्टी सुध्दा करता येतील. विभागाचे आयुक्त श्री.कांबळे साहेबांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय पातळीवर समिती गठीत करण्यात आली आहे. त्या समितीला अशा सूचना प्राप्त झालेल्या आहेत. हा कायदा राज्य सरकारचा नव्हे तर केंद्र सरकारचा आहे. परंतु राज्य सरकार त्यामध्ये सूचना करु शकते. आम्ही या विभागाचा कारभार बघत असताना यामध्ये काय काय सुधारणा करता येतील जेणेकरुन अवैध मार्गाने औषध विक्री होणार नाही याचा अभ्यास केला. सन्माननीय सदस्यांनी केलेली सूचना खरोखरच चांगली आहे. त्यामुळे त्यांनी केलेली सूचना केंद्र सरकारकडे पाठविण्यात येईल आणि या कायद्यात बदल करण्यात येईल. आयटी ॲक्ट मार्फत शिक्षा किंवा

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.गिरीश बापट....

बाकीच्या गोष्टी करता येतील काय ही सकारात्मक सूचना असल्यामुळे त्याचाही विचार करुन केंद्र सरकारकडे ती सूचना पाठविण्यात येईल.

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, केंद्र सरकारकडून आयटी ॲक्ट अंतर्गत कारवाई करण्यासाठी परवानगी घेण्याची आवश्यकता नाही. मी असे विचारलेले आहे की, राज्य सरकार या ॲक्ट अंतर्गत कारवाई करणार काय ? राज्य सरकारने विभागाच्या आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत केली आहे. ते विस्तारपूर्वक अहवाल सादर करतील. त्यामुळे सध्या जे या प्रकरणात सापडले आहेत त्यांच्यावर आपण आयटी ॲक्ट अंतर्गत कारवाई करु शकता. त्यामुळे मी स्पेसिफिक विचारतो की, आयटी ॲक्ट अंतर्गत त्यांच्यावर कारवाई करणार काय ?

श्री.गिरीश बापट : महोदय, या विषयी तपासून बघण्यात येईल. जर कारवाई करता येत असेल तर नक्की करण्यात येईल.

श्री.प्रकाश गजभिये : सभापती महोदय, राज्यात सध्या गंभीर प्रकार सुरु आहे. परंतु राज्य सरकार त्याकडे दुर्लक्ष करीत आहे. यामध्ये महाविद्यालयीन विद्यार्थी भरडला जात आहे. महाविद्यालयीन विद्यार्थी ऑनलाईन औषधाची खरेदी करुन सदर औषधांचा दुरुपयोग करीत असल्याची बाब विभागाच्या निदर्शनास आली नाही असे लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात नमूद केले आहे. मी विचारु इच्छितो की, ऑनलाईन औषधांची खरेदी-विक्री मॉनिटरींग करण्यासाठी विभागाकडे कोणती यंत्रणा आहे व तिचे कामकाज कशा स्वरुपात चालते ?

श्री.गिरीश बापट : महोदय, अवैध मार्गाने आणि गैर वापराच्या दृष्टीने खरेदी केलेल्या औषधांच्या तपासणीसाठी राज्यातील दुकानांची तपासणी केली जाते. राज्यात 7-8 लाख दुकाने आहेत. एवढी या विषयाची व्याप्ती आहे. औषधी द्रव्ये विभागाचे निरीक्षक दुकानांमध्ये जाऊन तपासणी करतात. तपासणी करताना औषधाच्या किंमतीच्या पावत्या तपासतात. त्यावर कोणत्या डॉक्टरांचे प्रिस्क्रीप्शन आहे हे लिहितात. एका ठिकाणी प्रिस्क्रीप्शनशिवाय लाखभर ट्युब विकल्याचे निदर्शनास आले होते. त्याचे वितरक वेगळ्या राज्यातील आहेत. प्रिस्क्रीप्शनशिवाय औषधांची विक्री केलेल्यांवर कारवाई केलेली आहे. यापूर्वी सुध्दा कारवाई केली आहे. दुकानातून खरेदी

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

केल्यानंतर त्या औषधाचा उपयोग कोण कसा करतो हे विक्रेत्याला सुध्दा माहीत नसते. विभाग या

..5..



श्री.गिरीश बापट....

बाबतचा शोध घेत असतो. लहान मुलांनी गुटखा खाणे, कॉलेजच्या तरुणांनी मादक पदार्थांचे सेवन करणे या बाबत व्हीजीलन्स टीम महाविद्यालयात जाते आणि ते पदार्थ कोठून आणतात या बाबत तपासणी करते. त्या मुलांनी कोठून औषधी आणली हे सुध्दा जाणून घेण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी असे निदर्शनास आले की, छोटे विक्रेते काही ठिकाणांवरुन अशा प्रकारची विक्री करतात. या विक्रीची मोठी लिंक पोलिसांच्या माध्यमातून सुध्दा शोधण्याचा प्रयत्न सुरु आहे.

पी.......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. मुझफ्फर हुसेन : सभापती महोदय, माननीय मंत्र्यांनी आताच अशी माहिती दिली की, ऑनलाईनवाले केमिस्टच्या दुकानावरून देखील खरेदी करतात. कोणतेही औषध खरेदी करताना डॉक्टरांचे प्रिस्किप्शन मेडिकल कायद्याप्रमाणे गरजेचे आहे, बंधनकारक आहे. प्रिस्क्रिप्शन शिवाय जी दुकाने औषधे देतात, त्यांच्यावर काय कारवाई करणार आहात ?

श्री. गिरीश बापट : सभापती महोदय, अशा पध्दतीने विक्री करणाऱ्यांच्या संदर्भात कायद्यामध्ये कलमे आहेत, त्यानुसार कारवाई करण्यात येईल. अशा कारवाया राज्यात सुरूआहेत. आपल्याला हवे असतील तर जिल्हानिहाय आकडे देईन, पटलावर ठेवीन.

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, हा प्रश्न ऑनलाईन औषध विक्रीसबंधी आहे. आताच्या बदलत्या परिस्थितीत ऑनलाईन विक्रीच्या धंदात जगभरातील, देशभरातील मोठ्या कंपन्या उतरल्या आहेत. त्यांच्याकडून ज्या पध्दतीची इन्सेंटिव्हज् ऑनलाईन खरेदीत दिली जातात, त्यामुळे अनेक वस्तू ऑनलाईन खरेदी व्यवहाराने लोकापर्यंत पोहचू लागलेल्या आहेत. परंतु यामधील महत्त्वाचा भाग औषधांसंबंधीचा होता, त्यावर बंदी घातली आहे, हे आपण सांगितले आहे, मात्र तरी सुध्दा छुप्या मार्गाने ऑनलाईनवर सुध्दा हे चालू राहू शकेल अशा प्रकारची अवस्था आज राज्यात आहे. आता जेनरिक मेडिसिनची दुकाने निघणार आहेत असे सांगितले आहे. आपल्याला जेनरिक मेडिसिन उपलब्ध होणार आहेत, त्यावेळी जी ॲप्रुव्हड जेनरिक मेडिसिन्स केंद्र सरकार व राज्य शासन यांनी ठरविली आहेत ती, जी अपायकारक नाहीत आणि जी मिळू शकतात, अशा पध्दतीची व्यवस्था दोन्ही बाजुंचा समन्वय राखण्यासाठी या धंद्यामध्ये काही तरी करता येण्याची आवश्यकता आहे. आपण औषधविक्रीचा हा सगळा व्यवहार तपासणार आहोत. त्यामुळे त्यासाठी आताच माजी माननीय राज्यमंत्र्यांनी सांगितल्याप्रमाणे, आपल्या विभागाची याबाबत कॉम्पिटन्सी काय आहे, आपल्या विभागातील अधिकारी, कर्मचारी हा सगळा विभाग सांभाळण्यासाठी सक्षम आहेत का, त्यांना याबद्दलचे प्रशिक्षण देण्याची तुमच्याजवळ काही योजना आहे का, त्या पध्दतीचे काही टायप तुम्ही फार्मास्युटिकल कॉलेजशी जमविलेले आहेत का ? त्या पध्दतीचे रिफ्रेशल कोर्सेस मेडिकल स्टोअरवाल्यांना आणि तुमच्यात खात्यात काम करणाऱ्या अधिकाऱ्यांना असतील आणि अशा प्रकारे केले तरच यावर काही तरी नियंत्रण येऊ शकेल. शासन त्या दृष्टीने निश्चित काय उपाययोजना करणार आहे ?

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. मुझफ्फर हुसेन)**

श्री. गिरीश बापट : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांनी महत्त्वाचे असे 2-3 मुद्दे उपस्थित केले आहेत. सन 2015 ते सन 2016 या कालावधीत अमरावती, औरंगाबाद, मुंबई, कोकण, नागपूर, नाशिक, पुणे येथील एकूण शेड्यूल्ड ड्रग विना प्रिस्क्रिप्शन विकल्याचे 21 प्रकार आहेत, विना फार्मासिस्ट विकल्याचे 233 प्रकार आहेत, विना बिल विकल्याचे 27 प्रकार आहेत. सर्व एकत्रित केले तर 221-17 होतात गुन्हे नोंद करून या सर्वांवर कारवाई करण्यात आली आहे. सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांनी विचारलेला प्रश्न बरोबर आहे. जेनरिक औषधांच्या बाबतीत डॉक्टरांना कायद्याने शिक्षा करता येत नाही की, त्यांनी कोणते औषधे द्यावे. हे मेडिकलचे फाऊंडेशनच्या एथिक्समध्ये आहे, कायद्यात नाही. एखादा कायदा मोडला तर किती वर्षे शिक्षा आहे ते आपण पाहतो. मघाशी मी सांगितले आहे की, ऑनलाईनच्या विक्रीला बंदी असताना यामध्ये कलम 80 सी नियम 65 अन्वये दंड आणि 2 वर्षांचा कारावास अशी शिक्षा आहे. पण त्याचा अपिलात जातात, आपण पुढे तर त्यांच्यापुढे कोर्टात केस टाकली. डॉक्टरांनी नेमके कोणते औषध द्यावे या संदर्भात आपला अनुभव काही फार चांगला नाही. कारण शेवटी डॉक्टर म्हणतात की, मी तज्ज्ञ आहे, मी तपासले आहे, मी त्याला हे औषध दिले आहे. बाकी त्याला घ्यायचे तर घ्यावे, डॉक्टर जबाबदारी टाळतात. ॲप्रुव्हड जेनरिक औषधांच्या संदर्भात नेमके कोणाचे स्पेसिफिकेशन घ्यायचे की ते हे देत आहेत, ती जबाबदारी अजून काही निश्चित होत नाही. कायद्यातील अनेक त्रुटी, पळवाटा आहेत. आपल्या खात्याचे अधिकारी सक्षम आहेत. भविष्य काळात त्यांना आपण कॉम्प्युटर देत आहोत. आता लॅब देखील बांधत आहोत. लॅब नागपूर व औरंगाबाद अशा 2 ठिकाणी बांधून तयार आहेत. त्यांच्या कामात सुविधा यावी म्हणून हे चालले आहे. आपले एक अधिकारी इंटरनॅशनल कोर्सला चालले आहेत. प्रशिक्षण कार्यक्रम आखलेला आहेत. काही ठिकाण्ी एक एक बॅच अधिकारी पाठविणे सुरूआहे. स्थानिक पातळीवर काम सुरू आहे. राज्यातील जनतेला जेनरिक औषधे जास्त मोठ्या प्रमाणात मिळावीत, कारण ती काही पटींत स्वस्त असतात. कायद्यात क्लॅरिटी नाही. कारण शेवटी प्रिस्किप्शन देणारे डॉक्टर आहेत. तुम्ही किंवा मी ते देऊ शकत नाही. डॉक्टर जबाबदारी घेण्यास तयार नाहीत. नेहमी लागणारी औषधे

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. गिरीश बापट ....

आहेत, ज्याला डॉक्टरांच्या प्रिस्क्रिप्शनची गरज नाही, म्हणजे ताप, खोकला, पोटदुखी आहे. सदर बाबतीत आणखी काही आणता येईल का, ज्याचा शरीराला काही अपाय होत नाही त्या संदर्भातील प्रिस्किप्शन, असा काही विचार खात्यामार्फत, कमिटीमार्फत केला जाईल. आपल्या काही सूचना असतील द्याव्यात, त्यांचाही जरूर विचार केला जाईल.

श्री. जगन्नाथ शिंदे : सभापती महोदय, फार्मा ईझीचा उल्लेख सन्माननीय सदस्य श्री. सजेज ऊर्फ बंटी डी. पाटील यांनी केला. अपर पोलीस महानिरीक्षकांचे पत्रक माझ्या हातात आहे, ते मी पटलावर ठेवतो. फार्मा ईझीने औषधे 25 टक्के, 40 टक्के आणि 60 टक्के पर्यंत कमी देण्याचे आश्वासन दिले आहे. आज हा केंद्रीय कायदा आहे. केंद्र सरकार औषधांच्या किंमती नियंत्रित करते. अन्न व ड्रग प्राईज कंट्रोल ऑर्डर आहे, ज्यामध्ये केंद्र सरकार रिटेलरला व होलसेलरला 16 आणि 8 टक्के मार्जीन देते, अशा वेळी 25 टक्के, 40 टक्के, 60 टक्के मार्जीन ही मंडळी कोठून देतात याची माहिती आपण पटलावर ठेवाल का ? बऱ्याच वेळा नकली, निकामी औषधे दिली जातात. माझी सरकारला विनंती आहे. हा एक डेलिकेटेड प्रश्न आहे. गर्भपाताची किंवा बाकी औषधे तरूण मुलांना सहजपणे डायरेक्टली मिळतात. राज्य शासन या संदर्भात गंभीर होऊन केंद्र सरकारकडून सक्त कारवाई करण्यासाठी काही कार्यवाही करेल का ?

श्री. गिरीश बापट : सभापती महोदय, मी मघाशी त्याचा उल्लेख केला. सन्माननीय सदस्यांनी या संदर्भात प्रश्न विचारला, त्याचे उत्तर मी मघाशी दिले. आता परत देतो. 25 टक्के कमिशन मिळते हे आपणही आता आपल्या भाषणात सांगितले आहे. पोलीस खात्याचे डीजी व या संदर्भातील विक्रते यांनी या संदर्भात नेमका काय पत्रव्यवहार केला आहे आणि तो पत्रव्यवहार केल्यानंतर पोलिसांकरिता सूट देण्याचे ज्या कंपनीने ठरविले आहे, ते नियमात आहे का या सर्वांची तपासणी करण्याबाबत मी मघाशी देखील सांगितले आहे. ते नियमबाह्य असेल तर ते सक्युर्लर रद्द करायला आणि 25 टक्क्यांनी स्वस्त देण्याचा जी काही त्यांचा चर्चा चालली असेल तर ती देखील

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

थांबवायला सांगू. राज्यात कोणालाही बेकायदेशीरपणे काम करू दिले जाणार नाही एवढे आश्वासन मी आपल्याला देतो. केंद्र सरकारचा कायदा होतना जर काही सूचना असेल तर त्यांचा समावेश

..4



श्री. गिरीश बापट ....

करू पण कायद्याचे उल्लंघन विशेषतः औषधांच्या बाबतीत करू दिले जाणार नाही. ऑनलाईनवर 100 प्रकारच्या वस्तू विकल्या जातात, त्याच्याशी फार आपले घेणेदेणे नाही. पण औषधे माणसांच्या जीवनावर परिणाम करणार आहेत. मृत्यूशी सामना करावा लागतो. त्यामुळे सरकार या संदर्भात सतर्क आहे. याचा अभ्यास केला जाईल. केद्र सरकारला कळविले जाईल. वेळोवेळी यामध्ये सुधारणा करायच्या असतील तर केल्या जातील. डीजींकडे 25 टक्क्यांच्या फॉर्म्युला एका कंपनीने आणला आहे, तो तपासू, तो अयोग्य असेल तर तो देखील रद्द करायला लावू.

श्री. शरद रणपिसे : सभापती महोदय, मला जी माहिती मिळाली होती ती मी माननीय मंत्र्यांना संगितली. सन्माननीय सदस्य श्री. वैजनाथ शिंदे यांनी आयुक्तांनी काढलेले पत्रकच माननीय सभापतींना दिले आहे.

....Q

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शरद रणपिसे.........

त्यामध्ये असे म्हटले आहे की, "50 ते 60 टक्के, 40 ते 60 टक्के सवलत देण्यात येईल. तरी बृहन्मुंबई, ठाणे शहर, नवी मुंबई, पुणे या शहरात कार्यरत असणाऱ्या, सेवानिवृत्त झालेल्या पोलीस दलातील सर्व कार्यालयातील सर्व कर्मचारी व पोलीस अधिकारी, पोलीस विभागात नियमित नियुक्त केलेले लिपीक व वर्गीय अधिकारी, कर्मचारी व गट-ड चे कर्मचारी आणि त्यांचे कुटुंबीय यांना या सेवेचा लाभ घेण्याबाबत मोठ्या प्रमाणावर अवाहन करण्यात येत आहे. सदर औषधे प्राप्त करुन घेण्याची कार्यपध्दती सोबत जोडलेल्या सहपत्राप्रमाणे आहे. सदर सेवेचा लाभ वरील शहरांमध्ये कार्यरत असलेल्या सर्व अधिकारी, कर्मचाऱ्यांना मोबाईल, ई-मेल तसेच ग्रुप एसएमएस व्दारेही कृपया कळविण्यात यावे. श्री.व्ही.व्ही.लक्ष्मीनारायण, अपर पोलीस महासंचालक (प्रशासन), महाराष्ट्र राज्य."

सभापती महोदय, या पध्दतीने सरळ सरळ कायदा धाब्यावर बसविला जात असताना मंत्री महोदय असे सांगत आहेत की, "आम्हाला माहीत नाही, पत्रक तपासून बघू." ही माहिती आपल्याला का मिळाली नाही ? सदरचे परिपत्रक दिनांक 29 फेब्रुवारी, 2016 चे आहे. तरी सुध्दा आपल्याला माहिती मिळाली नाही ? म्हणजे आपण त्यांना प्रोटेक्शन देत आहात का ?

सभापती महोदय, माझी अशी विनंती आहे की, ही माहिती येईपर्यंत ही लक्षवेधी सूचना राखून ठेवावी आणि माहिती प्राप्त झाल्यानंतर त्यावर चर्चा घ्यावी.

श्री.गिरीश बापट : सभापती महोदय, मुळात या लक्षवेधी सूचनेतील विषय ऑनलाईन औषधविक्रीसंदर्भातील आहे. पोलीस खात्याने या राज्यातील पोलीस कर्मचाऱ्यांना स्वस्त औषधे मिळण्यासंबंधी काही योजना तयार केली आहे व त्या कंपनीने ती पोलीस खात्याला ऑफर केली आहे. आता 10-12 दिवस झाले आहेत. परंतु अद्याप त्याबाबतचा व्यवहार झालेला नाही. हा सर्व पत्रव्यवहार मागवून नेमके काय झाले आहे, हे तपासणे आवश्यक आहे. पोलीस खात्यासह अन्य कोणत्याही ठिकाणी काही बेकायदेशीर घडत असेल तर त्यास परवानगी दिली जाणार नाही आणि तसे झाले असेल तर कारवाई होईल. पोलीस खात्यातील कर्मचाऱ्यांना स्वस्त औषधे देण्यासंबंधीच्या योजनेची तपासणी करु. यामध्ये कोठेही प्रिस्क्रिप्शन देणार नाही, ऑनलाईन खरेदी

...2....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.गिरीश बापट........

करु असे म्हटलेले नाही. (अडथळा.....) मी पत्र बघितलेले नाही. परंतु, मी आपल्याला माहिती देत आहे. पत्र बघितल्यानंतर मी वेगळे काय सांगितले आहे ? काही माहिती मागवून हा सर्व पत्रव्यवहार बघितला पाहिजे. हे सर्व तपासून घेतले पाहिजे. तसे न करता लगेच कोणाला शिक्षा ठोठवायची, हे बरोबर होणार नाही.

सभापती महोदय, बेकायदेशीर विक्री आणि मादक औषधांवर कंट्रोल आणणे आवश्यक आहे. पोलीस कर्मचाऱ्यांना स्वस्त औषधे मिळत असतील तर कायद्यात राहून ती कशी मिळतील, हे आपण बघितले पाहिजे. काय झाले आहे, हे तपासल्याशिवाय प्रश्न विचारल्यानंतर एका मिनिटात उत्तर देता येऊ शकत नाही. या बाबींची तपासणी करण्याची एक कार्यपध्दती आहे. ही सर्व माहिती पटलावर ठेवली जाईल. कुणाचीही गय करणार नाही, बेकायदेशीर कामांना प्रोत्साहन देणार नाही. या प्रकरणाची माहिती घेऊन निर्णय घेऊ. पोलिसांना फाशी देण्याची एवढी काय घाई आहे ? त्यामुळे या लक्षवेधी सूचनेवरील चर्चा राखून ठेवण्याची आवश्यकता नाही.

------------

...3....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.** : यवतमाळ जिल्ह्यात पसरलेले पाणी टंचाईचे भीषण सावट

**मु.शी.** : यवतमाळ जिल्ह्यात पसरलेले पाणी टंचाईचे भीषण सावट यासंबंधी सर्वश्री ख्वाजा बेग, हेमंत टकले, किरण पावसकर, नरेंद्र पाटील, आनंद ठाकूर, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री.हेमंत टकले (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय पाणी पुरवठा मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"**यवतमाळ** जिल्ह्यात यंदा पाणीटंचाईचे पसरलेले भीषण सावट, जिल्हा प्रशासनाने टंचाई निवारण्यास साडेबारा कोटीच्या टंचाई आराखडयाला नुकतीच दिलेली मंजूरी तर दुसरीकडे **"एमआयडीसी"** तील अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षित धोरणामुळे रोज लाखो लिटर पाणी वाया जात असणे, औद्योगिक वसाहतीला पाणीपुरवठा करण्यासाठी गोखी प्रकल्पावरुन ४०० एमएमची टाकण्यात आलेली जलवाहिनी, जलवाहिनीत जवळपास १० ते १५ लिकेज असणे, त्यामुळे या जलवाहिनीतून रोज लाखो लिटर पाण्याचा होत असलेला अपव्यय, पावसाळ्यात सरासरीच्या तुलनेत कमी पाऊस झाल्याने त्याचा फटका शेतकऱ्यांना बसलेला असणे, पावसाअभावी हिवाळ्यातच प्रकल्पांतील जलपातळीत मोठ्या प्रमाणात घट झालेली असणे, अनेक प्रकल्पांत मृतसाठा शिल्लक असणे, त्यामुळे उन्हाळ्यात तीव्र पाणीटंचाईचा सामना जिल्ह्यातील नागरिकांना करावा लागण्याची शक्यता, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची **प्रति क्रया.**"

श्री.बबनराव लोणीकर (पाणी पुरवठा मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

...4.....



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

--------

...5....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यात पाण्याची टंचाई आहे. पाण्याच्या टंचाईची परिस्थिती असल्यामुळे उद्योगांना केला जाणारा पाणी पुरवठा कमी करण्याचे धोरण आता राज्यात सर्व ठिकाणी अवलंबिले जात आहे. यवतमाळ येथील परिस्थिती अशी आहे की, पाण्याच्या पातळीमध्ये मोठ्या प्रमाणावर घट झालेली आहे. आज त्या ठिकाणी पाणीसाठा मृत झालेला आहे. येणाऱ्या उन्हाळ्यात तेथील परिस्थिती आणखी अवघड होणार आहे.

सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात असे म्हटले आहे की, त्या ठिकाणी सरासरी 6.34 घन मिटर पाणी वाया जात आहे व ते मानांकनानुसार 10 टक्क्यांच्या आत असल्यामुळे मान्य आहे. त्याचप्रमाणे पाणी गळतीबाबत दुरूस्ती करण्यात येत आहे, असेही म्हटले आहे.

सभापती महोदय, राज्यावर पाणी संकट आलेले असताना थेंबभर पाणी गळती सुध्दा आपण का मान्य करावी ? ती गळती थांबविणे तातडीची बाब नाही का ? त्याबाबत काही उपाययोजना करणे सरकारला आवश्यक वाटत नाही का ? पाण्याचा प्रत्येक थेंब वाचवावयाचा असेल तर दुरूस्तीच्या आणि पाणी पुरवठ्याचा आढावा घेऊन, यवतमाळ जिल्ह्याची स्वतः मंत्री महोदयांनी पहाणी करून तेथील नागरिकांना पाणी टंचाईचा सामना करण्यासाठी काही तरी पाठबळ मिळेल, अशी उपाययोजना शासन करणार आहे का ?

श्री.बबनराव लोणीकर : सभापती महोदय, त्या ठिकाणी सरासरी 6 टक्के पाणी लिकेज आहे. वॉल लिकेज असल्यामुळे 6 टक्के पाणी गळती आहे. मानांकनाप्रमाणे साधारणपणे 10 टक्के गळती मान्य केली जाते. तथापि, ही गळती थांबविण्याच्या संदर्भात संबंधित अधिकाऱ्यांची बैठक घेऊन त्यांना तशा प्रकारच्या सूचना देण्यात येतील.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी दिलेले उत्तर योग्य असले तरी यवतमाळ औद्योगिक क्षेत्राला गोकी प्रकल्पातून पाणी पुरवठा केला जातो. त्यासाठी 27 कि.मि.ची जलवाहिनी टाकण्यात आली आहे. त्यामुळे एअर वॉल आणि जोडणीतून गळती होणे अपरिहार्य आहे, असे आपण म्हणत आहात. यामधून 8892 घ.मी.पाणी वाया जात आहे. उत्तरामध्ये असे

...6....

प्रा.जोगेंद्र कवाडे........

म्हटले आहे की, 6.34 टक्के एवढी पाण्याची गळती होत आहे व 10 टक्के एवढी गळती मान्य आहे. 8892 घ.मी.पाणी वाया जात असेल तर ते थांबविण्यासाठी युध्द पातळीवर काही प्रयत्न केले जाणार आहेत का ?

श्री.बबनराव लोणीकर : सभापती महोदय, मी यापूर्वीच सांगितल्याप्रमाणे त्या ठिकाणी 6 टक्के पाणी गळती असून मानांकनाप्रमाणे तेवढी गळती अपेक्षित आहे. तरी सुध्दा विभागाच्या अधिकाऱ्यांना बोलावून ही गळती थांबविण्यासंबंधी तातडीने सूचना देण्यात येतील.

ॲड.राहुल नार्वेकर : सभापती महोदय, संपूर्ण राज्यात पाणी टंचाई आहे, याबद्दल दुमत असण्याचे काही कारण नाही. सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी सांगितल्याप्रमाणे पिण्यासाठी आणि शेतीसाठी पाणी उपलब्ध नसताना आपण औद्योगिक क्षेत्राला पाणी देत आहोत. त्यांनाही पाणी देणे आवश्यक आहे. परंतु, पाणी पुरवठा करीत असताना पाणी कमीतकमी कसे वाया जाईल, हे शासनाने पाहिले पाहिजे. पाण्याची गळती किमान पातळीवर आणण्यासाठी कोणते पिनल मेजर्स आपण नव्याने इंट्रॉड्युस करणार आहात किंवा करणार आहोत का ? जेणेकरुन एक डिटरंट बनेल. तसेच, वॉटर वेस्टेज डिटरंटबाबत शासनाची भूमिका काय आहे ? इलेक्ट्रिसिटीच्या बाबतीत मंजूर लोडपेक्षा जास्त युज झाल्यास आपण पिनल चार्जेस लावतो. ज्या औद्योगिक क्षेत्रांमध्ये मंजूर वॉटर सप्लायपेक्षा जास्त कन्झम्शन होत आहे, त्यांना आपण कोणत्या प्रकारे पिनल चार्जेस लावणार आहात ?

श्री.बबनराव लोणीकर : सभापती महोदय, ही पाणीपुरवठा योजना आमच्या विभागामार्फत झाली असली तरी एमआयडीसीच्या माध्यमातून ती राबविली जात आहे. पाणी गळतीतून पाणी वाया जाऊ नये, या संदर्भात अधिकाऱ्यांना बोलावून योग्य त्या सूचना देण्यात येतील.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेसंबंधी माझे 3 प्रश्न आहेत. गोकी प्रकल्पामधून एमआयडीसीसाठी पाणी पुरवठ्याची योजना केलेली आहे. या प्रकल्पातील किती पाणी एमआयडीसीसाठी राखीव ठेवले आहे ? या प्रकल्पातील पाणीसाठा मृत पातळीवर आला आहे. एकीकडे पाणी टंचाईमुळे लोकांचे मृत्यू होत आहेत. यवतमाळ येथे पाण्याची स्थिती

...7....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे........

चांगली आहे, असे नाही. त्या ठिकाणी असलेल्या प्रकल्पासाठी पाणीसाठा मृत पातळीवर गेला असेल तर एमआयडीसीला पाणी देणे योग्य आहे का आणि ज्या अधिकाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे पाणी वाया जात आहे त्यांच्याविरुध्द शासन कोणती कारवाई करणार आहे ?

यानंतर श्री.बोरले.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.बबनराव लोणीकर : सभापती महोदय, या धरणात साधारणत: 11 टक्के जीवंत पाणी साठा आहे. पाण्याचे लिकेजेस का होतात याबाबत मी अगोदरच माहिती दिलेली आहे. लिकेजेसचे प्रमाण कमी असले तरी लिकेजेस थांबविण्याच्या संदर्भात कार्यवाही करण्याच्या सूचना संबंधित एमआयडीसी आणि विभागाला देण्यात येतील.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, ज्या अधिकाऱ्यांच्या चुकीमुळे पाण्याचे लिकेजेस होते त्या अधिकाऱ्यांवर आपण कोणती कारवाई करणार आहात ? कारण, इतके दिवस पाणी लिकेज झालेले आहे. पाण्याच्या लिकेजेस बाबत एमआयडीसीच्या अधिकायांकडून चूक झाली असेल तर आपण त्यांच्यावर कोणती कारवाई करणार आहात ? आपण पाणी पुरवठा मंत्री असल्यामुळे आपल्याला त्यांच्यावर कारवाई करता येत नाही काय ? उद्योग विभागाने या संदर्भात उत्तर द्यावयास पाहिजे होते काय, हे स्पष्ट झाले पाहिजे.

श्री.बबनराव लोणीकर : मुळात या धरणात 11 टक्के जीवंत पाणी साठा आहे. ही योजना पूर्णपणे एमआयडीसी चालविते आणि 6 टक्के पाणी गळती अपेक्षित आहे. तरी पण हे सर्व तपासून संबंधितांना तशा प्रकारच्या कडक सूचना देण्यात येतील.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, मंत्री महोदय वारंवार सांगतात की, या धरणात 11 टक्के पाणी साठा आहे. मग पाणी साठा आहे म्हणून ते पाणी वाया घालवायचे काय ? एकीकडे आपल्या विभागामार्फत लाखो रुपये खर्च करुन दूरचित्रवाहिन्यांवर पाणी वाचवा, छोट्या ग्लासात पाणी प्यावे, अशी जाहिरात दिली जाते. आम्ही दूरचित्रवाहिन्यांवर ती जाहिरात रोज बघतो. ती जाहिरात बघून आम्ही घरी छोटे ग्लास आणलेले आहत. मंत्री महोदय सांगतात की, ही योजना एमआयडीसी चालविते आणि हे पाणी पुरवठा विभागाचे मंत्री आहेत. मग या लक्षवेधी सुचनेला नेमके कोणत्या विभागाने उत्तर द्यावयास पाहिजे होते आणि ही आपल्या विभागाची जबाबदारी नसेल तर आपण तसे सांगावे. कदाचित, माननीय सभापती ही लक्षवेधी सूचना राखून ठेवतील आणि संबंधित विभगाचे मंत्री या लक्षवेधी सुचनेला उत्तर देतील. माझा प्रश्न असा आहे की, आता पर्यंत जे पाणी वाया गेले त्यासाठी कोण जबाबदार आहे आणि आपण त्यांच्यावर कोणती कारवाई करणार आहात ?

..2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.बबनराव लोणीकर : सभापती महोदय, केंद्रीय सार्वजनिक आरोग्य व पर्यावरण अभियांत्रिकी संघटना यांच्या नियमाप्रमाणे 10 ते 15 टक्के पाणी गळती अनिवार्य आहे. असे असले तरी पाणी वाया जावू नये अशा प्रकारच्या सूचना बैठक घेऊन संबंधित विभागाला देण्यात येतील, असे मी अगोदरच सांगितले आहे.

------

..3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.** : राज्यातील 50 दुग्धशाळा बंद करुन दुग्धशाळांची अंदाजे 18 हजार एकर जमीन मेक इन इंडियाच्या नावाखाली विकण्याचा डाव असणे

**मु.शी.** : राज्यातील 50 दुग्धशाळा बंद करुन दुग्धशाळांची अंदाजे 18 हजार एकर जमीन मेक इन इंडियाच्या नावाखाली विकण्याचा डाव असणे यासंबंधी सर्वश्री संजय दत्त, अशोक उर्फ भाई जगताप, आनंदराव पाटील, प्रा.जोगेंद्र कवाडे, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.संजय दत्त (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय दुग्धविकास मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यातील ५० सरकारी दुग्धशाळा बंद करुन राज्यातील दुग्धशाळांच्या अंदाजे १८ हजार एकर जमीन मेक इन इंडियाच्या नावाखाली -विकण्याचा डाव असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१६ च्यासुमारास उजेडात येणे, सरकारच्या अनास्थेमुळेच राज्यातील दुग्धशाळा मरणासन्न अवस्थेत पोहोचल्या असणे, या दुग्धशाळांवर अवलंबून असलेले ७ हजार कर्मचारी, हजारो वितरक, वाहतूकदार व दूध उत्पादन करणारे शेतकरी उद्ध्वस्त होण्याचा मार्गावर असणे, सरकारचा दुग्धशाळा बंद करुन त्यांच्या अत्यंत मोक्याच्या जमिनी बळकावण्याचा डाव असणे, कुर्ला, वरळी येथील प्रकल्प बंद करुन त्या ठिकाणची सर्व यंत्रणा भंगारात काढली जाणे, आरे दुग्धशाळा बंद करण्यासाठी नेमलेल्या अधिका-यांकडून ४०० दूध वितरण करणारी वाहने भंगारात काढण्यात येणे, सरकारी दुग्धशाळा सुरळीत चालत असताना त्या बंद करुन खासगी दुग्धशाळांना वाव देण्यात येणे, राज्यातील दुग्धशाळांच्या अंदाजे आरे दुग्धशाळा-३४०० एकर, कुर्ला-२५ एकर, वरळी-२४ एकर, दापचरी (रायगड)-८५०० एकर, पालघर-५००० एकर, सोलापूर-७०८ एकर, पुणे-२९ एकर, बीड-१७ एकर, अहमदनगर-१८ एकर, नागपूर-२७ एकर अशी एकुण १८ हजार एकर जमीन विकण्यास काढणे, राज्यातील ५० दुग्धशाळांच्या जमीन विकण्यामागे राज्यशासनाने आपली भुमिका स्पष्ट करुन करावयाची कार्यवाही व याबाबत राज्यशासनाची प्रतिक्रिया."

..4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विजय देशमुख (दुग्धव्यवसाय विकास आणि मत्स्यव्यवसाय राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

----------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, हा अत्यंत महत्वाचा प्रश्न आहे. राज्यातील जवळपास 50 शासकीय दुग्धशाळा बंद करुन दुग्धशाळांची अतिरिक्त असलेली हजारो एकर जमीन बिल्डरांच्या घशात घालण्याचा शासनाचा डाव आहे. एकीकडे मेक इन इंडिया आणि मेक इन महाराष्ट्राचा नारा द्यावयाचा आणि दुसरीकडे अत्यंत अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्याऐवजी त्यांच्याकडे पाठ फिरवायची, असे शासनाचे धोरण दिसत आहे. या दुग्धालयांमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा देखील प्रश्न आहे. त्यांना संरक्षण देण्याची गरज आहे. लक्षवेधी सुचनेच्या निवेदनात नमूद केलेले आहे की, या योजनांचे सहकारी संस्थांकडे हस्तांतरण करण्याचे ठरविले आहे. का ठरविले आहे ? पुढे असे नमूद केलेले आहे की, सदर निर्णयामुळे भांडवली गुंतवणूक करण्याचे शासनाने थांबविले आहे. मग आपण यंत्रसामुग्री दुरुस्त का करीत नाही, कालबाह्य झालेली यंत्रसामुग्री नवीन का घेत नाही, हा पहिला प्रश्न शासनाच्या हेतुबद्दल शंका निर्माण करणारा आहे. लक्षवेधी सुचनेच्या निवेदनात नमूद केलेले आहे की, "त्या बंद करुन विकण्याचा डाव असणे ही बाब वस्तुस्थितीजन्य नाही. मुख्यमंत्री महोदयांनी परवा पत्रकारपरिषदेत केलेल्या वक्तव्याची प्रत माझ्याकडे आहे. मी आपल्या परवानगीने ती वाचून दाखवितो. त्यामध्ये असे नमूद केलेले आहे की, "The State Government will monetize prime plots to fund its development Projects. If we look at the development process in countries like China, all Citizen Projects were funded from land monetization. The State has no resources except land." एकीकडे सरकार असा प्रस्ताव नसल्याचे उत्तर देते आणि दुसरीकडे मुख्यमंत्री महोदय पत्रकार परिषदेमध्ये वेगळी माहिती देतात. त्यामुळे आमची आणि जनतेची जी शंका आहे ती पक्की झालेली आहे. शासनाने अशा प्रकारे गोल गोल खुलासा करुन चालणार नाही. शासन दुग्धशाळांची एकही इंच जमीन विकणार नाही, अशी स्पष्ट हमी शासनाच्या वतीने देण्यात येईल काय आणि त्यांच्या रिस्ट्रक्चरिंगसाठी शासनाकडे कोणती योजना आहे ?

श्री.विजय देशमुख : सभापती महोदय, दुग्धव्यवसाय विकास विभागाच्या अधिपत्याखाली एकूण 38 दुग्धशाळा व 81 शितकरण केंद्र आहेत. त्यापैकी शासनाच्या दिनांक 11.11.2002 रोजीच्या शासन निर्णयानुसार 6 दुग्धशाळा व 8 शितकरण केंद्र सहकारी संस्थांना हस्तांतरित

..6...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विजय देशमुख......

करण्यात आलेली आहेत. बाकीच्या 32 दुग्धशाळा व 73 शितकेंद्रे दुग्ध विकास महामंडळाकडेच आहेत. ते कोणत्याही संस्थेला देण्याचे किंवा त्यांची विक्री करण्याचा शासनाचा निर्णय नाही. सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाबाबत मी सांगू इच्छितो की, मेक इन इंडियाच्या नावाखाली दुग्धशाळा बंद करुन त्या विकण्याबाबतचा कोणताही प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन नसल्याने त्या बंद करुन विकण्याचा डाव असणे ही बाब वस्तुस्थितीजन्य नाही.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, ज्या संस्था बंद पडलेल्या आहेत त्या पुन्हा सुरु करण्यासाठी प्रयत्न केला किंवा नवीन सहकारी संस्था बंद पडलेल्या दुग्धशाळा घेण्यास तयार असतील तर त्याला राज्य शासन अग्रहक्क देईल काय ?

श्री.विजय देशमुख : सभापती महोदय, सध्या ज्या संस्था बंद पडलेल्या आहेत त्या तोट्यात असल्यामुळे बंद पडलेल्या आहेत. त्यातील सर्व मशिनरी जुनी, कालबाह्य ठरलेली आहे. त्यामुळे त्या सध्या बंद केलेल्या आहेत. ज्या संस्था चांगल्या प्रकारे सुरु आहेत त्या 14 प्रमुख सहकारी दूध संस्था (...अडथळा...) सभापती महोदय, ज्या संस्था चांगल्या प्रकारे सुरु आहेत त्या सुरु ठेवलेल्या आहेत. ज्या कालबाह्य ठरलेल्या आहेत किंवा मशिनरी जुनी झालेली आहे त्या बंद केलेल्या आहेत.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, माझ्या प्रश्नाचे उत्तर आलेले नाही. ज्या संस्था बंद पडलेल्या आहेत त्यांचे पुनरुज्जीवन आपण कायद्यानुसार 10 वर्षात करु शकतो. त्या संस्था पुरुज्जीवित केल्या, नवीन सभासद आले तर त्यांना तुम्ही त्या संस्था देणार काय आणि ज्या ठिकाणी शहरीकरण वाढत आहे त्या ठिकाणी बेळगांव, कोल्हापूर, सोलापूर येथून दूध येते त्या दुधाचे वितरण सहकारी संस्था करु शकतील किंवा नवीन संस्था उभ्या केल्या जातील. म्हणून त्या संस्थांना अग्रहक्क दिला जाईल काय ?

श्री.विजय देशमुख : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील साहेबांनी जो प्रश्न उपस्थित केलेला आहे त्याचा आपण सकारात्मक विचार करु.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, हा अत्यंत महत्वाचा विषय आहे. गुजरात राज्यात अमूल डेअरी प्रसिद्ध आहे. मला आठवते की, आम्ही सन 1974 मध्ये मुंबईमध्ये आलो त्यावेळी मुंबईमध्ये फक्त आरे डेअरीचेच दूध मिळत होते, दुसरे कोणते दूध मिळत नव्हते आणि त्याचे कार्ड

..7...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती विद्या चव्हाण........

बनविण्यासाठी देखील नंबर लावावा लागत होता. दूध केंद्रावर लोक सकाळी 5.30 ते 6.00 वाजेपासून रांगा लावत होते. शासकीय दुग्धशाळेतून चांगले दूध मिळत असताना आज त्या दुग्धशाळा बंद करण्यात आलेल्या आहेत. आज तेथील 7-8 हजार कर्मचारी वर्ग बेकार झालेला आहे. मग तेथील गाड्या चालविणारे ड्रायव्हर असतील किंवा इतर कर्मचारी असतील. म्हणजे एवढ्या चांगल्या प्रकारे दूध मिळत असताना ती डेअरी बंद करण्याचा घाट घातला गेला आणि आता त्या जमिनी, मग आरे कॉलनीतील जमीन असेल, वरळी सी-फेस येथील जमीन असेल. दुग्धशाळा बंद करुन या जमिनीची विक्री करण्याचा घाट घातलेला आहे. आज मुंबई शहरात दुधाची गरज वाढलेली आहे.

..S-1/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती विद्या चव्हाण...

आज खाजगी कंपन्या येथे येऊन दूध विकत आहेत. त्यामुळे शासनाने या ठिकाणी दूध विक्री केंद्र सुरु केली पाहिजेत. त्याचप्रमाणे आरे दूध डेअरीची जागा फिल्म इंडस्ट्री व सिने तारकांच्या घशात उघडपणे घातली जात आहे, तेथील स्थानिक आमदार व खासदार या जमिनी बळकावत आहेत, हे आम्ही रोज बघतो, अशा प्रकारे या जमिनी विकल्या जाणार नाहीत, याबाबत मंत्री महोदय खात्री देणार आहेत काय ?

श्री.विजय देशमुख : सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाबाबत मी पुन्हा सांगू इच्छितो की, आरे दूध डेअरी किंवा कोणत्याही डेअरीची जमीन विकण्याचा प्रस्ताव शासनाकडे नाही. आरे दूध डेअरी आता देखील चालू आहे, त्या ठिकाणी 50 टक्के कामगार अतिरिक्त झाले आहेत त्यांना इतरत्र सामावून घेण्यात आलेले आहे.

श्री.गोपीकिसन बाजोरिया : सभापती महोदय, राज्यातील अनेक दूध डेअऱ्या बंद पडल्या आहेत, मंत्री महोदयांनी असे उत्तर दिले आहे की, ज्या मशीनरी खराब झालेल्या आहेत त्यांना दुरूस्त करण्यात येतील. या सभागृहात तीन वेळा या प्रश्नांवर चर्चा झालेली आहे. त्यावेळी देखील उत्तर देण्यात आलेले आहे. अकोला येथील दूध डेअरीतील सर्व मशीनरी चालू असताना ती डेअरी बंद पडलेली आहे. मागील 25 वर्षापासून सर्व सोईनुसार ही दूध डेअरी सज्ज होती व ती चालू होती परंतु ती आता बंद आहे. अकोला, बुलडाणा, वाशिम व यवतमाळ येथील शेतकरी मोठ्या प्रमाणात आत्महत्या करीत आहेत, अशा परिस्थिती शेतकऱ्यांना जोड धंदा मिळावा म्हणून मंत्री महोदय अकोला येथील दूध डेअरी बीओटी तत्वावर कार्यान्वित करतील काय ?

श्री.विजय देशमुख : सभापती महोदय, याबाबत सकारात्मक विचार करण्यात येईल.

**तालिका सभापती** : आता लक्षवेधी सूचना क्रमांक 6 चर्चेला घेऊ या. त्या अगोदर श्री.संजय दत्त यांनी एक शेवटचा प्रश्न विचारावा.

श्री.गोपीकिसन बाजोरिया : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ ऑर्डर असा आहे की, सन्माननीय उप सभापती श्री.डावखरे यांनी सांगितल्याप्रमाणे सभागृह हायजेक झाले आहे काय ? त्या अगोदर श्री.रामराव वडकुते साहेबांनी प्रश्न विचारला व मध्येच श्री.प्रकाश गजबिये साहेब उभे राहिले तेव्हा त्यांना सांगण्यात आले की, मी अगोदर सन्माननीय सदस्य श्री.वडकुते यांचे नाव

...2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.गोपीकिसन बाजोरिया...

पुकारले आहे. त्यानंतर सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांना सांगितले की, आपण बोला. त्यानंतर दुसऱ्या सन्माननीय सदस्यांना बोलण्यास दिले. या अगोदर असे सांगितले की, शेवटचा प्रश्न घेण्यात येईल. त्यानंतर क्रमांक 4 ची लक्षवेधी सूचना पुकारण्यात आली. सभागृहाचे कामकाज सुरु झाले. आता आपण लक्षवेधी क्रमांक 6 पुकारली तरी देखील आपण आता मागे येत आहोत, कामकाज पुकारल्यावर मागे जाण्याची प्रथा व परंपरा नाही. मी सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांचे अभिनंदन करतो. त्यांच्या बाबतीत माझा आक्षेप नाही. एकदा पुढची लक्षवेधी सूचना पुकारल्यावर मागे येत नाही असे मला माहिती आहे.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, माझ्या मूळ प्रश्नांना मंत्री महोदयांनी उत्तर न देता बगल दिली आहे. माझा प्रश्न असा होता की, यामध्ये खाजगी दूध कंपन्या यशस्वी होत आहेत. सरकारच्या दूध डेअऱ्या 50 टक्के बंद पडत आहेत, हे मंत्री महोदयांनी मान्य केले आहे. त्यामुळे या दूध डेअऱ्यांच्या रिस्ट्रक्चरचा प्लॅन सरकार तयार करीत नाही तोपर्यंत त्या सुस्थितीत येणार नाहीत. एका बाजूला मेक इन इंडिया व मेक इन महाराष्ट्रात विदेशी गुंतवणूक आणण्यासाठी सरकार प्रयत्न करीत आहे. ज्या दूध डेअऱ्या चालू आहेत, त्या काही कारणाने बंद पडत आहेत, त्यांना पुन्हा उभे करण्यासाठी प्रयत्न केले जात नाहीत. हा पहिला प्रश्न विचारला होता. दुसरा प्रश्न विचारण्यात आला होता त्याचे उत्तर देखील देण्यात आलेले नाही. मी माननीय मुख्यमंत्री महोदयांनी केलेल्या वक्त्यव्यांचा उल्लेख करुन लॅन्ड मॉनीटायजेशन करण्याचे त्यांचे वक्तव्य सांगितले आहे. मंत्री महोदयांनी सांगितले की, मेन इन इंडिया अंतर्गत ही जमीन विकण्याचा डाव नाही. दुसऱ्या कोणत्या निमित्ताने या जमिनी विकण्याचा डाव आहे काय ? याबाबत खुलासा करण्याची गरज आहे.

श्री.विजय देशमुख : सभापती महोदय, राज्यातील सर्व दूध शाळा व शितकेंद्रे मिळून 11112.85 एकर जमीन आहे. यापैकी शासनाने कोणतीही जमीन विकलेली नाही. त्यामुळे राज्यातील 50 दूध शाळांची जमीन विकणे किंवा विकण्याचा डाव असणे ही बाब वस्तुस्थितीस धरून नाही असे मी स्पष्टपणे सांगितलेले आहे.

....3....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

श्री.रामराव वडकुते : सभापती महोदय, मराठवाड्यात हिंगोली, परभणी, नांदेड व वसमत या चार जिल्ह्यात दुष्काळ असताना त्यांचे 90 टक्के दूध वितरण मार्ग बंद करण्यात आले आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना बेभावाने दूध बाहेर विकावे लागत आहेत. त्या जिल्ह्यातील दूध वितरण मार्ग सुरु करण्यात येणार आहेत काय ? सरकारने दूध वितरण मार्ग सुरु केले तर त्याचा फायदा शेतकऱ्यांना होईल.

श्री.विजय देशमुख : सभापती महोदय, याबाबत योग्य ती माहिती घेऊन उपाययोजना करण्यात येतील.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ प्रोसिजर आहे, सभागृह सुरु झाल्यापासून उच्च व तंत्र शिक्षण खात्याचे मंत्री प्रथा, परंपरा व नियम याचा सतत पोटतिडकीने उल्लेख करीत असतात. लक्षवेधी सूचना क्रमांक 5 चे निवेदन वितरित झालेले आहे. ही लक्षवेधी सूचना म्हणजे सभागृहाची प्रॉपर्टी आहे, ही लक्षवेधी सूचना आता मागे घेता येणार नाही. त्या लक्षवेधी सूचनेवर चर्चा झाली पाहिजे. असा माझा या ठिकाणी आग्रह आहे.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.सतिश चव्हाण यांनी स्वतः उभे राहून सांगितले की, ही लक्षवेधी सूचना मागे घेण्यात यावी.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, आता सन्माननीय सदस्य लक्षवेधी सूचना चर्चेला घेण्यास तयार आहेत.

**उप सभापती** : त्यांनी आता हो सांगायचे व अगोदर दुसरे सांगायचे हे बरोबर नाही.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, लक्षवेधी सूचना क्रमांक 5 चे निवेदन सभागृहात वितरीत झालेले आहे. त्यामुळे ती लक्षवेधी सूचना सभागृहाची प्रॉपर्टी आहे. त्यामुळे त्यांना एकट्यांना ती लक्षवेधी सूचना मागे घेण्याचा अधिकार संपलेला आहे. लक्षवेधी सूचनेचे निवेदन वितरित होण्याच्या अगोदर त्यांनी मागे घेतली असती तर ते ठीक झाले असते.

**उप सभापती** : ही बाब मला देखील मान्य आहे. आता लक्षवेधी सूचना क्रमांक 5 चर्चेला घेण्यात यावी.

--------

....4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ. शी.** : मराठवाड्यातील दुष्काळी परिस्थितीमुळे मराठवाड्यातील सर्व प्रकारचे शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना सर्व फी माफ करणे

**मु. शी. :** मराठवाड्यातील दुष्काळी परिस्थितीमुळे मराठवाड्यातील सर्व प्रकारचे शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना सर्व फी माफ करणे या संबंधी सर्वश्री सतीश चव्हाण, धनंजय मुंडे, विक्रम काळे, अमरसिंह पंडित, अब्दुला खान दुर्राणी,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.धनंजय मुंडे (विरोधी पक्ष नेता ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"मराठवाडा विभागात मागील चार वर्षांपासून दुष्काळी परिस्थती असणे, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आर्थिक परिस्थितीमुळे शिक्षण घेणे अवघड झालेले असणे, शासनाने दुष्काळी परिस्थितीमुळे विद्यार्थ्यांची फी माफीची घोषणा केलेली असणे, परिक्षा फी व परिक्षा अर्ज भरण्याची शेवटची तारीख १६ जानेवारी असल्याने विद्यार्थ्यांनी कर्जाऊ पैसे घेऊन परिक्षा फी भरलेली असणे, आणि परिक्षा अर्ज व फी भरण्याची मुदत संपल्यानंतर विद्यापीठ प्रशासनाने फी माफीचे निर्देश दिलेले असणे, शासनाने १९९३ च्या अध्यादेशाचा आधार घेत शुल्क माफीची घोषणा केलेली असणे व या शुल्क माफीचा फायदा फक्त व्यावसायीक अभ्यासक्रम व अनुदानित महाविद्यालयातील ई.बी.सी. प्रवर्गातील विद्यार्थ्यांनाच होणार असणे, अव्यावसायिक अभ्यासक्रमाचे शिक्षण व विनाअनुदानित महाविद्यालयात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांवर अन्याय झालेला असणे, मराठवाडयातील दुष्काळी परिस्थितीमुळे मराठवाडयातील सर्व प्रकारचे शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना सर्व प्रकारच्या ा फी माफी करणे व ज्या विद्यार्थ्यांनी फी भरली त्यांना फी परत करणे गरजेचे असणे, यावर शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

श्री.विनोद तावडे ( उच्च व तंत्र शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

....5....



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, डॉ.बाबासाहेब आंबेडकर व स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाअंतर्गत 8 लाख विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. त्यांच्या दृष्टीने ही अत्यंत महत्वाची लक्षवेधी सूचना आहे. मराठवाड्यात मागील पाच वर्षापासून दुष्काळ असल्यामुळे मराठवाड्यातील ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आर्थिक अडचणीमुळे शिक्षण घेणे अवघड आहे. दुष्काळी परिस्थितीमुळे शासनाने फक्त परीक्षा फी माफ केली आहे. 50 टक्के पेक्षा कमी आणेवारी असलेल्या गावांतील विद्यार्थ्यांसाठीच फी माफीचा निर्णय झालेला आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी कर्जाऊ व उसनवारी करुन फी भरलेली आहे. एकीकडे फी माफिची घोषणा केली जाते, परंतु सरकारची फी माफची घोषणा फसवी आहे. फी माफीचा शासन निर्णय काढण्यात आलेला आहे, त्यामध्ये सन 1993 चा संदर्भ देण्यात आलेला आहे. 1993 च्या संदर्भानुसार जे ईबीसी विद्यार्थी आहेत ज्यांना ईबीसी सवलत लागू आहे. अशा विद्यार्थ्यांना दुष्काळी परिस्थितीत परीक्षा शुल्क माफीची मदत होत आहे. दुष्काळी भागातील विद्यार्थ्यांवर हा अन्याय आहे. फी माफीची घोषणा करुन सरकार पाठ थोपटून घेत आहे. दुसरीकडे 1993 चा संदर्भ देऊन फक्त ईबीसी विद्यार्थ्यांच्या फी माफिचा निर्णय करण्यात आलेला आहे. ईबीसी विद्यार्थ्यांना अगोदरपासून ही सवलत लागू आहे. अशी सवलत असताना दुष्काळी भागातील विद्यार्थ्यांना फी माफीची सवलत द्यावयास पाहिजे होती. त्यामुळे मंत्री महोदय, दुष्काळी भागातील सर्व विद्यार्थ्यांसाठी सरसकट फी माफीचा निर्णय जाहीर करतील काय ? त्याचप्रमाणे दुष्काळी भागात विना अनुदानित अभ्यास क्रमाचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना फी माफीचा फायदा होणार आहे काय ?

या नंतर श्री.सांगळे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे....

दिनांक 16/01/2016 रोजी परीक्षा अर्ज व परीक्षा फी भरण्याची शेवटची मुदत होती व विद्यापीठाने दिनांक 25 फेब्रुवारी रोजी परीक्षा शुल्क माफीचे परीपत्रक काढले. यामुळे विद्यार्थ्यांनी भरलेली परीक्षा फी शासन त्यांना परत करणार आहे का ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, विद्यार्थ्यांनी भरलेली फी 93 च्या नियमाने त्यांना परत दिली जाणार आहे. माननीय विरोधी पक्षनेते विद्यापीठासंबंधी सांगत आहेत. परंतु इयत्ता दहावी आणि बारावीकरिता विद्यार्थ्यांकडून फी घेतली जात होती व ती नंतर त्यांना परत केली जात होती. परंतु ती विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचत नव्हती. यामुळे शासनाने प्रथमच फी घेऊ नका अशा पध्दतीचा अतिशय चांगला निर्णय घेतला. याचे कारण असे की, विद्यार्थ्यांना फी परत देण्याचा मुद्दा निर्माण होत नाही. सदर निर्णयाचा लाभ थेट विद्यार्थ्यांना परीक्षा फी न भरण्यात झाला. ज्या विद्यार्थ्यांना ई.बी.सी. सवलत असते, त्यांना परीक्षा शुल्क भरावे लागते. परंतु त्यांना शैक्षणिक शुल्काची सवलत असते. ई.बी.सी. विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क भरावे लागू नये याकरिता शासनाने विद्यापीठांना 93 च्या नियमानुसार सूचना दिलेल्या आहेत. सन्माननीय सदस्य श्री.सतीश चव्हाण यांनी या लक्षवेधी सूचनेत एक मुद्दा उपस्थित केला होता. त्या अनुषंगने माननीय विरोधी पक्षनेते यांनी विना अनुदानितच्या संदर्भात दुष्काळग्रस्त व टंचाईग्रस्त भागातील विद्यार्थ्यांना सरसकट शुल्क माफी देता येईल का ? असा प्रश्न विचारला होता. लातूरच्या बैठकीनंतर या विषयाची सर्व आकडेवारी गोळा करुन, या विद्यापीठांमध्ये प्रत्यक्ष किती परीक्षा शुल्क जमा होते, त्यापैकी प्रत्यक्षात टंचाईग्रस्त भागातील किती आहे आणि ते पूर्ण देता येईल का, याबाबतीत सरकार अतिशय सकारात्मक आहे. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सांगितलेली परिस्थिती अतिशय वास्तव आहे. पैशाअभावी परीक्षेला बसावे की बसू नये, अशी विद्यार्थ्यांची स्थिती झाली आहे. यामुळे शासनाने विद्यार्थ्यांच्या हिताच्या दृष्टीने अतिशय सकारात्मक विचार केला आहे. शैक्षणिक शुल्क माफ करायचे असल्यास ते 1300 कोटी रुपये होते का, 1800 कोटी रुपये होते का ? याबाबत शासनाला विचारपूर्वक निर्णय घ्यावा लागेल. दुष्काळाकरिता शासन इतर मदत करीत आहे, ती करीत असताना अशा पध्दतीने मदत करणे भावनात्मक दृष्टीने पटत असले तरी ते व्यवहारीक दृष्ट्या प्रत्यक्ष पटते का ? येत्या काळात या विषयाबाबतचा निर्णय घेण्याचा शासन विचार करीत आहे. परंतु सरसकट शैक्षणिक शुल्क माफ करण्याच्या बाबतीत आम्ही अतिशय सकारात्मक आहोत.

...2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सतीश चव्हाण : मंत्री महोदयांनी शैक्षणिक शुल्क माफ करण्याकरिता 1300 कोटी रुपये लागणार असल्याचे सांगितले.

श्री.विनोद तावडे : ही अंदाजित रक्कम आहे.

श्री.सतीश चव्हाण : 1400 कोटी लागू द्या. शासनाने एलबीटीकरिता 700 कोटी रुपये माफ केले. टोलकरिता किती रक्कम माफ केली, हे आम्हाला माहीत नाही. अशा परिस्थितीत मराठवाड्यातील दुष्काळग्रस्त भागातील जनतेच्या विद्यार्थ्यांची 1300 कोटी रुपयांची फी माफ केल्यास काय बिघडले ? त्यांच्या संपूर्ण भविष्याचा प्रश्न आहे. परीक्षा शुल्क माफीसंबंधी शासन जो निर्णय घेणार आहे, तो सकारात्मक असेल अशी मी अपेक्षा व्यक्त करतो. नॉन ई.बी.सी. विद्यार्थ्यांना परीक्षा फी माफ करणार. परंतु त्यांच्या शैक्षणिक शुल्क माफ करण्याबाबत मंत्री महोदयांनी ठाम घोषणा करावी, अशी मी आपल्याला विनंती करतो.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, अभ्यास करुन या विषयी नंतर कार्यवाही करावी असा विचार होता. परंतु ही गोष्ट आपल्याच नेत्यांना मान्य नसावी. यामुळे मी काय करणार. यामुळे शासन या बाबतीत सकारात्मक कार्यवाही करीन असे मी सांगितले होते.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, अधिवेशनापूर्वी संपूर्ण मंत्रिमंडळ अतिशय घाईघाईने लातूरला जावून आले, पर्यटन करुन आले. किमान मराठवाड्याच्या विद्यार्थ्यांकरिता परीक्षा फी माफ करु म्हणत आहात. परंतु आमचा आग्रह असा आहे की, सदर विद्यार्थ्यांची शैक्षणिक शुल्क माफ केली पाहिजे. अनुदानित महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क नव्हे तर सरसकट सर्व अनुदानित, विनाअनुदानित आणि कायम विना अनुदानित महाविद्यालयांमध्ये शिक्षण घेणाऱ्या मराठवाड्यातील दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांच्या फी माफीचा निर्णय होईपर्यंत ही लक्षवेधी सूचना राखून ठेवावी. मराठवाड्यातील विद्यार्थ्यांचा हा महत्त्वाचा प्रश्न आहे. सभापती महोदय, आमची आपल्याला विनंती आहे की, आपण ही लक्षवेधी सूचना राखून ठेवावी. मंत्री महोदय सांगत आहेत की, आम्ही या संबंधी निर्णय घेत आहोत. अधिवेशन संपण्याकरिता बराच अवधी आहे. यामुळे सदर निर्णय होईपर्यंत ही लक्षवेधी सूचना राखवून ठेवावी. अन्यथा माननीय मुख्यमंत्र्यांना सदनात बोलवून घ्यावे व यासंबंधी निर्णय करावा. यासंबंधी आजच्या आज कार्यवाही करणार आहे का ?

...3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सदर लक्षवेधी सूचना उद्या ठेवली होती. परंतु सदर लक्षवेधी सूचनेवर आज चर्चा करावी असे सांगण्यात आले. आज सदर लक्षवेधी सूचनेवर चर्चा सुरु असल्यामुळे मी त्या अनुषंगाने सन्माननीय सदस्यांच्या प्रश्नांना उत्तरे देत आहे. सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांनी विचारलेल्या प्रश्नाला मी उत्तर देतो. माझा सर्व विषय पाठ आहे. मी हा विषय सकारात्मक दिशेने नेण्याचा प्रयत्न करीत होतो. परंतु आपल्याला तो विषय पुढे न्यायचा नाही. मी सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांना सांगू इच्छितो की, आपल्या सरकारच्या काळात काढलेल्या जी.आर. प्रमाणे 93 च्या नियमानुसार नुसार ई.बी.सी.च्या विद्यार्थ्यांकरिता प्रत्यक्षात शैक्षणिक शुल्काच्या सवलतीची अंमलबजावणी झाली. परंतु दुष्काळाची भयानकता पाहता ई.बी.सी. विद्यार्थ्यांव्यतिरिक्त अन्य किती मर्यादा आहेत ? परीक्षा शुल्काच्या बाबतीत सरकार अतिशय सकारात्मक आहे. शैक्षणिक शुल्काचा एकूण किती बोजा आहे, तसेच त्या भागात असलेल्या विद्यापीठातील विद्यार्थी नव्हेतर त्या भागातील विद्यार्थी मुंबई, पुणे व सर्व महाराष्ट्रात शिकत आहेत. या सर्व गोष्टीचा अभ्यास करण्यासाठी आम्ही वेळ मागितला होता. परंतु त्या बाबतीत अद्याप निर्णय झालेला नाही.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, मराठवाड्यातील दुष्काळी परिस्थिती आज निर्माण झालेली नाही. आम्ही 7 ते 8 महिन्यांपासून विशेषतः जुलै महिन्यात माननीय श्री.शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली माननीय मुख्यमंत्र्यांना निवेदन दिले होते. सदर निवेदनात आम्ही ही बाब नमूद केली होती. माननीय शिक्षण मंत्री असे सांगत आहे की, शासन अनुदानित आणि विनाअनुदानित महाविद्यालयांमधील परीक्षा व शैक्षणिक शुल्काची किती रक्कम होत आहे, याचा सर्व आढावा घेण्यासाठी खूप वेळ लागणार आहे. मध्यंतरी राष्ट्रवादी विद्यार्थी संघटनेच्या माध्यमातून औरंगाबाद आणि विविध विद्यापीठांवर मोर्चे काढण्यात आले होते, त्यात प्रचंड विद्यार्थ्यांचा सहभाग होता. यासंबंधी एक महिन्यापासून कार्यवाही सुरु आहे. या संबंधी सकारात्मक निर्णय घेऊ असे शासनाकडून सांगण्यात आले. मंत्री महोदयांनी असे सांगितले की, याकरिता 1300 कोटी रुपये किंवा 1400 कोटी रुपये लागतील. मराठवाड्यातील संपूर्ण जिल्ह्यांमध्ये किती विद्यार्थी अनुदानित

...4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनील तटकरे...

आणि विना अनुदानित महाविद्यालयांमध्ये शिक्षण घेत आहेत याबाबतची सर्व माहिती सरकारकडे आहे. त्याकरिता नव्याने माहिती संकलित करण्याची गरज नाही. अधिवेशन संपण्यापूर्वी शासनाकडून यासंबंधी तातडीने निर्णय घेतला जाणार आहे का ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, ही आकडेवारी काढण्यासाठी उशीर होत आहे. ही बाब खरी आहे. दुष्काळ पडला त्याच वेळी त्यांनी यासंबंधी आकडेवारी दिली असती तर सहज आकडेवारी मिळाली असती. परंतु त्यावेळी त्यांनी ही आकडेवारी दिली नाही. सभापती महोदय, ही बाब कशी सोपी झाली असती, याबाबत मी सदनाला माहिती देत आहे. आपण आपल्या काळात सर्व माहिती दिली असती तर आपल्याला ही आकडेवारी तयार मिळाली असती. परंतु आपण सदर आकडेवारी दिली नाही. आम्ही आता सदर आकडेवारी काढत आहोत.

( विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य घोषणा देत असतात.)

सभापती महोदय, मागील वर्षी व त्या अगोदरच्या वर्षी दुष्काळ पडला त्यावेळी त्यांनी शैक्षणिक शुल्क माफ केले असते तर मला सोपे गेले असते असे मी म्हटले तर त्यात माझे काय चुकले ? त्यांनी स्वत: सत्तेत असताना कधीही शैक्षणिक शुल्क दिले नाही. तटकरे साहेब, आपण सुध्दा अर्थमंत्री होता.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, माझा पॉईट ऑफ ऑर्डर आहे.

यानंतर U-1.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, तत्कालीन आघाडी सरकारने दिनांक 14 ऑगस्ट, 2014 रोजी या राज्यातील 23,000 गावे दुष्काळी म्हणून जाहीर केली होती. ती 23000 गावे या सरकारने दुष्काळी म्हणून घोषित केली का, मागील काळात 30 तालुके दुष्काळी जाहीर केले होते, ते यावेळी दुष्काळी तालुक्यांच्या यादीमध्ये आहेत का? मंत्री महोदयांकडून आम्हाला एवढेच अपेक्षित आहे की, या संवेदनशील विषयाबाबत दुष्काळी भागातील विद्यार्थ्यांच्या शुल्क माफीच्या संदर्भात राजकीय बोलण्याऐवजी निर्णय जाहीर व्हावा. लातूर येथे माननीय मुख्यमंत्र्यांनी पत्रकार परिषद घेऊन जाहीर केले होते की, आम्ही शुल्क माफ करणार आहोत. आज निर्णय घ्यायला शासनाला कोणती अडचण येत आहे?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, पूर्वीच्या काळात सत्तेत असणाऱ्या सरकारने दुष्काळी भागातील इबीसी वर्गातील विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क माफी दिली होती. त्याच्या दोन पावले पुढे आम्ही टाकली आहेत, त्याचे कोणी कौतुक करायला तयार नाही. त्यांच्या ते स्वभावात बसत नसावे. मी खरेच सांगतो की, दुष्काळाची भयानकता आम्ही अनुभवली आहे. विद्यार्थ्यांशी बोलल्यानंतर त्याची तीव्रता अधिक जाणवते. त्यामुळे या विषयामध्ये सकारात्मक विचार केला जाईल. भावनिक पातळीवर विचार न करता आर्थिक आकडेवारीनुसार किती मदत देता येईल, नेमकी कोणत्या पध्दतीने देता येईल या संदर्भात चर्चा करून योग्य तो निर्णय योग्य त्या वेळी घोषित करू.

**उप सभापती** : माननीय विरोधी पक्षनेत्यांनी या ठिकाणी एक सूचना केली आहे. त्यांना दुष्काळी भागातील विद्यार्थ्यांना शुल्कामध्ये सवलत देण्याबाबत आपल्याकडून निर्णयाची अपेक्षा होती, त्या संदर्भात अधिवेशन संपण्यापूर्वी निर्णय घ्यावा अशी त्यांची सूचना आहे. मला असे वाटते की, ती सूचना योग्य असून आपण शक्यतो त्याचा विचार करावा.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय आपल्या निर्देशाप्रमाणे विचार करू.

------

...2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.** : राज्यातील इलेक्ट्रो होमिओपॅथी डॉक्टरांसाठी स्वतंत्र परिषदेची स्थापना करणे

**मु.शी.** : राज्यातील इलेक्ट्रो होमिओपॅथी डॉक्टरांसाठी स्वतंत्र परिषदेची स्थापना करणे यासंबंधी सर्वश्री हेमंत टकले, किरण पावसकर, नरेंद्र पाटील, ख्वाजा बेग, आनंद ठाकूर, विक्रम काळे, सुनील तटकरे, प्रकाश गजभिये ,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.हेमंत टकले (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय वैद्यकीय शिक्षणमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यातील इलेक्ट्रो होमिओपॅथी डॉक्टरांसाठी स्वतंत्र परिषदेची स्थापना करा असे आदेश मा. उच्च न्यायालयाने दिले असता सरकारने या आदेशाची अंमलबजावणी न करणे, या पार्श्वभूमीवर इलेक्ट्रो होमिओपॅथी डॉक्टरांनी दि. ८ जानेवारी, २०१६ रोजी आझाद मैदानात आंदोलन करण्याचा इशारा देणे, मात्र आंदोलन करणाऱ्या इलेक्ट्रो होमिओपॅथी डॉक्टरांच्या सोबत चर्चा करण्यासाठी मा. आरोग्य मंत्री यांनी उपस्थित राहण्यास नकार देणे, परिणामी इलेक्ट्रो होमिओपॅथी डॉक्टरांमध्ये शासनाप्रती निर्माण झालेला असंतोष व निराशेचे वातावरण, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया"

श्री.विनोद तावडे (वैद्यकीय शिक्षणमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, नवे सरकार स्थापन झाल्यापासून एक अतिशय मेहनती अशा मंत्री महोदयांकडे वैद्यकीय शिक्षण खात्याचा कार्यभार सोपविण्यात आला आहे. या विषयाबाबत त्यांचा खूप अभ्यास आहे. ते अनेक ठिकाणी या विषयाबाबत बोलतात. एकूण राज्यात प्रशिक्षित वैद्यकीय सेवा देणाऱ्यांची गरज आणि ती सेवा देताना इलेक्ट्रो होमिओपॅथी व्यवसाय हा एक असा व्यवसाय आहे की तो इतर पॅथीप्रमाणे नसला तरी त्याचा अनेक भागामध्ये चांगला उपयोग होऊ शकतो. ही प्रॅक्टिस करणारे जे डॉक्टर्स आहेत त्यांनी यासाठी अनेकदा आंदोलने केली. मेडिकल कौन्सिलप्रमाणे इलेक्ट्रो होमिओपॅथी कौन्सिल असावी अशी त्यांनी मागणी केली. या संदर्भात हायकोर्ट आणि सुप्रीम कोर्टात केस दाखल झाल्यानंतर सुप्रीम कोर्टाने जो निवाडा दिला त्याबाबत राज्य सरकारने लक्ष दिले नाही, त्यामुळे असा व्यवसाय करणारे हजारो डॉक्टर्स आपल्या व्यवसायापासून वंचित होत आहेत. ते वंचित झाल्यामुळे रुग्णांपर्यंत ही सेवा पोहोचू शकत नाही. त्यामुळे या प्रकरणात अभ्यासक्रम मान्यताप्राप्त वैद्यकीय पध्दती असे जरी म्हटले तरी आज जी परिस्थिती आहे त्यानुसार असे पर्यायी उपचार वेगवेगळया माध्यमातून देण्यात येत असतात. राज्यामध्ये आपण आणखी नवीन गोष्टी सुरु करणार आहोत. त्यात नॅचरोपॅथीचा समावेश आहे. परंतु या पॅथीचा योग्य अभ्यास करुन खरोखर उपयोगी नसेल तर शासनाने ती बंद करावी किंवा सुरु ठेवायची असेल तर त्याचे नियमन करावे, योग्य प्रकारची प्रशासकीय यंत्रणा निर्माण करावी. त्यासाठी आवश्यक असेल तर वेगळी कौन्सिल स्थापन करुन या व्यवसायाला योग्य मार्गाने पुढे जाता येईल आणि कोर्सेस शिकविणा-या संस्थांमध्ये विद्यार्थी दाखल झाल्यानंतर भविष्यात त्यांना व्यवसाय करण्यासाठी मार्ग उपलब्ध होईल, यादृष्टीने शासन विचार करणार आहे काय?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी माझे कौतुक केले त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो. इलेक्ट्रो होमिओपॅथी या व्यवसायाबाबत एक समज असा आहे की, हायकोर्ट आणि सुप्रीम कोर्टाने मान्यता दिली आहे. हा विषय हायकोर्ट आणि सुप्रीम कोर्टात केला त्यावेळी त्यांना व्यवसाय आणि नोंदणीकृत व्यवसाय म्हणजे प्रॅक्टिस आणि रजिस्टर्ड प्रॅक्टिस याबाबत "....electropathy is not recognised as a system of medicine in any part of the world including in Italy, where it is alleged to have been discovered in 1865 as is sought to be made out by the petitioner.", असे



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विनोद तावडे.....

स्पष्टपणे दिनांक 13 ऑगस्ट, 2001 रोजी माननीय न्यायालयाने म्हटले आहे. त्यामुळे अशा प्रकारचे वैद्यकीय शास्त्र म्हणून कोर्टाने मान्यता दिलेली नाही.

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी शिक्षण पूर्ण केलेला डॉक्टर व्यवसाय करु शकतो का असा मुद्दा मांडला आहे. जरूर व्यवसाय करता येईल, त्याला डॉक्टर म्हणता येईल. रजिस्टर्ड प्रॅक्टिस याचा अर्थ नावाच्या अगोदर 'डॉक्टर' ही पदवी लावून प्रॅक्टिस करण्यासाठी कोर्टाने अनुमती दिलेली नाही. ज्यावेळी ॲक्युपंक्चर थेरपीचा विचार केला गेला त्यावेळी इलेक्ट्रो होमिओपॅथीचे विद्यार्थी भेटले होते. त्यांच्याशी आम्ही चर्चा केली आणि करीत आहोत. या विषयाचा चांगला अभ्यास करु. ती जगातील प्रॉपर पॅथी असेल तर मान्यता द्यायला कोणतीच अडचण नाही. आज तरी तसे दिसत नाही. सरकारचे अर्धवट वक्तव्य घ्यायचे आणि खाजगी कॉलेज काढायची मुलांकडून डोनेशन घेऊन शिकवायचे आणि मग हजारोंच्या संख्येने विद्यार्थी आझाद मैदानावर उपोषण करताना दिसतात. आता तरी या विषयाला कोणत्याही प्रकारची मान्यता मिळणार नाही याची स्पष्टता असावी. कारण न्यायालयाने तसे म्हटले आहे. याचा अधिक अभ्यास करु आतापर्यंत जो अभ्यास केला त्यातून त्यांना डॉक्टर म्हणून प्रॅक्टिस करता येणार नाही हे स्पष्ट आहे.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी सांगितले की, इलेक्ट्रो होमिओपॅथी डॉक्टरांना प्रॅक्टिस करण्यासाठी न्यायालयाने देखील परवानगी दिलेली नाही. शेवटी हे विद्यार्थी प्रॅक्टिस करणारे डॉक्टर म्हणून समाजात जाणार आहेत. शासन या डॉक्टरांना प्रॅक्टिस करु देणार नाही, परवानगी देणार नाही असे मंत्री महोदयांनी सांगितले आहे. जर कोणी अशा प्रकारचे शिक्षण घेऊन प्रॅक्टिस करीत असेल तर त्यांच्यावर कारवाई करणार आहात का?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, शासन यापुढे अनुमती देणार नाही असे नाही. या पूर्वीही अनुमती दिलेली नाही. त्यामुळे कारवाई होत आहे म्हणून अशा लक्षवेधी सूचना उपस्थित होतात.

---------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

SGB/ AKN/ ST/ KTG/ 16:00

**पृ.शी.** : राज्यातील अनधिकृत धार्मिक स्थळांचे बांधकाम निष्कासित करण्यात येत असल्यामुळे भाविक व जमीन मालकांमध्ये पसरलेले संतापाचे वातावरण

**मु.शी.** : राज्यातील अनधिकृत धार्मिक स्थळांचे बांधकाम निष्कासित करण्यात येत असल्यामुळे भाविक व जमीन मालकांमध्ये पसरलेले संतापाचे वातावरण यासंबंधी श्री.गोपीकिसन बाजोरिया, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री.गोपीकिसन बाजोरिया (अकोला-वाशिम-बुलढाणा स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशांच्या अनुषंगाने शासनाने सन २००९ पूर्वीच्या अनधिकृत धार्मिक स्थळांचे बांधकाम निष्कासित करण्याचे दिनांक १८ नोव्हेंबर, २०१५ च्या शासन निर्णयान्वये दिलेले आदेश, सदर आदेशानुसार राज्यात цरस्त्यालगत असलेल्या अनधिकृत धार्मिक स्थळांचे बांधकाम निष्कासित करण्याची कार्यवाही सुरु होणे, सदर बांधकामे निष्कासित करतांना कोणतीही शहानिशा न करता धार्मिक स्थळांचे बांधकाम निष्कासित करण्यात येणे, काही ठिकाणी स्वतःच्या मालकीच्या खुल्या जागेमध्ये असलेल्या धार्मिक स्थळांचे बांधकाम केलेले असतानाही ते अनधिकृत ठरवून निष्कासित करण्यात येत असणे,सदर धार्मिक स्थळांचे बांधकाम निष्कासित करण्यापूर्वी जमीन मालकांना पूर्वसूचना अथवा नोटिसा बजावण्यात न येणे, धार्मिक स्थळांच्या मालकांना आपली बाजू मांडण्याची संधी न देणे, त्यामुळे भाविकांमध्ये तसेच जमीन मालकांमध्ये पसरलेले प्रचंड संतापाचे वातावरण, सदर कार्यवाहीबाबत शासनाने फेरविचार करण्याची नितांत आवश्यकता, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

डॉ.रणजित पाटील (विधी व न्याय राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

....6...



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...7...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.गोपीकिसन बाजोरिया : सभापती महोदय, माननीय सर्वोच्च न्यायालयाने स्वतः सू-मोटो स्पेशल लिव्ह पिटिशन क्रमांक 8519/06 दाखल करुन घेतली. त्यामध्ये धार्मिक स्थळे निष्कासन आणि नियमितीकरण याबद्दल दिनांक 29.2.2009 रोजी एक आदेश पारित केला. त्या अनुषंगाने राज्य शासनाने सुध्दा दिनांक 5 मे, 2011 रोजी एक जीआर काढला आणि योग्य धोरण ठरविले. जी अनधिकृत धार्मिक स्थळे दिनांक 29.2.2009 पूर्वी अस्तित्वात होती त्याबाबत कायदा आणि सुव्यवस्था, वाहतूक, लोकमान्यता इत्यादी विषयी पोलिसांचा अहवाल, विकास नियंत्रण नियमावली, विकास आराखडा या दृष्टीने संबंधित नियोजन प्राधिकरणाचे अभिप्राय तसेच संबंधित भूधारकाची संमती प्राप्त करुन घेऊन सर्व अनधिकृत धार्मिक स्थळांच्या संदर्भात निष्कासन आणि नियमितीकरण याबाबतचा प्रारुप कृती आराखडा पुढीलप्रमाणे सहा महिन्यात तयार करण्यात यावा.

नंतर व्ही.1....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.गोपीकिसन बाजोरिया....

यासाठी जिल्हा व राज्य स्तरिय समिती तयार करण्यात आली. सर्वोच्च न्यायालयाचे स्पष्ट आदेश होते की, दिनांक 29.9.2009 नंतरचे धार्मिक स्थळ काढून टाकायचे आणि 2009 च्या पूर्वीचे धार्मिक स्थळ असेल तर जिल्हा व राज्य स्तरिय समिती यांच्या समोर नेऊन डेव्हलपमेंट कंट्रोल रूल्स प्रमाणे लोकमान्यता असेल तर प्लानिंग ऑथोरिटीला विचारून.....

**उप सभापती :** सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा.

श्री.गोपीकिसन बाजोरिया : सभापती महोदय, मी प्रश्न डेव्हलप करीत आहे. आपण मला संरक्षण द्यावे. मी धार्मिकस्थळांच्या संरक्षणाचा विषय उपस्थित करीत आहे. सर्वोच्च न्यायालयाने व राज्य शासनाने ठरविलेल्या प्रोजिसजर नुसार महानगरपलिकेने कारवाई करायला पाहिजे होती. परंतु, अकोला महानगरपलिकेने कोणतीही कारवाई प्रोसिजरप्रमाणे न करता कोणतेही धार्मिकस्थळ दिसले की तोडण्याची कारवाई केलेली आहे. एखाद्या कॉलनीमध्ये 100 लोक राहत असतील आणि त्यांच्या लोकमान्यतेनुसार कॉलनीच्या मध्यभागी धार्मिकस्थळ बांधले असेल तर ते तोडता येते काय ? सर्वोच्च न्यायालयाने आणि राज्य शासनाने जी भूमिका ठरविलेली आहे त्याची अंमलबजावणी न करता अकोला महानगरपालिकेने गैरकायदेशीरपणे धार्मिकस्थळ तोडण्याचा कार्यक्रम सुरू केला आहे तो आपण बंद करणार आहात काय, तो कार्यक्रम नियोजनबद्ध पद्धतीने मार्गी लावण्यासाठी शासन बैठक घेणार आहे काय ?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, दिनांक 5.5.2011 रोजी शासनाने यासंबंधातील कार्यपद्धती विशद केलेली आहे. त्यात शासकीय सार्वजनिक जागेवर अनधिकृत धार्मिक स्थळे असतील तर ते निष्काचित करण्यासंबंधातील कार्यपद्धती विशद केलेली आहे. ती धार्मिकस्थळे स्थलांतरित करता येत असतील तर ती करावीत असे देखील नमूद केले आहे. जी काही धार्मिकस्थळे नियमित होत असतील ती नियमित करणे आणि जी काही होऊ शकत नसतील त्यांचे निष्कासन करण्यात यावे यासंबंधातील कार्यपद्धती नमूद करण्यात आली आहे. याच्या तीन याद्या देखील फर्निश करायला सांगितल्या होत्या. त्यासंदर्भातील आक्षेप असतील तर त्याबाबत सुनावण्या

..2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.रणजित पाटील...

घेणे, संबंधित लोकांच्या भावना समजावून घेणे असे नमूद केले आहे. आपण जर यात बसत नाही असे वाटत असेल तर राज्य स्तरीय समितीचा अभिप्राय घेऊ शकतो अशा पद्धतीची स्टँडर्ड प्रोसिजर ऑफ ऑपरेशनची तरतूद करण्यात आली आहे. अकोला महानगरपालिकेमध्ये हे फॉलो झालेले नाही. त्यासंबंधातील माहिती घेतली जाईल. हे झाले नसेल तर त्यांना तसे निदेश देण्यात येतील. यासंबंधात बैठक घेण्याची आवश्यकता भासली तर ती देखील घेण्यात येईल.

श्री.चंद्रकांत रघुवंशी : सभापती महोदय, हा विषय अकोला महानगरपालिकेपुरता मर्यादित नसून सर्व महानगरपालिकांमध्ये आहे. हा विषय सर्व महानगरपालिकांना डोकेदुखी झालेली आहे. माझी आपल्या माध्यमातून मंत्रिमहोदयांना विनंती आहे की, सन 2015 पर्यंतची सर्व बेकायदेशीर बांधकामे आपण कायदेशीर करीत आहोत. त्याच धर्तीवर सर्व धार्मिक स्थळे आपण कायदेशीर करणार आहात काय ?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, सुप्रीम कोर्टाचा निर्णय आहे. त्याचा आपल्याला सन्मान ठेवावा लागेल. त्याला अनुसरूनच आपल्याला काम करावे लागेल. हा निर्णय त्यांनी दिनांक 29.9.2009 रोजी घेतला होता. त्यावेळी राज्य सरकारला वेळोवेळी ॲफिडेव्हीट सादर करावे लागले होते आम्ही त्याला अनुसरून काम करू. त्यामुळे आपण दिनांक 5.5.2011 रोजी प्रारूप अहवाल व गाईड लाईन्स राज्य शासनाने तयार केलेल्या आहेत. आपण सन 2009 नंतरची आणि आधीची अशी फ्रेमवर्क दिलेली आहे. आपण 2015 पर्यंत मागणी करीत आहात. असे जर केले तर सुप्रीम कोर्टाच्या आदेशाचा अवमान केल्यासारखे होईल. आपण त्या फ्रेमवर्कमध्ये असल्यामुळे आपल्याला त्या फ्रेमवर्कनुसार काम करावे लागेल.

**उप सभापती :** आता लक्षवेधी सूचना क्रमांक 8 घेण्यात येईल.

श्री.संदीप बाजोरिया : सभापती महोदय,,,,,,

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्य श्री.गोपीकिसन बाजोरिया यांना सांगू इच्छितो की, मघाशी झाले तसे आता होते आहे. आपण मघाशी चुकीची बाजू घ्यायला गेलात. आता आपला प्रश्न झाल्यानंतर आपण पुढे गेलो आहोत. मघाशी श्री. सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांच्या प्रश्नाबाबत झाले. आता आपण प्रश्न विचारावा. पण परत असा हस्तेक्षप करू नये.

..3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.गोपिकिसन बाजोरिया : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांचे म्हणणे अगदी बरोबर आहे. सभापती महोदय, माझे एकच म्हणणे आहे की एखाद्या कॉलनीमध्ये कोणीही कोणची परवानगी घेऊन धार्मिक स्थळ बांधत नाही. एखादा अभिन्यास तयार झाला. जेथे गुण्यागोंविदाने 50 लोक राहतात तेथे धार्मिक स्थळ बांधले जाते. अशा प्रकारचे धार्मिक स्थळ बांधताना ते कोणाचीही परवानगी घेत नाही. तेव्हा ज्या देवस्थानाला, धार्मिकस्थळाला लोकमान्यता आहे ते आपण नियमित करणार आहात काय

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, आपल्याला सुप्रीम कोर्टाच्या निर्णयाला अधीन राहूनच कामकाज करावे लागेल हे मी आधीच विशद केलेले आहे. त्यानुसारच पुढचे कामकाज होईल. त्यात आपण गाईड लाईन्स दिलेल्या आहेत. यासाठी आपण क्षेत्रीय समिती घटित केलेली आहे. त्यांना वाटले की, हे त्यामध्ये बसत नाही पण लोकमान्यता असेल तर ते प्रकरण राज्य समितीकडे येऊ येकते व त्यावर ती समिती निर्णय घेऊ शकते.

.....

..4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.** : दिल्ली-मुंबई औद्योगिक पट्टयाअंतर्गत दिघी पोर्ट औद्योगिक क्षेत्राचे भूसंपादन करताना महामंडळाचे हित लक्षात न घेणे

**मु.शी.** : दिल्ली-मुंबई औद्योगिक पट्टयाअंतर्गत दिघी पोर्ट औद्योगिक क्षेत्राचे भूसंपादन करताना महामंडळाचे हित लक्षात न घेणे यासंबंधी श्री.धनंजय मुंडे, वि.प.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.धनंजय मुंडे (विरोधी पक्ष् नेता) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय उद्योग मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"दिल्ली-मुंबई औद्योगिक कॉरिडॉर राज्याच्या औद्योगिक व आर्थिक विकासाकरीता एक महत्वपूर्ण व महत्वकांक्षी प्रकल्प असणे, राज्यातील दिल्ली-मुंबई औद्योगिक पट्टयाअंतर्गत दिघी पोर्ट औद्योगिक क्षेत्राचे भूसंपादन करताना महामंडळाचे हित लक्षात न घेता निव्वळ विशिष्ट जमीन मालकांना फायदा होण्यासाठी सलग भूसंपादन न करता विखुरल्या स्वरुपात, संपूर्ण गट न घेता, पैकी (Partial) संपादन झाल्याचे, प्रधान सचिव, उद्योग यांनी या संदर्भात घेतलेल्या आढावा बैठकीत निदर्शनास येणे, भूसंपादनापोटी ४५० कोटी रुपये खर्च करुन देखील सार्वजनिक निधीचा योग्य प्रकारे वापर न झाल्याचे व सलगतेने क्षेत्राचे संपादन न केल्याने सदरचे क्षेत्र एम.आय.डी.सी.ला सद्यस्थितीत औद्योगिक वापरासाठी उपयोगात आणता येत नसल्याचे देखील निष्पन्न होणे, योग्य वापरासाठी एम.आय.डी.सी.ला संपादित क्षेत्र उपयोगात आणण्यासाठी संपादनामध्ये सलगता



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे...

येत नसल्यास अशा गावांचे क्षेत्र विनाअधिसूचित करण्याचा प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश देण्यात येणे, अशा प्रकारे चुकीच्या पध्दतीने भूसंपादन होत असल्याने शासनाचे ४५० कोटी रुपयांचे नुकसान होऊन संपूर्ण भूसंपादनात औद्योगिकरण अडचणीत येणे, सदर भूसंपादन प्रक्रियेत संबंधित अधिकाऱ्यांनी हितसंबंध जपत निवडक भूसंपादन केल्याने शेकडो कोटी रुपये अधिकाऱ्याच्या खिशात गेल्याची भिती व्यक्त होणे, या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करण्याची लोकप्रतिनिधींनी मागणी केलेली असणे, याविषयी नागपूर येथील माहे डिसेंबर २०१५ च्या हिवाळी अधिवेशनात चर्चा झालेली असणे, मा.उद्योग मंत्र्यांनी याबाबतची अधिकची माहिती व तपशील घेऊन काही चुकीचे झाले असेल तर निश्चितपणे चौकशी केली जाईल असे लेखी उत्तर देणे, पाच गावातील सलगते संदर्भातील कलम ३२ (1) चे जे प्रस्ताव प्रलंबित आहेत त्याला तातडीने मान्यता देण्यात येईल असेही चर्चेवेळी आश्वासित करणे, परंतु अद्यापही भूसंपादनाबाबत उपस्थित केलेले आक्षेप व सूचना त्याचप्रमाणे लोकप्रतिनिधींनी याविषयी केलेल्या चौकशीच्या मागणीवर शासनाने कार्यवाही न केल्याने नागरिकांमध्ये निर्माण झालेला असंतोष, याविषयी शासनाने त्वरीत करावयाची कार्यवाही व भूमिका"

श्री.सुभाष देसाई (उद्योग मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..6

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, दिल्ली-मुंबई औद्योगिक कॉरिडोर संबंधातील ही अतिशय महत्त्वाची अशी लक्षवेधी सूचना आहे. रोहा-माणगाव, पानसई, वावे दिवाळी या तीन औद्योगिक क्षेत्रामध्ये .....

श्री.अनिल तटकरे : सभापती महोदय, मी लक्षवेधी सूचना वाचली आहे. त्यात माननीय विरोधी पक्ष नेते सन्माननीय श्री.धनंजय मुंडे यांनी संपूर्ण माहिती मागविली होती. प्रत्यक्षपणे माहिती देताना रोहा तालुक्यातील कुठल्याही गावांचा समावेश केलेला नाही. तसेच माणगावमधील देखील काही गावांचा समावेश केलेला नाही. जावठा हे माणगाव तालुक्यातील गाव आहे. तेथील किती जमीन संपादित केली त्याचा उल्लेख निवेदनामध्ये नाही. रोहा तालुक्यातील पहूर, पातर आणि जामगाव येथील जमिनी संपादित झालेल्या आहेत. त्याचा देखील उल्लेख येथे करण्यात आलेला नाही हे मी आपल्या निदर्शनास आणून देतो. यावर मी नंतर बोलणारच आहे.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, वावे दिवाळी, पानसई, रोहा-माणगाव या तीन औद्योगिक क्षेत्रामध्ये 471 कोटी रूपयांचा मोबदला अदा करून संपादित करण्यात आलेली जवळ जवळ 1273 हेक्टर क्षेत्रापैकी माननीय प्रधान सचिवांच्या दिनांक 26.8.2015 रोजीच्या अभिप्रायाच्या वेळी किती क्षेत्र सलग संपादित होते व किती क्षेत्रावर सलगतेचा अभाव होता, सदर 26.8.2015 च्या बैठकीनंतर गेल्या सात महिन्यांमध्ये किती भूसंपादन क्षेत्रावर सलगता निर्माण करण्यात यश आलेले आहे, सलगता निर्माण करण्यात येत असलेल्या अपयशामुळे किती क्षेत्र वगळावे लागणार आहे, कलम 32 (1) अनुसार भूसपांदनाचे एकूण किती प्रस्ताव शासनस्तरावर प्राप्त झाले आहेत, ते प्रस्ताव कधी प्राप्त झाले आहेत याची माहिती सभागृहाला देण्यात यावी.

श्री.सुभाष देसाई : सभापती महोदय, कलम 32 (1) लागलेले क्षेत्र वगळता उर्वरित सर्व क्षेत्रासाठी कलम 32 (2) अन्वये हरकती आणि सूचना मागविण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. ज्या गावांमध्ये संमती आणि सलगता येत नसेल त्या गावांचे क्षेत्र वगळण्यासंबंधी विनाअधिसूचित करण्यासंबंधीचा प्रस्ताव शासनास सादर करावा अशा सूचना देण्यात आलेल्या आहेत. साधारणपणे 32 (1) अनुसार भूसंपादनाची अंतिम कार्यवाही करण्यास मान्यता देण्यासंबंधीचा प्रस्ताव एमआयडीसीकडून शासनास प्राप्त झाला आहे. त्याची छाननी सुरूआहे. ही प्रक्रिया सुरू आहे.

..7

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, मी स्पेसिफिक प्रश्न विचारलेला आहे की, 32 (1) खाली भूसंपादनाचे एकूण किती प्रस्ताव शासन स्तरावर प्राप्त झाले आहेत व ते कधी प्राप्त झाले आहेत, त्यासंबंधीचे स्पेसिफिक उत्तर आम्हाला हवे आहे.

श्री.सुभाष देसाई : सभापती महोदय, या तारखा माझ्याकडे आता उपलब्ध नाही. त्या मी पटलावर ठेवीन.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, ही लक्षवेध्री सूचना आज नाही तर मागच्या अधिवेशनामध्ये देखील आली होती. माननीय मंत्री महोदयांकडे यासंबंधातील माहिती नसेल तर ही लक्षवेधी सूचना राखून ठेवण्यात यावी. माहिती आल्यानंतर ही लक्षवेधी सूचना पुन्हा घेण्यात यावी.

श्री.अनिल तटकरे : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी जी लक्षवेधी सूचना उपस्थित केलेली आहे व त्यावर जे लेखी उत्तर दिलेले आहे त्यात अपूर्ण माहिती दिलेली आहे. त्यांनी संपूर्ण माहिती मागितली होती. प्रत्यक्षात माणगाव तालुक्यातील काही गावांचीच माहिती आलेली आहे. माणगावमधील काही गावे राहिलेली आहेत आणि रोहा तालुक्यातील देखील काही गावे राहिलेली आहेत.

यानंतर श्री.अजित.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुभाष देसाई : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारलेली तारीख आता माझ्याकडे उपलब्ध नाही. आपण ही लक्षवेधी सूचना राखून ठेवत असाल तर माझी काही हरकत नाही. नंतरच्यावेळी तपशीलवार आणि अधिकची माहिती सादर करण्यात येईल.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, महत्वाचा मुद्दा असा की, माननीय मंत्र्यांनी उत्तर देताना सभागृहाची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केलेला आहे. नियम 32 (1) चे प्रस्ताव आले, 32(2) साठी ते सलग आहेत किंवा कसे, अगोदरची संलग्नता आणि असंलग्नता असे बरेच विषय आहेत. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी जो स्पेसिफीक प्रश्न विचारला होता तो प्रश्न मागील हिवाळी अधिवेशनात देखील विचारण्यात आला होता. त्यावेळी मंत्री महोदयांनी उत्तर देताना सांगितले होते की, या संदर्भात आठ दिवसांत निर्णय घेण्यात येईल. आता दुसरे अधिवेशन आले तरी त्यांना तारीख माहीत नाही, हे काही योग्य नाही. माझी विनंती आहे की, आपण ही लक्षवेधी सूचना राखून ठेवावी व तीच याच आठवड्यामध्ये घेण्यात यावी.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, हा रस्ता श्रीवर्धन, माणगाव या तालुक्यातून जातो. आम्ही मागील अधिवेशनात देखील हीच माहिती विचारली होती.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्यांनी विचारलेली माहिती आता माझ्याकडे उपलब्ध नाही ती माहिती मी पटलावर ठेवण्यास तयार आहे असे मंत्री महोदयांनी सांगितलेले आहे. परंतु आपणा सर्वांकडून आग्रह झाला की, ही माहिती मंत्री महोदयांकडून मिळाली पाहिजे. माननीय मंत्र्यांनी कबूल केलेले आहे की, ही सर्व माहिती देण्यास ते तयार आहेत. मी मंत्री महोदयांची विनंती मान्य करतो. जेव्हा आपले उत्तर तयार असेल त्यावेळी ही लक्षवेधी सूचना घेण्यात येईल. मी ही लक्षवेधी सूचना राखून ठेवत आहे.

श्री.अनिल तटकरे : सभापती महोदय, शेतकऱ्यांचे किती प्रस्ताव आले, जमीन मालकांनी संमती दिल्यानंतर त्यांना किती दिवसांत मोबदला देणे शासनाला अपेक्षित आहे. कारण काही शेतकऱ्यांना एक-दीड वर्षे पैसे मिळालेले नाहीत. तेव्हा ही माहिती देखील त्यावेळी देण्यात यावी.

श्री.सुभाष देसाई : सभापती महोदय, आपण ही लक्षवेधी सूचना राखून ठेवलेली आहे. सन्माननीय सदस्यांच्या ज्या ज्या सूचना असतील त्या सर्व सूचनांची उत्तरे त्यावेळी देण्यात येतील.

------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**उप सभापती** : आता म.वि.प. नियम 260 अन्वयेच्या दुष्काळाच्या प्रस्तावासंदर्भात माननीय मंत्र्यांचे उत्तर सुरु होईल.

**पृ.शी.:** राज्यातील मराठवाडा, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्रासह अनेक भागात दुष्काळाची गंभीर परिस्थिती निर्माण होणे

**मु.शी.:** राज्यातील मराठवाडा, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्रासह अनेक भागात दुष्काळाची गंभीर परिस्थिती निर्माण होणे या विषयावर सर्वश्री धनंजय मुंडे, शरद रणपिसे, सुनील तटकरे,माणिकराव ठाकरे, जयंत प्र. पाटील, हेमंत टकले, संजय दत्त, कपिल पाटील, अमरसिंह पंडित, अमरनाथ राजूरकर, सतीश चव्हाण, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.संदीप बाजोरिया, ॲड.रामहरी रुपनवर, सर्वश्री अब्दुल्लाखान दुर्राणी, सुभाष झांबड, अशोक ऊर्फ भाई जगताप, आनंदराव पाटील, हरिसिंग राठोड, चंद्रकात रघुवंशी, डॉ.सुधीर तांबे, वि.प.स. यांचा प्रस्ताव

( प्रस्ताव पुनः प्रस्तुत झाला.)

श्री.एकनाथराव खडसे ( महसूल, पुनर्वसन व मदत कार्य मंत्री ) : सभापती महोदय, या ठिकाणी म.वि.प.नियम 260 अन्वये दुष्काळाच्या संदर्भात जो प्रस्ताव मांडण्यात आलेला आहे त्यावर उत्तर देण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, जे महत्वाचे प्रश्न आहेत त्याचे उत्तर देऊन विरोधी पक्षांचे समाधान होईल अशी मला अपेक्षा आहे. राज्यात मागील तीन वर्षे सातत्याने दुष्काळसदृश्य परिस्थिती आहे. मधल्या कालखंडात काही ठिकाणी नैसर्गिक आपत्तीमुळे मोठ्या प्रमाणात गारपीट व वादळ झाल्यामुळे पीक उद्ध्वस्त झाले. तसेच मोठ्या प्रमाणात फळ पिकांची हानी झाली. मागील तीन वर्षात सातत्याने कुठे ना कुठे दुष्काळ जाहीर करण्याची वेळ आली. सातत्याने तीन वर्ष कमी



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथराव खडसे...

पाऊस पडल्यामुळे तिसऱ्या वर्षात भूगर्भातील पाण्याची पातळी खूप खोल गेली. एखाद्या वर्षी पाऊस झाला नाही तर शेतकरी एक-दोन वर्षे मागे जातो. जर पाऊस पडला तर तो पुन्हा उभा राहतो. परंतु पाऊस झाला नाही किंवा कमी पाऊस झाला तर भूगर्भातील पाण्याची पातळी खोल जाते त्यामुळे पिण्याच्या पाण्यावर त्याचा परिणाम होतो. एका बाजूला पाऊस पडला नाही म्हणून चाऱ्याची निर्मिती झाली नाही, त्यामुळे चारा टंचाई आहे. दुसऱ्या बाजूला राज्यातील 15 हजारांपेक्षा अधिक गावांमध्ये टंचाईसदृश्य परिस्थिती जाहीर झाल्यामुळे बहुतांश भागात पिण्याच्या पाण्याची टंचाई भासण्याची शक्यता आहे. आजही काही गावांमध्ये मोठ्या प्रमाणात टँकर लावावे लागले आहेत. अशा स्थितीमध्ये खरीपाची 15 हजार 747 गावे आणि आता नव्याने सोलापूर आणि अहमदनगर जिल्ह्यांतील 1 हजार 53 गावे टंचाईसदृश्य म्हणून जाहीर करण्यात आली. रब्बी पिकाच्या संदर्भातील अंतिम आणेवारी उद्या येणार आहे. त्यामुळे या गावांमध्ये आणखी वाढ होण्याची शक्यता नाकारता येत नाही. कमी पाऊस, नापिकी आणि गारपीट यामुळे राज्यांतील साधारणतः 17 हजार गावांना दुष्काळाच्या परिस्थितीचा मुकाबला करावा लागत आहे.

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.रामराव वडकुते )**

सभापती महोदय, या चर्चेच्या निमित्ताने माननीय विरोधी पक्ष नेते, सन्माननीय सदस्य सर्वश्री सुनील तटकरे, जयंत प्र.पाटील, प्रा.जोगेंद्र कवाडे आणि इतर सन्माननीय सदस्यांनी अनेक चांगल्या सूचना केल्या. आपण राजकारणाच्या पलीकडे जाऊन दुष्काळाच्या प्रश्नावर चर्चा केली. आपली अपेक्षाही होती की, या प्रश्नाच्या संदर्भात राज्य शासनाकडून प्राधान्याने काहीतरी निर्णय व्हावेत आणि त्यातून शेतकऱ्यांना दिलासा मिळावा.

सभापती महोदय, दुष्काळ घोषित करण्याच्या संदर्भात परंपरागत कालखंडापासून आतापर्यंतचे जे आदेश आहेत त्यामध्ये कालानुरूप बदल करण्याची आवश्यकता निर्माण झाली होती किंवा आहे. राज्यातील बहुतांश भागातून दुष्काळ जाहीर करा, आमच्या येथे दुष्काळ का जाहीर केला नाही, अशी मागणी करण्यात येते. विदर्भात शेतकऱ्यांनी मागणी केली की, आमच्याकडे 75 टक्के पाऊस झाला तरी आमचे उत्पादन कमी आलेले आहे. आमच्याकडे कापूस, सोयाबीन, धानाला हानी पोचल्यामुळे आमच्या भागात दुष्काळ जाहीर केला पाहिजे. कोकणातील शेतकऱ्यांची मागणी आहे की, आमच्याकडे आपल्या अपेक्षेपेक्षा जास्त पाऊस दिसत असला तरी फळ पिकांची



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथराव खडसे...

हानी झालेली आहे. तेव्हा फळ पिकांना नुकसान भरपाई दिली पाहिजे. 50 टक्क्याच्या आत पाऊस झाला म्हणून दुष्काळ जाहीर करावा किंवा निव्वळ नापिकी आली किंवा पेरणी झाली नाही म्हणून दुष्काळ जाहीर करावा असे नसून दुष्काळ जाहीर करण्याबाबत काही निकष ठरलेले आहेत. त्यामध्ये पावसाचे प्रमाण 50 टक्क्याच्या आत असले पाहिजे. पेरणीतील अनियमितता, दुबार पेरणी, मधल्या कालखंडात पावसाने घातलेला खंड, त्यामुळे पिकांचे झालेले नुकसान यावर नजर आणेवारी नंतर अंतिम आणेवारी काढल्यावर दुष्काळसदृश्य गावे जाहीर करण्यात येतात. ही दुष्काळसदृश्य परिस्थिती जाहीर करीत असताना पहिल्यांदा असे लक्षात आले की, बीड, उस्मानाबाद आणि लातूर जिल्हयांमध्ये जो कालखंड पावसाचा असतो त्या ऑगस्ट महिन्यापासून त्या भागातून छावण्या सुरु करण्याची मागणी सुरु झाली. त्या ठिकाणी काही क्षेत्रामध्ये पावसाचे अत्यल्प प्रमाण असल्यामुळे चारा नव्हता. पूर्वीचा इतिहास असा आहे की, आपण चा-याच्या छावण्या जानेवारी महिन्यानंतर सुरु करतो, कारण तेवढा चारा आपल्याकडे उपलब्ध असतो.

यानंतर श्री.बोर्डे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथराव खडसे....

पण या वर्षी दुर्दैवाने या भागात पाऊस न झाल्यामुळे ऑगस्ट महिन्यामध्येच चारा-छावण्यांना मंजुरी द्यावी लागली. या ठिकाणी जनावरांना वाचविण्यासाठी तसेच माणसांना पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करुन देण्यासाठी राज्य सरकारला मागच्या कालावधीतील निकष बदलण्याची आवश्यकता होती आणि ते निकष आम्ही बदलले. विधानसभेत आणि बाहेर मागणी होत होती की, सध्याची पीक आणेवारी पध्दत फार जुनी झाल्यामुळे ती बदलली पाहिजे. नुकसानीमध्ये मदत देण्यासंदर्भातील निकष बदलले पाहिजे, अशीही मागणी होत होती. पूर्वी 50 टक्क्यांच्या वर नुकसान झाले तर मदत मिळत होती. परंतु राज्यामध्ये प्रथमच एनडीआरएफच्या माध्यमातून असा निर्णय घेण्यात आला की, 33 टक्क्याच्यावर दुष्काळ वा नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान झाले तर मदत दिली पाहिजे. त्याचप्रमाणे सर्वसाधारण पिके उदाहरणार्थ कापूस किंवा अन्य जिराईत पिकांना हेक्टरी 4 हजार रुपये मदत देण्यात येत होती. पूर्वीच्या कालखंडात जमीन जिराईत, बागायती, निम बागायती असेल तर ही मदत 1 हेक्टरपर्यंत दिली जात होती. परंतु....

श्री.सुनील तटकरे : पूर्वीच्या काळात कमाल अडीच हेक्टरपर्यंत मदत दिली जात होती. परंतु आपल्या कालावधीत ती मर्यादा 1 हेक्टरवर आणली आहे.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, त्यांनी माझे भाषण पूर्ण होऊ द्यावे. या मर्यादेबाबत नेमके काय होते ते मी आपल्याला सांगेन. कारण या संदर्भातील निर्णय हे मी घेतलेले असल्यामुळे मला त्या बाबत जास्त माहिती आहे. जे मोठे जमीनधारक होते त्यांना फक्त 1 हेक्टरपर्यंत मदत देत होतो. जे अल्पभूधारक होते, मुळात ज्यांची अडीच हेक्टरपर्यंत जमीनधारणा होती त्यांना अडीच हेक्टरपर्यंत मदत देत होतो. परंतु आम्ही बदल करुन 1 हेक्टरची मर्यादा अडीच हेक्टरपर्यंत करण्याचा निर्णय घेतला आहे. जर माझे काही चुकत असेल तर आपण नंतर दुरुस्त करावे. पूर्वी जी मदत 4 हजार रुपये होती ती 6 हजार केली आहे. निम बागायतीच्या संदर्भात जी मदत मिळत होती ती 12 हजार रुपयांपर्यंत वाढविली आहे. फळबागा किंवा पूर्ण बागायती क्षेत्र असेल आणि त्यांचे नुकसान झाले तर त्या ठिकाणी प्रती हेक्टर 18 हजार रुपये मदत देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. या माध्यमातून सर्व ठिकाणी अशा प्रकारच्या मदतीसंदर्भातील निर्णय घेतला आहे. अगोदरच्या

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथराव खडसे....

कालखंडात गारपीट झाली असेल, नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान झाले असेल तर सर्वसामान्य शेतकऱ्यांपर्यंत मदत पोहचविली आहे. ज्या ठिकाणी दुष्काळसदृश परिस्थिती आहे त्या ठिकाणी पीक पैसेवारी पध्दतीच्या संदर्भात ......मला अधिकाऱ्यांकडून चिठ्ठी आली आहे. त्यानुसार पूर्वी बहुभूधारकांना 1 हेक्टरपर्यंत मदत देत होतो. परंतु दिनांक 1 एप्रिल, 2015 पासून ही मदत 2 हेक्टरपर्यंत करण्याचा निर्णय घेतला आहे. आपण म्हणता त्यानुसार अल्पभूधारक शेतकऱ्यांसाठी 1 हेक्टरची मर्यादा केली असेल तर ती 2 हेक्टर करण्यात येईल. सभापती महोदय, मी आपल्या माध्यमातून विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, त्यांनी माझ्या उत्तरात व्यत्यय आणता कामा नये. या संदर्भातील निर्णय मीच जाणीवपूर्वक घेतलेले असल्यामुळे मी चुकत असेल असे वाटत नाही. 2 हेक्टरची मर्यादा 1 हेक्टर करणे शक्य नाही. 1 हेक्टरची मर्यादा 2 हेक्टर करणे हा सयुक्तिक निर्णय आहे. तरी सुध्दा विरोधी पक्ष सांगत आहे तसे झाले असेल तर ती चूक दुरूस्त करण्यात येईल. मला आताच अधिकाऱ्यांनी चिठ्ठी पाठविली आहे. त्यानुसार अल्पभूधारकांना पूर्ण क्षेत्रासाठी मदत देय आहे. त्यामुळे या ठिकाणी एक हेक्टर वगैरे असे क्षेत्र नाही. त्यामुळे आपण माहिती अद्ययावत करून घ्यावी, असे मला वाटते.

श्री.अनिल तटकरे : सभापती महोदय, आमच्याकडे 2 हेक्टरचे नुकसान झालेले असले तरी 1 हेक्टरपर्यंतच मदतीचे वाटप झालेले आहे.

श्री.एकनाथराव खडसे : महोदय, मी स्वतः जाणीवपूर्वक निर्णय घेतलेले आहेत. त्यामुळे आपल्याकडे असा प्रकार घडला असेल तर आपण तसा जी.आर. दाखवावा. मी बैठका घेऊन हे निर्णय घेतलेले आहेत. सन्माननीय सदस्य सांगतात त्यानुसार त्यांच्या भागात 2 हेक्टरचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना 1 हेक्टर क्षेत्रापुरतीच मदत मिळाली असेल तर उर्वरित क्षेत्राची सुध्दा मदत देण्यात येईल. अल्पभूधारकासाठी पूर्वी असलेले क्षेत्र कमी करु असे होणार नाही. पीक आणेवारीच्या पूर्वीच्या पध्दतीमध्ये बदल करून 15 ऑगस्ट पूर्वीच एक समिती गठीत करून नजारा आणेवारीच्या पध्दतीस सुरूवात केली आहे. या संदर्भात निविष्ठा स्वरूपात वाटप करण्याबाबत कार्यवाही करणार आहोत. कोरडवाहू क्षेत्रासाठी 4500 रूपयांऐवजी 6800 रूपये मदत करणार आहोत. आश्वासित जलसिंचन अंतर्गत हेक्टरी 9 हजार रूपये मदत करणार आहोत. बहुवार्षिक

..3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथराव खडसे....

पिकांसाठी प्रती हेक्टर 12 हजार रूपयांऐवजी 18 हजार रूपये मदत देण्याचा निर्णय घेतला आहे.

सभापती महोदय, शेतकऱ्यांना दिलासा मिळाला पाहिजे म्हणून नैसर्गिक आपत्तीमध्ये मृत्युमुखी पडलेल्या व्यक्तीच्या कुटुंबीयांना 1.5 लाख रूपयांऐवजी 4 लाख रूपये मदत देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. वीज पडून, दरड कोसळून, पुरात वाहून गेल्यामुळे किंवा अन्य नैसर्गिक आपत्तीमध्ये मृत्यू झाल्यास मृत व्यक्तीच्या कुटुंबीयांना 4 लाख रूपये मदत देण्याचा निर्णय घेतलेला आहे. शेतकऱ्यांना आणखी काही मदत मिळाली पाहिजे, या मताचे आम्ही आहोत.

सभापती महोदय, शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्यानंतर त्याच्या कुटुंबाला सरकारकडून 1 लाख रूपयांची मदत दिली जाते. सकाळी सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या कुटुंबीयांना मदत मिळण्यात विलंब लागतो. हे खरे आहे की, व्हिसेरा किंवा अन्य कागदपत्रांच्या पूर्ततेअभावी आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या कुटुंबीयांना वेळेवर मदत मिळत नाही. आत्महत्या केल्यानंतर आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता करणे, पोस्टमार्टेम झाले काय, कोणत्या कारणामुळे आत्महत्या करण्यात आली हे बघितले जाते. शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्यानंतर कोणाला मदत द्यावी या बाबतचा निर्णय पूर्वी घेण्यात आलेला आहे. सर्वसाधारणपणे शेतकऱ्यावर असलेले सहकारी बँकेचे कर्ज, सावकारी कर्ज, शेतातील नापिकी अशा कारणांमुळे शेतकऱ्याने आत्महत्या केली तरच मदत अनुज्ञेय आहे. या संदर्भात गेल्या अनेक वर्षापासूनचा जी.आर. अस्तित्वात आहे. याला अनेक सन्माननीय सदस्यांनी आक्षेप घेतला. एका बाजूला शेतकऱ्याने आत्महत्या केली, दुसऱ्या बाजूला त्याच्या कुटुंबावर संकट ओढवले आणि तिसऱ्या बाजूला सरकार मात्र तिसरेच सांगत आहे असे सन्माननीय सदस्यांचे म्हणणे होते. आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना सरसकट मदत मिळाली पाहिजे, अशी आपली मागणी आहे. राज्य सरकार आज सुधारित निर्णय जाहीर करीत आहे की, शेतकऱ्याने आत्महत्या केली तर कोणतीही कागदपत्रे उपलबध होण्यापूर्वी त्याच्या कुटुंबीयांना तातडीने 1 लाख मदत द्यावी. जेणेकरून, बाकीच्या जाचातून त्याची मुक्तता होईल. विधानसभा सभागृहात चर्चा करीत असताना सन्माननीय सदस्यांनी मागणी केली की, आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या कुटुंबीयांना 1 लाख रूपयाऐवजी 2 लाख रूपये मदत द्यावी. विधानसभेत अशा प्रकारची मागणी पूर्वी सुध्दा झाली होती.

वाय....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. एकनाथराव खडसे ....

अशा स्वरूपाची मागणी मी त्या बाजूला असताना अनेक वेळा करीत होतो की, काही तरी वाढवून दिले पाहिजे. परंतु या संदर्भात दोन्ही बाजू मांडण्यात येत होत्या की, आत्महत्या करणाऱ्याला 1 लाख रूपये देत असताना, 2 लाख रूपये देणे संयुक्तिक आहे की नाही आणि याबद्दल मतमतांतरे व्यक्त केली गेली होती. शेतकऱ्यांना आत्महत्या करण्यासाठी 2 लाख रूपये द्या, म्हणजे त्यांना प्रोत्साहन द्यायचे का ? हे जरी माणुसकीला पटणारे नव्हते तरी तर्क मानणाऱ्यांची संख्या कमी नव्हती. शेतकऱ्याच्या आत्महत्याग्रस्त कुटुंबाला 2 लाख रूपये देणे की न देणे या संदर्भात अनेकांची मागणी असली तरी शासनाचा या संदर्भात 1 लाख रूपये देण्याचा निकष होता. दुर्दैवाने कोणत्याही शेतकऱ्याचा अपघातामध्ये मृत्यू झाला तर आतापर्यंत शेतकऱ्याला कोणत्याही विम्याचे संरक्षण नव्हते.

श्री. धनंजय मुंडे : सभापती महोदय, पूर्वी होते. तुम्ही त्याचे नाव बदलले आणि आता नवीन योजना केली.

श्री. एकनाथराव खडसे : सभापती महोदय, या देशात अशा स्वरूपाचे कोणत्याही प्रकारचे संरक्षण नव्हते. माननीय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी यासाठी जनता अपघात विमा योजना सुरू केली, मोदीजींच्या सरकारमध्ये ती मोदीजींनी सुरू केली. त्यापूर्वी अशा स्वरूपाची योजना नव्हती अशी माझी माहिती होती. या योजनेचा लाभ शेतकऱ्यांना मिळाला पाहिजे म्हणून राज्यभरातील 1 कोटी 35 लाख खातेदार शेतकऱ्यांना, त्याच्या विम्याचा हक्क आहे, तो सरकारने शंभर टक्के आपल्या तिजोरीतून भरण्याचा निर्णय घेतला. शेतकरी झाड पडून, सर्पदंशाने, विहिरीत बुडून, बैलगाडीमुळे, बैलाने, म्हैशीने मारल्यामुळे मरण पावला, रस्त्याने चालताना अपघातामध्ये मृत्यू झाला तर त्याच्या परिवाराला 2 लाख रूपयांचे संरक्षण विमा कंपनीच्या माध्यमातून दिले, त्याचे नाव स्व. गोपीनाथराव मुंडे अपघात विमा योजना आहे. सरकारने याचा पैसा भरला आणि यापुढे सुध्दा राज्यातील जेवढे काही 1 कोटी 35 लाख खातेदार शेतकरी असतील, मग लहान असो वा मोठा असो, सर्वांचा विमा हप्ता शासन भरेल आणि त्या शेतकऱ्याला विम्याचे संरक्षण मिळेल असा निर्णय शासनाने या संदर्भात घेतला आहे.

..2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. एकनाथराव खडसे ....

सभापती महोदय, जनावरांच्या छावण्यांच्या संदर्भातील एक विषय आहे. आपण 50 रूपये प्रति जनावर देत होतो, त्यामध्ये 70 रूपयांची वाढ केली, लहान जनावरांच्या संदर्भात 35 रूपयांची वाढ केली. आता 500 जनावरांपर्यंत छावणी असा निर्णय होता. 500 जनावरे असतील तरच नवीन छावणीला परवानगी देऊ असे होते. तातडी, आवश्यकता असेल तर आता 500 जनावरांची संख्या ही 250 पर्यंत करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्यामुळे जिल्हाधिकारी यामध्ये तपासणी करतील आणि खरोखर आवश्यकता आहे का, किती जनावरे उपलब्ध आहेत, याचे वर्गीकरण करून निर्णय घेतील. जिल्हाधिकाऱ्यांना या संदर्भातील अधिकार दिले आहेत आणि त्याप्रमाणे आता जिल्हाधिकारी या संदर्भातील निर्णय घेण्यास पात्र राहतील.

सभापती महोदय, पूर्वी नैसर्गिक आपत्तीमध्ये जनावरे दगावली तर त्यांनाही मदत कमी मिळत होती. दुधाळ जनावरांमध्ये म्हैस, गाय, उंट, याक वगैरेसारखी जनावरे होती आणि अशा जनावरांसाठी 16400 रूपये होते. नैसर्गिक आपत्तीमध्ये एखादे जनावर मरण पावले तर 16400 रूपये देत होतो. आता असे जनावर नैसर्गिक आपत्तीमध्ये वीज पडून, विहिरीत पडून किंवा पुरात वाहून, घर कोसळून मरण पावले तर आता प्रति जनावर 30 हजार रूपये देण्याचाही निर्णय शासनाने घेतलेला आहे. ओढकाम करणाऱ्या जनावरांमध्ये घोडा, बैल, गाढव असेल तर अशाला 15 हजार रूपये द्यायचो, आता 25 हजार रूपये देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. वासरू , गाढव, शिंगरू, खेचर यांना 10 हजार रूपये द्यायचो त्याऐवजी आता 16 हजार रूपये अशा संदर्भात देता येतील. कोंबड्यांना 37 रूपयांप्रमाणे मदत देत होतो, 50 रूपयांप्रमाणे मदत त्या कुटुंबाला देण्याच्या संदर्भातही आता निर्णय घेतला आहे. आपत्ती निवारणाच्या संदर्भातही निर्णय घेतला आहे. सन 2012 पासून सातत्याने 3 वर्षे नुकसान होत गेले. मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांना मदत देण्याची भूमिका मागेही घेतली. युती सरकारच्या कालखंडात नेहमीच म्हटले जाते की, मदत मिळाली नाही, कमी मदत मिळाली. पण 8284 कोटी रूपयांची मदत ही प्रत्यक्ष वितरित करण्यात



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. एकनाथराव खडसे ....

आली. मदतीसाठी वितरित केलेली ही रक्कम आहे. अलीकडच्या कालखंडात नैसर्गिक आपत्तीमध्ये दिलेली ही सर्वात मोठी मदत आहे. एवढ्याने थांबलेले नाही. संकटावर संकटे येत गेली आणि त्यामुळे नैसर्गिक आपत्तीसाठी आपण वितरित केलेल्या रकमेमध्ये भर टाकण्यासाठी आणखीही मागच्या डिसेंबरच्या अधिवेशनात 4000 कोटी रूपयांची नव्याने तरतूद केली. केंद्र सरकारकडूनही आपल्याला या संदर्भात पहिल्यांदा 3000 कोटी रूपयांच्या वर रक्कम मंजूर झाली. त्यातील हप्ताही आपल्याला मिळाला आहे. केंद्र सरकारने 3049 कोटी रूपये एवढी मोठी मदत नैसर्गिक आपत्तीमध्ये दिली आहे. आपण राज्य शासनाकडुनही मागच्या कालखंडात 4000 कोटी रूपयांची तरतूद केली. आता राज्यभरात दुष्काळी परिस्थिती आहे, नैसर्गिक आपत्ती आहे. आपत्तीमध्ये एनडीआरच्या निकषांप्रमाणे नापिकीसाठी 2933 कोटी रूपये आणि अतिवृष्टी व गारपिटीसाठी 811 कोटी रूपये मंजूर करून त्याचे वितरण पूर्णतः करण्यात आले आहे. चारा छावण्यांकरिता 109 कोटी रूपये, पाणी पुरवठ्याकरिता 145 कोटी रूपये, कृषी कर्जाकरिता व विम्याकरिता 888 कोटी रूपये, अन्न सुरक्षेकरिता 597 कोटी रूपये, सिंचनाकरिता 1997 कोटी रूपये आणि जमीन महसुलाच्या सूटकरिता, वीज बिल, फी माफी यासाठी 506 कोटी रूपये आहेत. 114 कोटी रूपयांची सूट जमीन महसुलामध्ये देण्यात आली.

सभापती महोदय, कृषी पंप वीज बिलामध्ये साडे तेहतीस टक्के सवलत देण्याचा निर्णय पूर्वीपासनच आतापर्यंत सुरू आहे. मात्र यावर्षीची अभूतपूर्व परिस्थित्ी पाहता आणि साडे तहतीस टक्के सूट दिल्यानंतर 67 टक्केही रक्कम भरण्याचीही शेतकऱ्यांची आजची परिस्थित्ी नाही ही स्थिती लक्षात घेता यावर्षी दुष्काळी भागातील शेतकऱ्यांना तेवढ्या कालखंडात त्यांच्या वीज बिलात 100 टक्के सवलत देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. (अडथळा) पाणी नव्हते तरी तुम्ही इतके वर्षे वीज बिल वसूल करीत होता, ही काही आजची परिस्थिती आहे का ? पूर्वीही पाणी नव्हते तरी पैसे घेत होता. फक्त साडे तेहतीस टक्के सूट देत होता. मी नाही म्हणत नाही. आपण साडे तेहतीस टक्के सूट देतच होता. पाणी असो वा नसो, विहिरीवरचा पंप असो वा नसो, इतकी वर्षे

..4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. एकनाथराव खडसे ....

राज्यात शेतकऱ्याला साडे तेहतीस टक्के सूट देण्याचा निर्णय होता आणि त्याप्रमाणे साडे सदुसष्ट टक्के भरावे लागत होते, मग पाणी असेल किंवा नसेल. आम्ही पहिल्यांदा म्हणत आहोत की, साडे तेहतीस टक्क्यांऐवजी 100 टक्क्यांची वीज बिलात या कालावधीत त्याला सूट देण्यात येईल.

सभापती महोदय, कर्जाचे पुनर्गठण हा एक महत्त्वाचा निर्णय आहे. पूर्वीच्या निकषांमध्ये कर्जाचे पुनर्गठण 3 वर्षांसाठी करीत होतो. आता शासनाने निर्णय घेतला आहे की, कर्जाचे पुनर्गठण 5 वर्षांचे केले पाहिजे. इतकेच नव्हे तर, पहिल्या वर्षीचे शेतकऱ्यांचे कर्ज आहे, त्या कर्जावरचे व्याज शासनाने आपल्या तिजोरीतून भरण्याचा निर्णय घेतला आहे. आता शेतकऱ्यांचे कर्जावरील पहिल्या वर्षीचे व्याज माफ करण्यात आले आहे, त्या माफीची रक्कम बँकांना शासनाकडून देण्यात येईल. उरलेल्या 4 वर्षांच्या कर्जावरील व्याजापैकी निम्मे व्याज शेतकऱ्यांनी भरावे आणि निम्मे व्याज पुढची 4 वर्षे सरकार भरेल अशी सवलत सुध्दा शेतकऱ्यांना या संदर्भात देण्यात आली आहे. कर्ज रूपांतरित केले, पुनर्गठीत केले मात्र कर्जदार राहिला.

....2Z

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथराव खडसे.......

त्याला पुढील कालखंडात पीक कर्ज मिळाले पाहिजे. त्यांच्या कर्जाचे पुनर्गठण झाले तर त्यांना पुढील कर्ज मिळण्यास पात्र धरण्यात येईल आणि त्यामुळे त्यांना कर्ज मिळेल. याबाबतच्या सूचना बँकांना देण्यात येतील. (अडथळा....) शेतकऱ्यांनी जिल्हा बँकांकडूनच पीक कर्ज घेतले पाहिजे, अशी अपेक्षा आहे. जिल्हा बँका कर्ज देत नाहीत, असे आपण लक्षात आणून दिल्यास सरकार त्याबाबत कार्यवाही करील आणि त्या शेतकऱ्यांना कर्ज मिळण्याची हमी राज्य सरकार घेईल. ज्या बँका नियमांचे पालन करणार नाही त्यांच्याविरुध्द कठोर कारवाई करण्यास सरकार मागेपुढे पाहणार नाही. शेवटी या बँका शेतकऱ्यांच्या आहेत.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, साधारणपणे 60 ते 70 टक्के पीक कर्ज जिल्हा बँका देतात आणि 30 ते 35 टक्के पीक कर्ज राष्ट्रीयकृत बँकांकडून दिले जाते. परंतु, राष्ट्रीयकृत बँका राज्य शासनाच्या सूचना मान्य करण्यास तयार नाहीत आणि जिल्हा बँकांकडे फंडिंग उपलब्ध नाही. कारण नाबार्डकडून त्यांना पुरेसे फंडिंग होत नाही. कोकणात अशी परिस्थिती नसली तरी अन्य ठिकाणी अशी परिस्थिती असेल तर राज्य शासन काय करणार आहे ?

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, राज्य शासन अशा प्रकरणात हस्तक्षेप करील. परंतु, आमचा असा आग्रह राहणार आहे की, शेतकऱ्यांनी जिल्हा बँकांकडूनच पीक कर्ज घेतले पाहिजे. आवश्यक असेल तर राज्य सरकार त्यांची पतमर्यादा वाढवून देईल आणि आवश्यक असलेले व्याज राज्य सरकारच्या तिजोरीतून भरील. जेणेकरुन तो थकबाकीदार दिसणार नाही. राष्ट्रीयकृत बँकांच्या बाबतीत राज्य सरकार असा निर्णय घेऊ शकणार नाही. शेतकऱ्यांना जिल्हा बँकांचे दरवाजे मोकळे आहेत, त्यांच्यासाठी एक खिडकी मोकळी आहे. ही खिडकी परंपरागत, वर्षानुवर्षांपासून जिल्हा बँकांचीच आहे. त्या दृष्टीकोनातून सरकार प्रयत्न करील आणि तशी व्यवस्था आपण करु

सभापती महोदय, कर्ज पुनर्गठण हा एक भाग झाला. टंचाईच्या भागात सरकारने पैसे दिले. आतापर्यंत राज्यात पीक विम्याचा लाभही मोठ्या प्रमाणावर शेतकऱ्यांना मिळाला आहे. परंतु, काही ठिकाणी अशी स्थिती होती की, पूर्वीच्या पीक विमा योजनेमध्ये केळी सारख्या

...2....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथराव खडसे..........

पिकांसाठी शेकडा 24 रुपये प्रिमियम भरावा लागत होता आणि वरील पैसे सरकारला भरावे लागत होते. त्यामुळे बहुसंख्य शेतकरी नाराज होते व एवढा मोठा विम्याचा हप्ता लागत असेल तर तो परवडण्यासारखा नाही, अशी परिस्थिती होती. परंतु, आता जिराईत आणि निमबागायतीसाठी देशाचे माननीय पंतप्रधान श्री.नरेंद्रजी मोदी यांनी एक नवीन पीक विमा योजना देशासाठी जाहीर केली आहे आणि त्या माध्यमातून जिराईत पिकांसाठी शेतकऱ्यांना फक्त 1 टक्का हप्ता ठेवला आहे. म्हणजे, 1 रुपया भरा आणि 100 रुपयांचे संरक्षण मिळवा. निमबागायतीसाठी 2 टक्के, फळबागायतीसाठी 5 टक्के हप्ता, अशी नवीन योजना देशपातळीवर सुरु करण्यात आली आहे. या योजनेत आपले राज्य सुध्दा सहभागी झालेले आहे. शेतकऱ्यांनी आपला हिस्सा भरल्यानंतर उर्वरित हिस्सा राज्य सरकार आणि केंद्र सरकार भरणार आहे. या माध्यमातून राज्यभरातील सर्व शेतकऱ्यांनी 1 रुपया, राज्य सरकारने 49 रुपये आणि केंद्र सरकारने 49 रुपये भरावयाचे आहेत. अशा प्रकारे राज्यातील सर्व शेतकऱ्यांच्या विम्यासाठी 2 हजार कोटी रुपये 1 एप्रिल पासून भरण्याची तयारी राज्य सरकारने केली आहे. येत्या 1 एप्रिल पासून नवीन पीक विमा योजनेच्या माध्यमातून राज्यातील सर्व शेतकऱ्यांना संरक्षण देण्याचा महत्वपूर्ण निर्णय राज्य शासनाने घेतलेला आहे. शेतकऱ्यांसाठी हा अतिशय महत्वपूर्ण निर्णय आहे. कारण, सातत्याने गारपीट, दुष्काळ यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होत असून त्यांना सरकारकडे हात पसरावे लागत आहेत. अशा परिस्थितीत त्यांच्या विम्याचा हप्ता भरुन शेतकऱ्यांना अधिकाधिक मदत देण्यासंबंधी देशाच्या माननीय पंतप्रधान श्री.नरेंद्रजी मोदी यांनी जी योजना जाहीर केली आहे त्या माध्यमातून शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी सरकारने व्यवस्था केली आहे.

सभापती महोदय, पीक कर्जाच्या वसुलीस स्थगिती देण्याबरोबरच शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करीत असताना त्यांचे नियमित शैक्षणिक शुल्क माफ करण्यात आलेले नव्हते. आता सरकारच्या माध्यमातून असा निर्णय आम्ही घेत आहोत की, बारावी इयत्तेपर्यंतच्या विद्यार्थ्यांना नियमित शैक्षणिक शुल्क माफ करण्यासंबंधी आम्ही मंत्रिमंडळापुढे जात आहोत. जेणेकरुन त्यांच्या आजच्या स्थितीत बदल झाला पाहिजे.

...3....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथराव खडसे........

सभापती महोदय, सरकारने वेगवेगळ्या पध्दतीने शेतकऱ्यांना मदत केली आहे. विदर्भ, खानदेश, मराठवाडा, कोकण या भागातील काही गावांमध्ये दुष्काळ जाहीर झालेला नाही. या भागात ज्या ठिकाणी दुष्काळ जाहीर झालेला आहे त्या भागातील लोकांना मदत मिळाली आहे. परंतु, जी गावे टंचाईग्रस्त म्हणून जाहीर झालेली नाहीत, परंतु, ज्या ठिकाणी उत्पादन कमी आले आहे, उत्पन्न कमी झाले आहे आणि ज्यांना विम्याचेही संरक्षण नाही, अशा भागातील शेतकऱ्यांनाही लाभ झाला पाहिजे, अशी मागणी पुढे आली होती. विशेषतः कापूस, सोयाबीन आणि धान या पिकांच्या बाबतीत मागणी होती. ज्या ठिकाणी विम्याचे संरक्षण नव्हते, कोणत्याही योजनेचा लाभ मिळाला नव्हता, अशा सोयाबीन आणि कापूस उत्पादक शेतकऱ्यांसाठी 1 हजार 52 कोटी रुपयांची मदत नव्याने देण्यासंबंधीचा निर्णय मंत्रिमंडळाने घेतलेला आहे. ज्या शेतकऱ्यांना उत्पन्न कमी झाले आहे, अशांसाठी ही योजना आहे. काही ठिकाणी नैसर्गिक आपत्तीची नुकसान भरपाई म्हणून पैसे दिले गेले, विम्याचे पैसे दिले गेले, दुष्काळामध्ये पैसे दिले गेले. परंतु, ज्या ठिकाणी गावच दुष्काळात नाही, ज्या ठिकाणी विमा काढलेला नाही, नैसर्गिक आपत्ती नाही, अशा ठिकाणी ही मदत देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतलेला आहे. जवळपास 1 हजार कोटी रुपयांची तरतूद शासनाने यासाठी केलेली आहे. विदर्भ आणि कोकणातील भात उत्पादकांना या वर्षी कमी उत्पादन झाले आहे व त्यामुळे कमी उत्पन्न मिळाले आहे. मोठ्या प्रमाणावर पाऊस असल्याशिवाय भात उत्पादन चांगल्याप्रकारे येत नाही. त्यांना प्रति क्विंटल 200 रुपयांची मदत देण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. म्हणजेच 1 हजार कोटी रुपये कापूस आणि सोयाबीन उत्पादकांना मदत आणि 200 रुपये प्रति क्विंटलप्रमाणे 250 ते 275 कोटी रुपयांची धान उत्पादकांना मदत देण्यासंबंधीचा निर्णय राज्य सरकारने घेतलेला आहे.

सभापती महोदय, अनेक सन्माननीय सदस्यांनी असे सांगितले की, लोकांच्या हाताला काम नाही व त्यामुळे शेतकरी स्थलांतर करीत आहेत. या संदर्भात मी जिल्हाधिकाऱ्यांकडून माहिती घेण्याचा प्रयत्न केला. कोणत्या गावांमधून स्थलांतर झाले आहे, आपण काम देऊ शकलो नाही म्हणून किती मजुरांना स्थलांतर करावे लागले आहे, याबाबतची माहिती मी घेतली. परंतु,

...4....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथराव खडसे..........

माझ्याकडे अशा प्रकारचा एकही अहवाल अद्यापपर्यंत आलेला नाही. वेगवेगळ्या कारणांसाठी स्थलांतर झाल्याच्या याद्या त्यांनी सादर केल्या आहेत. काही ऊस तोडणी कामगारांनी स्थलांतर केले आहे, ठाणे जिल्ह्यात वीट भट्टीवर काम करण्यासाठी काही लोकांनी स्थलांतर केले आहे. परंतु, मनरेगामधून काम न मिळाल्यामुळे, जॉब कार्ड असताना काम न मिळाल्यामुळे स्थलांतर केल्याचे अहवालात दाखविलेले नाही. राज्य सरकारकडून मनरेगाच्या माध्यमातून मागेल त्याला काम दिले जात आहे आणि जिल्हाधिकारी, तहसीलदार यांना कडक सूचना दिलेल्या आहेत. सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील आपल्या जागेवर बसून काम मिळाले नाही, असे सांगण्याचा प्रयत्न करीत आहेत. परंतु, मी आपल्या माध्यमातून सांगू इच्छितो की, जॉब कार्ड काढलेले असताना ग्राम पंचायत किंवा तहसीलदारांकडे मागणी केल्यानंतरही काम उपलब्ध करुन दिलेले नाही, असे स्पेसिफिक प्रकरण आपण माझ्या निदर्शनास आणून दिल्यास उद्या सभागृहाचे कामकाज संपण्यापूर्वी याबाबतची चौकशी करुन कारवाई केली जाईल.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मी स्वतः आयुक्त कार्यालयावर मोर्चा घेऊन गेलो होतो.

यानंतर श्री.बोरले.......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मी स्वत: आयुक्तांकडे मोर्चा घेऊन गेलो होतो. त्यांनी सांगितले की, आमच्याकडे पैशांची उपलब्धता नाही, आमच्याकडे एवढे पैसे नाहीत. त्यामुळे आम्ही काम करु शकत नाही.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, आयुक्तांनी जर अशा स्वरुपाचे उत्तर दिले असेल आणि चौकशीत तथ्य आढळून आले तर आम्ही त्यांच्या विरुद्ध शिस्त भंगाची कारवाई करु. तोंडी सांगणे वेगळे आहे. परंतु, महसूल आयुक्तांनी अशा स्वरुपाचे उत्तर दिल्याचे चौकशीत निदर्शनास आले तर जे महसूल आयुक्त असतील, मग ते कोकण विभागाचे असतील किंवा अन्य विभागाचे असतील, त्यांच्या विरुद्ध आम्ही उद्या सायंकाळच्या आत शिस्त भंगाची कारवाई करु. कारण, असे चालणार नाही. आयुक्त आमच्याकडे पैसे नाहीत असे म्हणणारे कोण आहेत ? आमच्याकडे मागणी केली नाही किंवा हे केले नाही अशा स्वरुपाचे असेल तर आम्ही आयुक्तांवर कठोर कारवाई करु. मनरेगाच्या संदर्भात आम्ही कोणत्याही अधिकाऱ्याची हयगय करणार नाही. त्यांनी मागेल त्याला काम दिलेच पाहिजे आणि आवश्यक असेल तेवढा पैसा राज्य शासनाकडून आम्ही उपलब्ध करुन दिलेला आहे. माझ्याकडे पैसा नाही असे होता कामा नये. मी आताच आयुक्तांकडून अहवाल मागवितो आणि ते अशा स्वरुपाचा हलगर्जीपणा करीत असतील तर आम्ही त्यांच्या विरुद्ध कठोर कारवाई करु.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी मनरेगाच्या बाबतीत अत्यंत कणखर भूमिका घेतलेली आहे. मी सांगू इच्छितो की, गेवराई पंचायत समितीमार्फत महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत नियमबाह्य विहिरी मंजूर करण्यात आलेल्या आहेत. लाभार्थी निवडीच्या पात्रतेचे 11 निकष आहेत. परंतु, गेवराई तालुक्यात पंचायत समिती मार्फत निकष डावलून विहिरी मंजूर झालेल्या आहेत. आपण मनरेगाच्या संदर्भात एवढी कडक भूमिका घेत आहात तर मग गेवराई तालुक्यात पात्र लाभार्थ्यांना डावलून अपात्र लोकांनाही नगरेगा अंतर्गत विहिरी मंजूर करण्यात आलेल्या आहेत. या संदर्भात आपण काही कारवाई करणार आहात काय ?

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी पत्र द्यावे. मी या संदर्भात माहिती घेतो. त्या ठिकाणी अपात्र लोकांना विहिरी दिल्या गेल्या असतील तर ज्यांनी अशा विहिरींना मंजुरी दिली त्या सर्वांवर निलंबनाची कारवाई करण्यात येईल.

..2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सतीश चव्हाण : सभापती महोदय, मी सांगू इच्छितो की, संबंधित गट विकास अधिकाऱ्याला निलंबित केलेले आहे आणि त्याला अटकही झालेली आहे.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, संबंधित गट विकास अधिकाऱ्याला निलंबित केलेले असून त्याला अटकही झालेली आहेत. त्यामुळे मला या संदर्भात काही करण्याची आवश्यकता नाही. तरीही मी याबाबत माहिती घेईन.

सभापती महोदय, संपूर्ण राज्यातील दिनांक 05.03.2016 पर्यंतची मनरेगाच्या कामांची स्थिती बघितली तर राज्यात 30,365 कामे सुरु आहेत. मजुरांची उपस्थिती 4,66,664 आहे. सेल्फवरील कामे 4,62,287 आहेत. मजुरांची क्षमता 1 कोटी 30 लाख इतकी आहे. मराठवाड्यातील दिनांक 05.03.2016 रोजीची स्थिती बघितली तर मराठवाड्यात 6,098 कामे सुरु आहेत. मजुरांची उपस्थिती 86,673 आहे. सेल्फवरील कामे 1 लाख 7 हजार आहेत आणि मजुरांची क्षमता 2 कोटी 78 लाख इतकी आहे. एवढे मजूर कामावर आले तरी आपण त्यांना काम देण्याच्या संदर्भातील व्यवस्था केलेली आहे. बऱ्याच ठिकाणी मनरेगाच्या संदर्भात सातत्याने दोन गोष्टी समोर येतात. एक म्हणजे, मनरेगाच्या संदर्भात मशिनरी वापरण्याची परवानगी नसल्यामुळे आम्हाला काही प्रमाणात मशिनरी वापरण्यास परवानगी दिली तर अधिक कामे होऊ शकतील, अशी काही लोकांची मागणी आहे. दुसरे म्हणजे, मनरेगाचा जो पगार आहे तो सर्वसाधारणपणे 181 रुपये आहे. त्याला पगार म्हणता येणार नाही. मनरेगाच्या कामावरील मजुरांना जी मजुरी मिळते त्यामध्ये वाढ करावी, अशा प्रकारची मागणी मजुरांकडून सातत्याने होत असते. हा विषय केंद्र शासनाच्या अखत्यारीतील आहे. आम्ही केंद्र शासनाकडे या संदर्भात वारंवार पाठपुरावा केलेला आहे. उद्या दिल्ली येथे या संदर्भात बैठक आयोजित करण्यात आलेली आहे. उद्या दुपारी मी देखील दिल्लीला बैठकीसाठी जाणार आहे. उद्या होणाऱ्या बैठकीत मनरेगाच्या मजुरीमध्ये वाढ होईल, अशी मला अपेक्षा आहे. आमचाही तोच आग्रह राहिलेला आहे. (...अडथळा...) आंध्र प्रदेश सरकार स्वत: पैसे देते. मनरेगाची अधिक कामे व्हावीत म्हणून आपला 60:40 चा रेश्यो आहे. त्यामध्ये 60 टक्के मजुरी असली पाहिजे आणि उर्वरीत 40 टक्के कुशल, अकुशल कामाचा भाग असला पाहिजे. गाव पातळीवर, जिल्हा पातळीवर 60:40 च्या रेश्योचे नियोजन करण्याच्या संदर्भातही नव्याने सूचना निर्गमित करण्यात येतील. गावाच्या परिसरात एखाद्या ठिकाणी मोठ्या

..3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथराव खडसे......

प्रमाणावर मातीचे काम होते आणि बाकीचा जो कम्पोनन्ट आहे तो शिल्लक राहतो. म्हणजे माती काम 80 टक्के होते. मग वनीकरण असेल, शेततळे असेल, पळपीक विमा असेल किंवा अन्य काम असेल. त्यामध्ये बाकीचा कम्पोनन्ट शिल्लक राहतो. म्हणून अशा ठिकाणी 60:40 च्या दृष्टीकोनातून तोही कम्पोनन्ट इकडे वर्ग करुन तो 60:40 मध्ये बसवून तेथे मशिनरी वापरण्याचीही परवानगी देता येईल किंवा कुशल कामांमध्ये अशा स्वरुपाचे हे करता येईल, अशा स्वरुपाचा अभ्यास आम्ही करीत आहोत आणि त्यानुसार नियमात बसवून, केंद्र शासनाची परवानगी घेऊन या संदर्भात आपल्याला पुढील आदेश निर्गमित करता येतील.

सभापती महोदय, आम्ही राज्यात जलयुक्त शिवार सारखी महत्वाकांक्षी योजना घेतलेली आहे. मागील 3 वर्षात असा अनुभव आलेला आहे की, दिवसेंदिवस पाण्याची पातळी खोल जात आहे. आम्ही वर्षानुवर्षे पाण्याचा उपसा करीत आहोत. परंतु, पाणी जिरविण्याचे प्रमाण कमी आहे. त्यामुळे पाणी अडविणे आणि पाणी जिरविणे यासाठी प्रयत्न झाले पाहिजेत. आपण त्या माध्यमातून मागील वर्षापासून जलयुक्त शिवार योजनेच्या कामांना सुरुवात केलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री.अमरिश पटेल सभागृहात उपस्थित आहेत. त्यांच्या कालखंडात त्यांनी शिरपूर बंधाऱ्याचे काम केले. त्यासाठी शासनाचे नियम एवढेच पाहिजेत, तेवढेच पाहिजेत, यापेक्षा आम्ही पाणी अडविले पाहिजे याला महत्व दिले आणि त्याच धोरणानुसार मनरेगाच्या माध्यमातून जलयुक्त शिवार योजनेची अधिकाधिक कामे व्हावीत. त्याच बरोबर, यासाठी शासनाच्या माध्यमातून काही पैसा द्यावा, सीएसआरच्या माध्यमातून काही पैसा उभा करावा, लोक सहभागातून काही पैसा उभा करावा, या दृष्टीकोनातून जलयुक्त शिवार योजनेला वेग देण्यात आलेला आहे. यामध्ये सर्वांचा सहभाग मिळाला तर आपल्याला अधिक कामांना सुरुवात करता येईल, अशी मला अपेक्षा आहे. म्हणून राज्य शासनाने काही महत्वाचे निर्णय घेतलेले आहेत. तलावातील, धरणातील, बांधावरील गाळ काढावयाचा असेल तर तो गाळ काढण्यासाठी त्यावर लागणारी रॉयल्टी आपण मागच्याच वेळी माफ केलेली आहे. आता सर्व क्षेत्रात तुम्ही जेथून गाळ काढणार आहात तो गाळा तुम्ही तुमच्या शेतात नेणार असाल तर फॉरेस्ट वगळून कोणत्याही ठिकाणचा गाळ काढला तर त्यावर रॉयल्टी लागणार नाही, असाही महत्वाचा निर्णय आपण सर्वांसाठी सरसकट लागू केलेला आहे.

..4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथराव खडसे.........

सभापती महोदय, आम्ही जिल्हा नियोजन मंडळांना सूचना दिलेल्या आहेत. जिल्हा स्तरीय नियोजन मंडळांना जेसीबी आणि पोकलेन मशिन विकत घेण्याची परवानगी देण्यात आलेली आहे. जिल्हा स्तरीय नियोजन मंडळांनी ती मशिनरी विकत घ्यावी आणि जिल्हा नियोजन मंडळाच्या माध्यमातून त्यांनी डिझेलची व्यवस्था करावी. आपण महात्मा ज्योतिबा फुले कृषी अभियान सुरु केलेले आहे. त्या माध्यमातून आम्ही त्यांना डिझेल उपलब्ध करुन देऊ. आम्ही आवश्यकतेनुसार आणि उपलब्धतेनुसार तुम्हाला मशिनरी देऊ, डिझेलही देऊ आणि या माध्यमातून ज्या ठिकाणी आवश्यक आहे त्या ठिकाणी जलयुक्त शिवाराची कामे करावीत. त्यामध्ये लोकांचाही सहभाग घ्यावा. शासनही त्यामध्ये अधिकाधिक सहभागी होईल. या माध्यमातून राज्यात मोहीम आखावी आणि असेल त्या ठिकाणी पाणी अडवावे, असेल त्या ठिकाणी पाणी जिरवावे, असा आमचा प्रयत्न आहे. आम्ही काही कंपन्यांना, उद्योजकांना, कन्स्ट्रक्शन व्यावसायिकांना ज्यांच्याकडे सीएसआर आहे अशा लोकांना विनंती करीत आहोत की, जलयुक्त शिवारामध्ये तुमचे योगदान असले पाहिजे. आम्ही या माध्यमातून येणाऱ्या पावसाळ्यात पावसाचे पाणी, मग पाऊस कमी असेल का जास्त असेल हे मला सांगता येत नाही. परंतु, जो असेल तो पाण्याचा थेंब आणि थेंब जिरविण्यासाठी आपण सर्वांनी प्रयत्न केल्याशिवाय भावी कालखंडातील पाणी टंचाई दूर होण्यास मदत होणार नाही. हे चित्र का निर्माण झाले ? तुम्ही असो का मी असो. आपण सातत्याने मोठ्या प्रमाणावर पाण्याचा उपसा केला. पाण्याची पातळी 100 फुटावरुन 200 फुट, 200 फुटावरुन 400 फुट आणि आता तर 600 फुट खोल बोअरवेल केली तरी पाणी लागत नाही, अशी अवस्था आज आपल्याला दिसत आहे. म्हणून पाणी पुरवठा योजनेसाठी जलयुक्त शिवार तसेच, पाणी टंचाई दूर करण्यासाठी गाव पातळीवर टँकरची व्यवस्था करणे, टँकरची व्यवस्था करीत असताना बोअरवेल किंवा विहिरी अधिग्रहीत करणे या संदर्भात 1500 लोकसंख्येच्या खेडे गावाला किंवा लोकसंख्येसाठी 1 विहीर अधिग्रहीत करण्याची मुभा आताच्या स्टँडिंग इन्स्ट्रक्शनमध्ये आहे.

..2B-1/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथराव खडसे....

काही सन्माननीय सदस्यांनी अशी मागणी केली आहे की, यामध्ये लोकसंख्येची अट कशासाठी हवी आहे. 200, 250 किंवा 500 लोकसंख्या असली तरी त्यांना पाणी दिले पाहिजे. त्यामुळे एकच बोअरवेल घ्या, एकच विहीर घ्या, ती आटली की, परत दुसरी घ्यायची, याबाबतची परवानगी जिल्हाधिकारी यांना दिली पाहिजे. आवश्यकतेनुसार त्यांनी विहिरी अधिग्रहीत कराव्यात. जिल्हाधिकारी यांना वाटले की, दोन किंवा चार विहिरींची आवश्यकता आहे तर त्यांना त्या बाबतची परवानगी द्यावी असा सन्माननीय सदस्यांचा आग्रह होता. त्यानुसार यासंदर्भातील आदेश राज्य सरकार आज काढणार आहे. ज्या ठिकाणी पिण्याच्या पाण्यासाठी बोअरवेल करणे, पिण्याच्या पाण्यासाठी विहिरी अधिग्रहीत करणे यासंदर्भातील संपूर्ण अधिकार या कालावधीपुरते जिल्हाधिकारी यांना देण्यात येत आहेत. जिल्हाधिकारी यांच्या मार्फत तात्पुरत्या पाणी पुरवठा योजना करावयाच्या आहेत. आताच्या स्टॅन्डींग सूचनांनुसार दोन किलोमीटर अंतराच्या बाहेर पाण्याचा उद्भव असेल तर जिल्हाधिकारी यांना योजना मंजूर करण्याचे अधिकार नाहीत. यासाठी त्यांना आयुक्तांकडे मंजुरीसाठी जावे लागते किंवा मंत्रालयापर्यंत यावे लागते. आता राज्य शासन असा निर्णय घेत आहे की, यापुढे जिल्हाधिकारी यांना आवश्यकता भासली की, अमुक अमुक ठिकाणी 3, 4 किंवा 5 किलोमीटर अंतरावरुन उद्भवाने पाणी येऊ शकते तर अशा पाच किलोमीटरच्या मर्यादेपर्यंत तात्पुरत्या पाणी पुरवठा योजना मंजूर करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना देण्यात आले आहेत. फक्त योजना मंजूर करण्याचे अधिकार दिले नसून जिल्हाधिकारी यांच्या वित्तीय अधिकारात देखील वाढ करण्यात आलेली आहे. एक कोटी रुपयांपर्यंतची योजना जिल्हाधिकारी स्वतःच्या अधिकारात मंजूर करु शकतील. ही बाब फक्त आयुक्तांच्या निदर्शनास आणून द्यावयाची आहे. अशा योजना तातडीने मंजूर कराव्यात म्हणून तसे अधिकार आयुक्त व जिल्हाधिकारी यांना देण्यात आले आहेत.

सभापती महोदय, ज्या ठिकाणी चारा छावण्या सुरु आहेत, अशा ठिकाणी 500 जनावरांऐवजी 250 जनावरे असली तरी चारा छावण्या सुरु करता येतील. याबाबत जिल्हाधिकारी यांनी तपासणी करुन निर्णय घ्यावयाचा आहे. 14 जिल्हे आत्महत्याग्रस्त आहेत, त्या जिल्ह्यांमध्ये अन्न सुरक्षा मोहिमेचा लाभ सुरु करण्याचा निर्णय मागील काळात घेण्यात आलेला आहे. त्या

....2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथराव खडसे....

निर्णयाच्या अनुषंगाने दोन रुपये किलो दराने धान्य व 3 रुपये किलो दराने तांदूळ देण्यात येत आहे. आता राज्य सरकारने या योजनेला अधिक वेग आणला आहे. या योजनेची व्याप्ती वाढविण्याचा विचार सरकार गंभीरपणे करीत आहे. दुष्काळग्रस्त भागात धान्याचा व चाऱ्याचा पुरवठा झाला पाहिजे. उद्या केंद्र सरकारकडे होणाऱ्या बैठकीत राज्याला अतिरिक्त धान्य मिळावे अशी मागणी करण्यात येणार आहे. राज्यातील अभूतपूर्व परिस्थिती लक्षात घेऊन जो भाग दुष्काळग्रस्त व आत्महत्याग्रस्त आहे अशा भागांसाठी दोन रुपये किलो दराने धान्य व तीन रुपये किलो दराने तांदूळ देण्याचा निर्णय घेतला आहे. जे तालुके टंचाईग्रस्त आहेत त्यांना आजही अन्नधान्याची टंचाई भासत आहे किंवा पुढे भासणार आहे अशा ठिकाणी अतिरिक्त धान्य केंद्र सुरु करण्याची परवानगी महाराष्ट्र शासनाला द्यावी अशी विनंती केंद्र सरकारकडे राज्य शासन करणार आहे.

सभापती महोदय, विहिरी खोल करण्याच्या संदर्भातील सर्व अधिकार जिल्हाधिकारी यांना देण्यात आले आहेत. सुरुवातीला जिल्हाधिकारी यांना मर्यादित अधिकार होते. आडवे बोअर करायचे असेल, जमिनीवर बोअरवेल करायची असेल, विहीर खोल करायची असेल तर यासंदर्भात वित्तीय मर्यादा होत्या. ही वित्तीय मर्यादेची अट काढून टाकण्यात आली आहे. ज्या ठिकाणी पाणी लागत असेल त्या ठिकाणी जेवढा निधी लागेल तेवढा निधी जिल्हाधिकारी यांनी मंजूर करावा, अशा सूचना जिल्हाधिकारी यांना देण्यात आल्या आहेत. सामुहिक पिण्याच्या पाण्याच्या योजना आहेत, रिजनल वॉटर सप्लाय स्कीमचे विजेचे बील भरले नाही म्हणून अनेक गावांतील पिण्याच्या पाण्याचा पुरवठा बंद झालेला आहे अशा ठिकाणच्या पिण्याच्या पाण्याच्या योजनांचे या कालावधीतील विजेची देयके राज्य सरकारने भरण्याचा निर्णय घेतलेला आहे. राज्य सरकार विजेचे देयक भरेल व ती पाणी पुरवठा योजना सुरु करण्यात येईल. रिजनल वॉटर सप्लॉस स्कीम 10 गावांची असेल, 40 गावांची असेल अशा गावांना पाणी मिळेल, त्यामुळे तेथील टँकरचा खर्च वाचू शकेल. या दृष्टीकोनातून सरकारने निर्णय घेतलेला आहे.

सभापती महोदय, टँकरचा पुरवठा करीत असताना जनावरांना चारा मिळाला पाहिजे अशी चिंता सर्व सन्माननीय सदस्यांनी व्यक्त केलेली आहे. संपूर्ण राज्यात सर्वच ठिकाणी शासनाने चारा

....3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथराव खडसे....

राखून ठेवलेला आहे. सर्व जिल्हाधिकारी यांना यासंदर्भातील सूचना दिलेल्या आहेत. ज्या ठिकाणी चाऱ्याची टंचाई भासेल त्या ठिकाणी आवश्यकतेनुसार दोन किंवा तीन दिवसांच्या आत चारा पोहचविण्यासाठी तेथे गाड्या भाड्याने लावण्यासंदर्भातील अधिकार जिल्हाधिकारी यांना देण्यात आले आहेत. जेथे आवश्यकता असेल तेथे चारा उपलब्ध करुन देण्यात यावा. आज चारा छावण्या सुरु करण्यात आल्या असल्यामुळे त्या छावण्यामध्ये चाऱ्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे. पुढील कालखंडात चाऱ्याची टंचाई भासली तर त्यासाठी चारा उपलब्ध असला पाहिजे यासंदर्भातील व्यवस्था करण्यात आलेली आहे. चारा छावण्याच्या संदर्भात आतापर्यंत 109 कोटी रुपये खर्च करण्यात आले आहेत. आता अनेक ठिकाणी चारा छावण्या सुरु करण्याची मागणी येत आहे. जेथे आवश्यकता आहे तेथे चारा छावण्याची व्यवस्था करण्यात येत आहे.

सभापती महोदय, मागेल त्याला शेततळे असा निर्णय शासनाने घेतलेला असताना अनेक सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, ऑनलाईन शेततळ्यांची मागणी नोंदविण्यात यावी. 51 हजार शेततळे घेण्याचा निर्णय या वर्षी राज्य शासनाने घेतला आहे. सरकारकडे मागील दोन वर्षापूर्वी 36 हजार शेततळ्यांची नोंदणी ऑनलाईन पध्दतीने झालेली आहे. तालुक्यातील शेतू सुविधा केंद्राच्या माध्यमातून व अनेक माध्यमातून ऑनलाईन नोंदणी झालेली आहे. शेततळ्यासाठी 50 हजार रुपये अनुदान देण्यात येणार आहे. 50 हजार रुपयात शेतकऱ्यांनी मशीन लावून किंवा मजूराकरवी खोदकाम केले तरी हरकत नाही. यासाठी कमीत कमी 50 हजार रुपये शासनाकडून अनुदान देण्यात येणार आहे. त्यातून शेततळे उभे राहणार आहे, 50 हजार रुपयामध्ये छोटे शेततळे तयार होते हे प्रत्यक्ष अधिकाऱ्यांनी दाखविले आहे. काही शेतकऱ्यांना शेततळ्यासाठी तीन लाख किंवा 5 लाख रुपये लागत असतील तर मनरेगाच्या माध्यमातून ही कामे करण्याची मूभा देण्यात आलेली आहे. 5 लाख रुपयांचे काम केले तरी कोणतीही आडकाठी येणार नाही. यासाठी निधी कमी पडू दिला जाणार नाही. मशीनरीने खोदकाम करावे म्हणून 50 हजार रुपयांची मर्यादा ठेवण्यात आलेली आहे. मशीन वापरली तर 50 हजार रुपये देण्यात येतील. मजूरांकरवी शेततळे केले तर त्यासाठी

....4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथराव खडसे....

5 लाख रुपये देण्यात येतील. शेतकऱ्यांमध्ये जागरुकता वाढली व तो मजुरांकरवी कामे करावयास लागला आणि मजूर मिळत असतील तर ही जलसंधारणाची कामे खूप मोठ्या प्रमाणात होणार आहेत.

सभापती महोदय, बी.टी.कॉटनच्या संदर्भातील मागच्या व या वर्षासाठी एक महत्वाचा निर्णय जाहीर केलेला आहे. 200 रुपये प्रती पॅकेट बी.टी.कॉटनच्या भावात घट करण्यात आलेली आहे. आणखी काही बियांणाच्या संदर्भातील भाव कमी करण्याचा निर्णय राज्य शासन घेत आहे. शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च कमी केला पाहिजे असा राज्य सरकारचा प्रयत्न आहे. विविध मार्गांनी शेतकऱ्यांची परिस्थिती सुधारली पाहिजे. यासाठी शेतकऱ्यांच्या सहकार्याने या योजना राबविण्यासाठी शासन प्रयत्न करीत आहे. पुढील कालखंडात पावसाचे प्रमाण कमी राहिले तर ही चिंता राज्य सरकारसह सर्वांना आहे. यासाठी पाण्याचा वापर काटकसरीने करणे, जे जलस्त्रोत आहेत ते राखून ठेवले पाहिजेत. यासाठी काही कटू निर्णय राज्य सरकारला घ्यावे लागतील. राज्य शासनाकडून सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती करण्यात येत आहे की, आपण देखील सहकार्य करण्याची गरज आहे. या कालखंडात काही ठिकाणी शेतीला पाणी मिळणार नाही. काही ठिकाणी उभी शेती जळेल, कारण पाणी पिण्यासाठी द्यावे की, शेतीला द्यावे, असा प्रश्न उभा राहणार आहे. शेती वाचली पाहिजे व पिण्यासाठी पाणी मिळाले पाहिजे यासाठी आतापासून सरकारने काटकसरीचे धोरण जाहीर केले पाहिजे. त्यामुळे संबंधित तळे व जलस्त्रोत यांचे नियोजन करुन इतर प्रयत्न करण्यात येणार आहेत.

या नंतर श्री.सांगळे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथराव खडसे....

आपण लातूरचा विषय उपस्थित केला. त्यासोबत अनेक शहरे आहेत. ही खरी समस्या आहे. आता एका शहरापुरती चर्चा होऊ शकत नाही. पुढील महिन्यात लातूरसारखी अनेक शहरे येतील अशी आम्हाला आज भीती वाटत आहे. लातूर शहरासाठी कितीही लांब असो, त्याकरिता आम्ही 700 कोटी रुपयांचा प्राथमिक पाणी कोटा योजनेचा तपासणी अहवाल मागविला आहे. सदर योजनेकरिता 650 ते 700 कोटी रुपये लागतील असा अंदाज आहे. ही गोष्ट एक वर्षात होणार नाही, त्याकरिता कदाचित 2 वर्षे किंवा 3 वर्षे लागतील. परंतु अशा शहरांकरिता कितीही लांबून पाणी आणण्याची वेळ आल्यास ज्या ठिकाणी पाणी उपलब्ध आहे तेथून पाणी उचलून मोठ्या शहरांपर्यंत आणणे. तसेच लहान शहरे व गावांपर्यंत जीएसडीएच्या माध्यमातून तपासणी करुन विंधन विहिरी, बोअरवेल्स किंवा हातपंप बसविता येऊ शकतात. तेथे मुबलकरित्या अधिकार दिलेले आहेत. तहसीलदारांना टँकर लावण्याचे अधिकार दिलेले आहेत. बोअरवेल करण्यासाठी तहसीलदार आणि बीडीओ यांना अधिकार दिलेले आहेत. बोअरवेल्स, विंधन विहिरी किंवा हातपंपासाठी तहसीलदार आणि बीडीओ यांनी पाहणी करुन तत्काळ निर्णय घ्यावयाचा आहे.

सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी असा मुद्दा उपस्थित केला होता की, यवतमाळ जिल्ह्यात सर्वात जास्त आत्महत्या झाल्यानंतर सुध्दा तेथे दुष्काळ जाहीर करण्यात आला नाही. आत्महत्या आणि दुष्काळ यांचा संबंध तेथे पाऊस पडला की नाही, याबाबत आहे. ऑक्टोबर महिन्यामध्ये प्राप्त झालेल्या अहवालांमध्ये जिल्हाधिकारी यवतमाळ यांच्याकडून प्राप्त झालेल्या अहवालानुसार यवतमाळ जिल्ह्यात जुन ते ऑक्टोबर या काळात 75 टक्क्यांपेक्षा जास्त पाऊस पडला होता. तसेच यवतमाळ जिल्ह्यात 50 पैशाच्या वर आणेवारी असल्यामुळे त्यांनी यवतमाळ जिल्ह्यातील सुचविलेल्या फक्त 2 गावांचा आपण त्यात उल्लेख केला आहे. मी मघाशी सांगितले होते की, पुढील काळ असा येणार की, शेतकऱ्यांना बियाणे विकत घेण्यासाठी पैसे मिळतील की नाही, त्यांना खते विकत घेता येतील की नाही, त्यांना पुढील पेरणी करता येईल की नाही ? अशा परिस्थितीत राज्य सरकार गंभीरतेने विचार करीत आहे. सध्या उपलब्ध असलेल्या बियाणंचा अंदाज काढून निविस्टाद्वारे पंचायत समितीच्या माध्यमातून शेतकऱ्यांना सबसिडीच्या रुपाने किंवा मोफत बियाणे देण्याचा कार्यक्रम राबवावा लागला तरी, तो कार्यक्रम राबविण्याची तयारी आता राज्य

...2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथराव खडसे....

सरकारने सुरु केली आहे. बियाणे किती उपलब्ध आहे ? या संबंधी निर्णय व्हायचा आहे. सरकारने शेतकऱ्यांना पेरणी किंवा खतांसाठी मदत केली नाही तर पुढील वर्षी शेतकरी शेती पिकवू शकेल की नाही या बद्दल संशय आहे, शंका आहे. म्हणून शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी या संबंधी कार्यवाही करुन त्याला जास्तीत जास्त मदत करण्याचा आम्ही प्रयत्न करीत आहोत.

सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे यांनी उपस्थित केलेले सर्व मुद्दे जसेच्या तसे आम्ही घेतले आहेत. त्यात पिकांचे पुनर्गठन, फी माफी इत्यादी मुद्दे आहेत. आपण उपस्थित केलेल्या सर्व मुद्यांच्या बाबतीत शासनाने निर्णय घेतला आहे. काही मुद्दे राहिले असतील व आणखी काही मुद्दे घ्यावे लागतील. परंतु शासन यासंबंधी गंभीर आहे. खालच्या सभागृहात असे सांगण्यात आले की, सर्व मंत्री बीड जिल्ह्यात फोटो सेशनसाठी गेले होते. अशा प्रकारे मंत्री गेल्यास ते फोटो सेशनसाठी गेले आणि नाही गेल्यास का नाही गेले ? अशा प्रकारचे अनेक प्रश्न उपस्थित केले जातात.

श्री.जयंत प्र.पाटील : मंत्र्यांनी तेथे 4 ते 5 दिवस राहिले पाहिजे.

श्री.एकनाथराव खडसे : आपण प्रत्येक पालकमंत्र्यांना सूचना दिलेल्या आहेत. त्यानुसार ते पाहणी करतात. मी स्वतः औरंगाबाद येथे संभाजी नगरला 5 ते 6 बैठकी घेतल्या होत्या. मी बरेच वर्षे तिकडे काढले त्यावेळी मी जे काही बोलत होतो, ते आता तुम्ही बोलत आहात.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मी स्वतः तेथे काम करीत आहे, म्हणून मी या बाबतीत आपल्याला माहिती दिली. तेथे बीडीओ आणि तहसीलदार यांच्याकडून निधी दिला जात नाही. त्यांच्याकडून असे सांगितले जाते की, साहेब, वरुन पैसे आले नाहीत, आम्ही काय करु ? मंत्री येतात, आश्वासने देतात, आम्ही येस सर म्हणतो, निघून जातो. त्यानंतर आमच्याकडे कोणी पैसे पाठवित नाही. ही वस्तुस्थिती आहे. मी तेथे जातो, साईटवर काम करतो ?

श्री.एकनाथराव खडसे : कोणते काम आहे ?

श्री.जयंत प्र.पाटील : गंगापूर, वैजापूर, कळंब, औरंगाबाद ग्रामीण तालुका आहे. मी स्वतः तेथे गेलो आहे.

...3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी दिलेली माहिती तत्काळ तपासून घेवू. तेथे जॉब कार्ड काढून मागणी केल्यानंतर त्यांना कामे दिली जात नसल्यास ही बाब अतिशय गंभीर आहे. दुष्काळात मजुरांची अशी अवहेलना होणार असल्यास सरकार ही बाब अजिबात सहन करणार नाही. आपण दिलेली माहिती प्रोसिडिंगवर आहे. मी सदर गावांची माहिती मागवून घेतो.

श्री.जयंत प्र.पाटील : तीन वर्षांपासून मनरेगा योजनेत असलेल्या विहिरींची बिले दिलेले नाहीत.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, मनरेगा योजनेच्या अनुषंगाने विहिरींच्या बिलांसंबंधी सन्माननीय सदस्यांनी दिलेली माहिती खरी आहे. काही ठिकाणी नियमाच्या बाहेर व शासनाने दिलेल्या इष्टांकापेक्षा जास्त विहिरी मंजूर करण्यात आल्या, अशा विहिरींचे पेमेंट देण्यात आलेले नाही. बीडीओंनी नियमानुसार मंजूर करुन दिलेल्या विहिरींची बिले 100 टक्के देण्यासंबंधी सूचना दिलेल्या आहेत. शासनाने काही पंचायत समित्यांना 50 विहिरी मंजूर कराव्यात असे सांगितल्यानंतर त्यांनी 400 विहिरी मंजूर केल्या. त्यात अनेक व्यवहार झाले व अनेक जण निलंबित सुध्दा झाले आहेत. अशा परिस्थितीत प्रत्यक्षात विहीर खोदलेली असेल, त्याने काम केलेले असल्यास त्याचा फेरविचार करुन त्यांनाही काही पैसे मिळाले पाहिजेत, या दृष्टीकोनातून पावले उचलली जातील. परंतु आपण दिलेली माहिती गंभीर आहे. मनरेगाच्या संदर्भात राज्यात काम मिळत नसल्यास त्यापेक्षा दुसरी वाईट गोष्ट कोणतीही नाही. आम्ही यासंबंधी गंभीर दखल घेऊ. तसेच यासंबंधी केलेल्या कार्यवाहीसह माहिती मी आपल्याला पुढील आठवड्यात सांगतो.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, विरोधी पक्षाने नियम 260 अन्वये राज्यातील अतिशय दुष्काळ, पाणी टंचाई, चारा टंचाई, आत्महत्या, गारपीट, अवकाळी पाऊस या महत्त्वाच्या विषयांवर सदनात चर्चा उपस्थित केली. राज्याचे सर्व मंत्रिमंडळ दुष्काळी भागात असलेल्या प्रत्येक तालुक्यातील दुष्काळाची पाहणी करण्यासाठी गेले होते. राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी सर्व मंत्र्यांना लातूर येथे एकत्र बोलावून त्यांच्याकडून सर्व तालुक्यांची माहिती घेतली व त्यानंतर त्यांनी पत्रकार परिषद घेतली. मी ज्या दुष्काळी भागातून येतो, तशीच परिस्थिती राज्यातील अनेक ठिकाणी निर्माण झाली

...4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे...

आहे. तेथे सरकारकडून व्यापक व भरीव मदत झाली पाहिजे अशी आम्ही सदर चर्चा उपस्थित केल्यानंतर आम्हाला अपेक्षा होती. मी चर्चेमध्ये स्पष्ट सांगितले होते की, सरकार काही बाबतीत खोटे बोलत आहे, रेटून बोलत आहे. आम्ही चर्चेच्या दरम्यान सरकार खोटे बोलल्याचे पुरावे सुध्दा दिले होते. त्यानंतर आम्हाला एवढीच अपेक्षा होती की, या चर्चेनंतर उत्तराच्या वेळी सन्माननीय सरकारच्या वतीने, माननीय मदत व पुनर्वसन मंत्र्यांच्या वतीने खरी माहिती मिळावी. परंतु आता दुष्काळाच्या बाबतीत उत्तर देताना सरकार गंभीर नाही. सरकार दुष्काळाच्या बाबतीत आजही खोटे बोलत आहे हे स्पष्ट झाले. दुष्काळी भागातील शेतकरी दुष्काळाने होरपळत आहे. आम्ही पहिली मागणी केली होती की, दुष्काळी भागातील शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी करावी. परंतु माननीय मंत्र्यांच्या उत्तरात कर्जमाफीचा एक अवाक्षर सुध्दा आला नाही. आज आत्महत्यांच्या बाबतीत त्यांनी खेद व्यक्त करावा, त्यांनी खेदही व्यक्त केला, त्यांनी सर्वाधिक आत्महत्या झाल्याचे कबुल केले. त्यांनी 3228 आत्महत्या झाल्याचे कबुल केले. सरकारने एक सर्वेक्षण केले आहे.

यानंतर DD-1 .....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे.....

त्या सर्वेक्षणात असे दिसून आले आहे की, 3288 पैकी 37 टक्के आत्महत्या केलेले शेतकरी 50 हजार रुपयांच्या आतील कर्ज असणारे आहेत, 24 टक्के आत्महत्या केलेले शेतकरी 1 लाख रुपयाच्या आतील कर्ज असणारे आहेत. आम्ही वारंवार सरकारला हे सांगत होतो की, शेतकऱ्यांचे 1 लाख रुपयाच्या आतील कर्ज माफ झाले असते तर 3288 पैकी 61 टक्के शेतकऱ्यांचे प्राण वाचले असते. हे पुण्यकर्म सरकारला करता आले नाही. त्या शेतकऱ्यांना आपल्या प्राणाला मुकावे लागले.

सभापती महोदय, मी काल रात्री यु टयूबवर माननीय महसूल मंत्री श्री.एकनाथराव खडसे यांचे भाषण ऐकले. राज्याचे विधानसभेतील विरोधी पक्षनेते म्हणून त्यांनी सभागृहात केलेले ते भाषण होते. मी ते भाषण त्यांच्याकडे पाठविणार आहे. आम्हाला मंत्री महोदयांकडून दिलासादायक मदतीची अपेक्षा होती. मंत्री महोदय वारंवार म्हणतात की, मी बांधावरचा शेतकरी आहे. बांधावरच्या शेतकऱ्याची भावना त्यांच्या मनात आजही असेल असे मला वाटले होते. त्या बांधावरच्या शेतकऱ्याला साध्या सुईच्या टोकाएवढी सुध्दा भावना तुमच्यामध्ये दिसून आली नाही.

सभापती महोदय, आजही दुष्काळाच्या संदर्भात शासनाचे सहा स्थायी आदेश आहेत. त्या आदेशांच्या पलीकडे मंत्री महोदयांनी काहीही सांगितलेले नाही. कोणत्याही गोष्टीबाबत पाठ थोपटून घेता आणि सत्ताधारी पक्षाचे सदस्य बाके वाजवितात. आज मराठवाड्यातील ग्रामीण भागात प्यायला पाण्याचा थेंब नाही. शासन म्हणते की, आम्ही वीज बिल माफ केले. त्यासाठी सत्ताधारी पक्षाकडून बाके वाजविली गेली. खेडयात येऊन पहा. मागील चार महिन्यात प्यायला पाणी नाही, तर शेतीसाठी पाणी कुठून देणार आहात? एवढ्या भयानक परिस्थितीची चेष्टा अशा पध्दतीने सरकार करणार आहे असे आम्हाला वाटले नव्हते. आम्हाला या चेष्टेची थोडीशी जरी कुणकुण लागली असती तर कदाचित विरोधी पक्ष म्हणून आम्ही हा प्रस्ताव आणला नसता. विरोधी पक्ष नेता म्हणून मी सरकारला हात जोडून नव्हे तर पाया पडून विनंती केली की, मायबाप सरकारने काहीतरी द्यावे. ही माझी व्यक्तिगत विनंती नव्हती. ही दुष्काळी भागातील सर्वसामान्य शेतकऱ्यांनी केलेली विनंती होती. ते सरकारच्या पाया पडत होते. पण त्यांच्या पाया पडण्याने सुध्दा सरकारला पाझर फुटला नाही.

...2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे....

सभापती महोदय, मंत्री महोदयांनी कोणत्या गोष्टी रेटून सांगितल्या. पहिल्यांदा आम्ही शेतकरी अपघात विम्याबाबत निर्णय घेतला असे सांगितले. व्यक्तिगत अपघात विमा योजना 2005-06 मध्ये आलेली आहे. माझ्याकडे शासन निर्णयाची प्रत उपलब्ध आहे. कोणाच्याही नशिबी अपघात येऊ नये असे माझे प्रामाणिक मत आहे. शासन निर्णय 2004 चा आहे. कृषी व पदुम विभाग निर्णय क्रमांक-एनआरईजीएस 1204/प्र.क्र.166/19 (आर) नुसार शेतकरी व्यक्तिगत अपघात विमा योजना ही योजना 2005-06 पासून कार्यान्वित केलेली आहे. ही योजना कोणी कार्यान्वित केली? 2004 मध्ये पंतप्रधान पदी श्री.नरेंद्र मोदी होते की माननीय महसूल मंत्री पदावर श्री.एकनाथराव खडसे होते?

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, रेकॉर्डवर चुकीचे येऊ नये म्हणून मी सांगू इच्छितो की, पहिल्यांदा 1.35 कोटी रुपये शेतकऱ्यांच्या विम्याचा हप्ता सरकारने आपल्या तिजोरीतून भरला. माननीय पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदी यांनी सांगितले की, सर्वांनी या संदर्भातील पैसे भरावेत. राज्य सरकारने तशा स्वरुपाचा स्वत:चा हप्ता भरला आहे. विमा योजना 100 प्रकारच्या आहेत. शेतकरी पैसे भरत होते. राज्य सरकारने पहिल्यांदा या विम्याचा हप्ता दिला, त्यांना तोशिस लागली नाही. म्हणून मी सांगितले की, पहिल्यांदा विम्याचे पैसे भरण्याचा निर्णय घेतला.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी ज्या जीआरचा संदर्भ दिला तो 2004 च्या जीआर बाबतचा आहे. मंत्री महोदयांनी दावा केला की, आता योजना सुरु केली, पूर्वी योजना नव्हती. त्याबाबत विरोधी पक्षनेते सांगत आहेत.

श्री.एकनाथराव खडसे : शेतकऱ्यांनी पैसे भरावेत असा तो जीआर आहे.

श्री.धनंजय मुंडे : मंत्री महोदयांनी सांगितले की, तुम्ही खोलवर जा म्हणून मी खोलवर जात आहे. 2005-06 पासून ही योजना सुरु झाली. त्यामध्ये अपघात विमा मिळावयास पाहिजे. सरकार ज्या विषयामध्ये गंभीर व्हावयास पाहिजे त्या विषयावर गंभीर होत नाही. 2005-06 मधील ही शेतकरी अपघात विमा योजना आहे. तुम्ही म्हणता नाही, आता योजना आली आहे. मान्य करु तुम्ही आता योजना आणल्यामुळे एवढा भयंकर दुष्काळ आमच्या माथी आला की काय?

..3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे....

खोटे तरी किती बोलावे याला मर्यादा आहेत. एमआरईजीएस अंतर्गत मजुरांच्या हाताला काम असल्याचे एक तरी उदाहरण दाखवा. तुमच्यासमोर मी उदाहरण दिले. मुरंबी, ता.आंबेजोगाई, जि.बीड येथे रोजगार मिळावा म्हणून किती मागणी आहे ते पहा. तेथे जलसंधारणाचे किंवा पाझर तलावाचे कोणतेही काम घेऊ शकत नसलो तर रस्त्याचे काम घेता येते. एकाच बीड जिल्ह्यातील 450 खेडी आहेत, त्या ठिकाणी रस्त्याचे काम घेण्याबाबत मागणी केली. परंतु जिल्हाधिकारी म्हणतात, आम्ही रस्त्यासाठी मंजुरी देणार नाही ही वस्तुस्थिती आहे. आज माहितीच्या आधारे या ठिकाणी बोलले जात नाही. प्रत्यक्ष त्या ठिकाणी जाऊन कोणी पाहणी केली का? कोणत्याही पालकमंत्र्यांनी टंचाईच्या संदर्भात बैठक घेतली नाही. ती बैठक घेतली असती तर अशी वेळ त्यांच्यावर आली नसती. अन्नधान्य योजनेबाबत सांगितले गेले. शेतकऱ्यांना अन्नधान्य योजनेमधून धान्य दिले जाते. सभागृहात मी सांगितले होते की, रेशन कार्ड आधार कार्डला जोडायचे काम तहसीलदार कार्यालयामार्फत सुरु आहे. आज रेशन दुकानावर धान्य नाही. केसरी, पिवळे रेशन कार्ड आधार कार्डला जोडण्याचे आदेश शासनाने तहसीलदारांना दिले. अमुक दिवसात हे काम झाले पाहिजे असे सांगितल्यामुळे 100 टक्के काम पूर्ण करण्यामध्ये यंत्रणा गुंतली आहे. त्यामुळे धान्य दुकानात धान्य मागायला गेल्यानंतर धान्य मिळत नाही. आमच्यावर दबाव आहे, आम्हाला रेशन कार्ड आधार कार्डला जोडायचे आहे म्हणून धान्य दिले जात नाही. शासन म्हणते की सरसकट दुष्काळी भागातील शेतकरी लोकांना धान्य देण्याची योजना आहे. मंत्री महोदय म्हणाले की, जो पात्र आहे त्याला धान्य मिळणार आहे. हा खोटारडेपणा नाही का? अशा भयानक काळात शासनाने जनतेची अशाप्रकारे परीक्षा घेऊ नये. मंत्री महोदयांनी सांगितले की, आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबांना अमुक मदत, तमुक मदत दिली जाते. मी मंत्री महोदयांच्या विधानसभेतील भाषणाचा संदर्भ देतो. विरोधी पक्षात असताना त्यांनी केलेले ते भाषण आहे.

सभापती महोदय, त्या भाषणात मंत्री महोदय काय म्हणाले ते पहा. तुम्ही कापसाला 6000 रुपये प्रती क्विंटल भाव द्या. सोयाबीनला 4200 रुपये भाव का देत नाही. हे खरे आहे का? एवढ्या आत्महत्या झाल्या, आता सरकारच्या विरोधात 302 दाखल करा. हे मंत्री महोदयांनी त्यांच्या भाषणात म्हटले होते. या वर्षात 3288 शेतकऱ्यांच्या आत्महत्या झाल्या. मग तुम्हाला असे

...4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे.....

का वाटत नाही? कापूस उत्पादक शेतक-यांनी कापूस पिकविला, परंतु निसर्गाच्या संकटामुळे पीक कमी आले.

नंतर 2ई.1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे....

सभापती महोदय, 33 टक्क्यांचा निर्णय या सरकारने घेतला. सुरूवातीला आपण कापूस अनुदानामध्ये घेतला नव्हता. तालुक्यातालुक्यामध्ये कापूस उत्पादक शेतकऱ्यांचे मोर्चे निघाले त्यानंतर हा निर्णय करावा लागला आहे. कोर्टाने निर्णय दिलेला आहे. ....(अडथळा)....

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.भाई गिरकर यांना विनंती आहे की, त्यांनी महिनाभर माझ्या सोबत यावे. मग आपल्याला दु:ख कळेल. आपण संवेदनशील आहात. उद्या आम्हाला लोक विचारतील म्हणून मी सभागृहात बोलताना म्हणालो की, कुठल्या पक्षाचा पुढारी आहे हे त्या भागातील लोक बघणार नाही. ज्या पक्षाचा पुढारी दिसेल त्याला लोक मारतील. तेव्हा सन्माननीय सदस्य श्री.भाई गिरकर यांनी एक महिना माझ्या सोबत दुष्काळी भागात यावे आणि बघा काय परिस्थिती आहे. उगा जोरात बोलायचे म्हणून बोलत नाही. येथे शेततळ्यासंबंधातील निर्णय सांगितला. मागेल त्याला शेततळे देऊ असे सांगितले. रेटून सांगितले की, मागेल त्याला शेततळे देऊ. आता याचे नाव बदलणार आहे. महागेल ते शेततळे. आम्ही 82 हजार रूपये शेततळ्यांना देत होतो. या शासनाने शेततळ्यांचा दर 50 हजार रूपये ठरविला आहे. तरी हे शासन पाठ थोपटून घेत आहे. मागेल त्याला शेततळे अशी घोषणा करून आपण इष्टांक ठेवला. आपण 50 हजार शेततळी देणार आहात. मग मागेल त्याला शेततळे कसे काय मिळणार आहे ? मी लहान असल्यामुळे हे मला समजत नाही. ते माननीय मंत्री श्री.एकनाथराव खडसे यांनी मला समजावून सांगावे. मागेल त्याला शेततळे देणार आहात. पण पन्नास हजारच देणार आहात. मग पुन्हा आपण म्हणणार की, आमचा इष्टांक पन्नास हजार शेततळ्यांचा होता. आताच आपण म्हणालात की, ऑनलाईनद्वारे 36 हजार अर्ज शेततळ्यांसाठी आले आहेत. दोन तालुक्यातील शेततळ्यांसाठीचे 36 हजार अर्ज मी उद्या दुपारपर्यंत आणून देतो. ती यादी मी उद्या पटलावर ठेवतो. आपल्या शासन निर्णयात 50 हजार इष्टांक आहे. दिवाळखोरी काय आहे हे बजेटमध्ये कळणार आहे. 50 टक्के कट लावला आहे. चार हजार कोटी देतो असे सांगून एक हजार कोटी दिले नाहीत. जे सरकार शेतकरी आणि दुष्काळी भागातील लोकांच्या विरोधात आहे हे उत्तरातसुद्धा स्पष्ट केले आहे त्या सरकारचा निषेध करून आम्ही कामकाजावर बहिष्कार घालतो.

(विरोधी पक्षातील काही माननीय सदस्य घोषणा देत बहिर्गमन करतात.)

..2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, शेवटी विरोधी पक्षाने त्यांचे काम केले. ही चर्चा राजकारणविरहित व्हावी म्हणून आम्ही राजकारणातील एकही शब्द काढला नाही. परंतु, यातून विरोधी पक्षाला राजकारणच करायचे आहे. दुसरा मुद्दाच नाही. गेली 15 वर्ष राज्यात जी स्थिती निर्माण झाली आहे, जे पाप झाले आहे ते आम्ही फेडतो आहोत. आत्महत्येतील स्थिती ही एका वर्षात आलेली नाही. 15 वर्षातील पाप एवढे साचत गेले की, त्यामुळे आज शेतकरी मरत आहे. आमचे सरकार आले म्हणून शेतकऱ्यांनी आत्महत्या करायचे असे काही ठरवलेले नाही. शेतकऱ्यांच्या आत्महत्या या थांबायला पाहिजे होत्या. मला विरोधी पक्षाला विचारावयाचे आहे की, आदरणीय श्री.शरद पवार साहेबांनी 70 हजार कोटी रुपये देऊन कर्जमाफ केले होते असे ते म्हणतात. कर्ज माफ केल्यामुळे आत्महत्या थांबल्या असत्या तर सन 2012 मध्ये सर्वात जास्त आत्महत्या झाल्या नसत्या. कर्ज माफी जाहीर केल्यानंतर संपूर्ण देशात आपल्याच राज्यात एवढ्या मोठया प्रमाणावर आत्महत्या का झाल्या आहेत ? कर्ज मुक्ती केल्यानंतर एकही आत्महत्या व्हायला नको होती. शेतकरी अपघात विम्याचा विषय आहे. मी दाव्याने सांगतो आहे, वाटल्यास माझ्यावर हक्कभंग आणावा, दिनांक 1.12.2015 रोजी श्री.गोपीनाथराव मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेला आम्ही मान्यता दिली. पूर्वीच्या कालखंडामध्ये ही योजना एक लाख रुपयांपर्यंतची होती. यात आम्ही दोन लाख रुपयांपर्यंतची मर्यादा वाढविली आहे. या सर्वांचा पैसा आम्ही भरला आहे. त्यामुळे माझी विरोधी पक्षाला विनंती आहे की, राजकीय चर्चा न करता शेतकऱ्यांच्या हितासाठी चर्चा करावी. शेततळे असेल, मनरेगा असेल, मागेल त्याला काम देण्याची आमची भूमिका असेल, नव्हे ती आहेच त्यासंबंधी चर्चा करावी. आम्ही शेतकऱ्यांसाठी कुठल्याही परिस्थितीमध्ये पैसा कमी पडू देणार नाही. सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे. आत्महत्या होऊ नये अशी विरोधी पक्षांची इच्छा आहे तशी आमची देखील इच्छा आहे.

(विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्य सभागृहात आगमन करतात व काही माननीय सदस्य वेलमध्ये येऊन एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

..3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथराव खडसे....

कर्जमाफी करून प्रश्न सुटला असता तर आता पर्यंत एवढ्या आत्महत्या का झाल्या असत्या ? श्री.शरद पवार साहेबांनी सर्वात जास्त कर्जमाफी करून देखील सर्वात जास्त आत्महत्या ह्या त्यांच्या काळातच झालेल्या आहेत. हे काही एका वर्षात झाले काय .......

(विरोधी पक्षातील काही माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

**तालिका सभापती :** सभागृहाची बैठक 20 मिनिटांकरिता स्थगित करण्यात येत आहे.

(सभागृहाची बैठक 5.45 ते 6.05 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

..........

यानंतर श्री.अजित....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**( स्थगितीनंतर )**

**( सभापतीस्थानी माननीय उप सभापती )**

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, सभागृहाचे कामकाज सायंकाळी 6.00 वाजेपर्यंत चालवावयाचे असा निर्णय कामकाज सल्लागार समितीमध्ये झाला होता. आता सायंकाळचे 6 वाजून 5 मिनिटे झालेली आहेत. येथून कामकाज करण्यापेक्षा कामकाजपत्रिकेवरील उर्वरित कामकाज उद्या घेण्यात यावे आणि आता सभागृहाचे कामकाज थांबवावे,अशी माझी आपणास विनंती आहे.

श्री.गिरीष बापट : सभापती महोदय, रोज एक विधेयक घ्यायचे असेही कामकाज सल्लागार समितीमध्ये ठरले होते. तरी देखील माननीय विरोधी पक्ष नेत्यांचा सन्मान ठेवून आजच्या कामकाजपत्रिकेमध्ये दाखविलेले विधेयक नंतर घेण्यात येईल. माझी विनंती आहे की, आपण माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेस सुरुवात करु या. आम्हाला सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांचे माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाच्या चर्चेवरील मार्गदर्शन ऐकायचे आहे. तेव्हा त्यांनी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणास सुरुवात करुन ऑनलेग रहावे.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, आमच्या पक्षाचे अध्यक्ष आणि या सदनातील ज्येष्ठ सदस्य श्री.सुनील तटकरे हे माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेस सुरुवात करणार आहेत.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

..2..

**पृ.शी.:** राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा

**मु.शी.:** राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दलच्या आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावावर चर्चा.

श्री.सुनील तटकरे (विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांनी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दलच्या आभार प्रदर्शनाचा प्रस्ताव मांडला आणि त्यास सन्माननीय सदस्य ॲड.अनिल परब यांनी अनुमोदन दिले होते. परंतु या अभिभाषणास अनुमोदन देणारे शिवसेना पक्षाचे सन्माननीय सदस्य ॲड.अनिल परब हे सभागृहात उपस्थित नाहीत. तेव्हा माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल त्यांची नेमकी भूमिका काय आहे ? त्यांना माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाचा प्रस्ताव नको आहे का ? आम्ही सरकारमध्ये आहोत आणि सरकारच्या बाहेर देखील आहोत ही दुटप्पीपणाची भूमिका अलीकडच्या काळात बदललेली आहे.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर तीव्र नापसंती व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे. माननीय राज्यपालांचे अभिभाषण हे सरकारच्या पुढील आर्थिक वर्षातील धोरणांचे एक वैचारिक प्रतिबिंब असते, असे मानले जाते.

**उप सभापती** : माननीय संसदीय कार्य मंत्र्यांनी विनंती केली होती की, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेस सुरुवात करुन लॉन लेग रहावे. आपण त्यांचा मान राखला. आता मी आपल्या दोघांचा मान राखतो आणि आजच्या सभागृहाचे कामकाज स्थगित करतो.

सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या मंगळवार, दिनांक 15 मार्च, 2016 रोजी दुपारी 12.00 वाजता पुन्हा भरेल.

( सभागृहाची बैठक सांयकाळी 6 वाजून 08 मिनिटांनी, मंगळवार दिनांक 15 मार्च, 2016 रोजीच्या दुपारी 12.00 वाजेपर्यंत स्थगित झाली )

---------

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION